
# गुरुवारच्याच दिवशी....



(डॉ. श्रीकांत देशमुख, नागपूर यांच्याकडून):

**मी** आज केंद्र सरकारच्या नोकरीत चांगल्या पदावर आहे. याचे सर्व श्रेय मी श्री साईबाबांनाच देतो. अर्थात बाबांवर माझा पूर्ण विश्वास आहे. बाबांनी सांगितलेल्या 'श्रद्धा' व 'सबुरी'चे नियमित पालन करीत असल्यानेच आतापर्यंत पाच वेळा मला बढती मिळाली. बढतीच्या प्रत्येक वेळी इंटरव्ह्यू गुरूवारीच झाला व माझा नंबर पहिला होता. तसेच सर्वच जागांवर मी गुरूवारीच रूजू झालो. गेल्या ३० वर्षापासून दरगुरूवारी उपवास करणे व सायंकाळीच तो सोडणे, असा माझा परिपाठ चालू आहे. एक पूर्ण वर्षभर हॉलंडमध्ये असतानासुद्धा मी गुरूवार कधी विसरलो नाही. कोणतेही शुभकार्य मी गुरूवारीच करतो. कधी मुहूर्त पहावयाची गरज भासली नाही. माझी पत्नीही लग्नापूर्वीपासूनच गुरूवार करायची. आमचा विवाहही गुरूवारीच झाला व लग्नाचा २५ वा वाढदिवस गुरूवारीच झाला. शिरडीलाही गुरूवारीच बाबांचे दर्शन घेत असतो.

बाबांवर पूर्ण विश्वास ठेवला की काहीच अशक्य नाही, हे दाखविणारा हा अनुभव :

बऱ्याच वर्षांपूर्वी मी, माझी पत्नी व तीन मुलं श्री साईबाबांच्या दर्शनाकरिता दिल्लीहून रेल्वेने निघून मनमाडला पहाटे सहा वाजता पोहचलो. मनमाडला लगेच एस्.टी. मिळाली. कोपरगावला चहा किंवा दूध घ्यावे असे वाटले, पण शक्य झाले नाही. तेथेच माझा लहान मुलगा ईश्वर एका बसमागे ए बसवाले, बस रोको.... बस रोको.... म्हणत धावला. (दिल्लीला वास्तव्य असल्यामुळे हिंदीचाच वापर जास्त होतो.) बस एका फलकाकडून दुसऱ्याकडे जात होती म्हणून थांबली.... नाहीतर ईश्वर मागच्या चाकात आलाच असता. तेवढ्यात मी श्री बाबांच्या नावाचा धावा केला व धावत जावून त्याला उचलून घेतले. त्या दिवशी गुरूवारच होता. शिरडीला सकाळी १० वाजता पोहचलो. आम्ही दोघांनी व मुलांनी काहीच खायला-प्यायला मागितले नाही. पटापट आंघोळी आटोपून बाबांच्या चरणी (समाधीजवळ) बसून दुपारी १२ च्या आत अभिषेक केला व दुपारची आरती करूनच आम्ही सर्वजण एकदमच जेवलो. उठल्याबरोबर खायला मागणारी मुलं व आम्हीही बेड-टी घेणारे त्या दिवशी दुपारी चक्क १ वाजेपर्यंत पाण्याचा एकही थेंब न घेता कसे राहिलो, याचेच आश्चर्य वाटते. केवळ बाबांच्या कृपेनेच ते 'शक्य' झाले. •

# बाबांचा महिमा !

(श्री. सुधीर किल्लेदार, नागपूर यांच्याकडून):

**मी** १९८४ मध्ये श्री साईबाबांच्या दर्शनाला पहिल्यांदाच गेलो. त्यावेळी मी बी.कॉम्.ची परीक्षा नुकतीच दिली होती. परीक्षेचा निकाल यावयाचा होता. पेपर्स काही माझ्या मनाजोगे सोडविले गेले नव्हते. मी बाबांना मला उत्तीर्ण करण्याविषयी प्रार्थना केली व घरी परतलो. काही दिवसांनी निकाल आला व मी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालो. तेव्हापासून माझे जीवन साईमय झाले.

असाच एक प्रसंग.... मी व माझा मित्र त्याची दुरूस्तीला टाकलेली गाडी आणायला गेलो होतो. मित्राने गाडी गॅरेजच्या बाहेर काढली आणि सुरू करून फेरी मारावयास घेऊन गेला. परंतु दुर्दैवाने त्याला अपघात झाला. मी त्याला लगेच दवाखान्यात भरती केले. त्याची प्रकृती फारच वाईट होती. मी श्री साईबाबांना प्रार्थना केली, "बाबा, माझ्या मित्राला पूर्ववत होऊ द्या!" आणि बाबांची उदी मित्राच्या मस्तकाला लावली. त्या दिवसापासून मित्राची तब्बेत सुधारत गेली व सात दिवसांनी तो पूर्ववत बरा झाला.

श्री साईबाबांची कृपादृष्टी अशीच सर्व भक्तांवर निरंतर राहो, हीच श्री साईचरणी प्रार्थना. •

दिल्या. परंतु दुसऱ्या दिवशी पहिल्या दिवसापेक्षा जास्त अशक्तपणा आला. मला दोघांनी धरून घरातून बाहेर आणले व रिक्षात बसवून दवाखान्यात नेले. तेथे मला ॲडमिट करण्यात आले. रोज इंजेक्शन आणि सलाईन लावूनदेखील पाचव्या दिवशी माझ्या डाव्या पायाला गुडघ्यापासून खाली तळव्यापर्यंत एकदम सूज आली, पाय रक्तासारखा लालभडक झाला. त्याकडे पाहिले की, घरचे व भेटीस आलेले अचंबित होत असत व त्यांच्या तोंडून सहज उद्गार निघत, कसे बरे हे सहन करतात ? कमाल आहे ! मी रात्रंदिवस कॉटवर पडून किंवा बसून असे. कॉटवरून उतरून इकडे-तिकडे फिरणे शक्यच नव्हते. सूजीमुळे रात्रंदिवस झोप येत नव्हती. श्री साईबाबांची तीन-चार मासिके, त्यांच्यावरील छोटी छोटी पुस्तके माझ्या उशाशी ठेवण्यात आली होती. शारीरिक वेदना सहन होत नव्हत्या तरीदेखील त्यातील एखादे पुस्तक घेऊन वाचीत असे. पिंडरीत सारखी जळजळ, आगआग होत असे. मी मनात म्हणे, साईबाबांना माझी दया कशी येत नाही ? डॉक्टर म्हणत, पाय गुडघ्यापासून खाली निकामी होईल. त्यासाठी शहरातील दवाखान्यात इलाज करावा लागेल. हे ऐकून मी अधिकच भयभीत होत असे. माझी पत्नी, मुलगा, मुलगी दिवसभर माझी शुश्रूषा करीत असत व रात्री मुलगी तिची लेकरं घरी ठेवून दवाखान्यात रात्रभर जागून माझी काळजी घेत असे. दवाखान्यात आल्यापासूनच्या आठव्या दिवशी मध्यरात्री मी श्री साईबाबांचे चरित्र आठवीत डोळे झाकून पडलो होतो. निसर्गनियमाप्रमाणे झोप लागली न लागली तोच श्री साईबाबांची एक सुंदर तसबीर मला दिसली. त्याचवेळी माहे ऑगस्ट-सप्टेंबर, १९९२ च्या 'श्री साईलीला'च्या मुखपृष्ठावर असलेल्या 'शिवलिंगासारखे (वाजे नगारा) मला चांगली झोप लागली. पायातील रक्त व पू यांचा निचरा झाला. आठ दिवसांत मी बरा झालो. ताबडतोब मी, पत्नी आणि मुलगी अशी आम्ही तिघं शिरडीला जावून बाबांचे, अंत:करणापासून, त्यांचे रूप डोळ्यांत साठवून, दर्शन घेऊन आलो. अशाप्रकारे बाबांनी मला स्वप्नात दृष्टांत देऊन बरे केले. •

# बाबांच्या कृपेने मुलगा झाला !



(श्री. गोविंद बरके, अंधेरी (प.), मुंबई यांच्याकडून):

**मी** दरवर्षी एकदा तरी श्री साईनाथांच्या दर्शनासाठी शिरडीला जातो. यावर्षी श्री साईबाबांच्या कृपेने मला आठ वर्षानंतर मुलगा झाला. श्री साईनाथांच्या चरणी लाख लाख प्रणाम. •

**जे शिकायचं त्याविषयी वेदनामूलक समज नको !**

# "मी बाबांचा आवाज ऐकला!"



(श्रीमती स्नेहलता त्रिपाठी, पुणे यांच्याकडून):

**मी** साईभक्त, देवीभक्त असून नियमितपणे 'श्री साईलीला', साईचालीसा, श्री साईसत्‌चरित ग्रंथाचे वाचन करीत असते. मी जेव्हा जेव्हा जमेल तेव्हा तेव्हा शिरडीची वारी करीत असते. त्यावेळेला मनाला जी प्रसन्नता लाभते ती अवर्णनीय आहे.

मी पुण्यात राहते. येथे मला औरंगाबादहून येऊन १० वर्षे झाली; परंतु स्वतःचे घर किंवा फ्लॅट घेणे जमत नव्हते. माझी काही जमीन विकून फ्लॅट घ्यावा, हेही जमून येत नव्हते.

मी सप्टेंबर, १९९० मध्ये मंत्रालय राघवेंद्र स्वामी येथे यात्रेला जावून आले. घरी आल्यावर अचानक माझा भाऊ ॲडव्होकेट सतीश मिश्रा माझ्या घरी बोलवायला आला की आपण शिरडीला जावू या! बरेच दिवस माझ्या मनात शिरडीला बाबांच्या दर्शनाला जावयाचे होते.... आणि हा योग असा जळून आला व आम्ही सर्व शिरडीला

शिरडीला आम्ही सर्वांनी प्रथम मंदिरात जावून बाबांचे व मग द्वारकामाई, धुनी आदी सर्वांचे दर्शन घेतले. त्यानंतर आम्ही मंदिराच्या दारात आलो व तेथील गरीबांना मी पैसे देत असताना मागून आवाज आला.... 'पैसा मिलेगा'.... हा आवाज वृद्ध माणसाच्या आवाजासारखा होता. तो ऐकून मला वाटले, कोणीतरी बोलले असेल.

या प्रसंगानंतर ३/४ दिवसांनी गुरूवारी एक गृहस्थ माझ्याकडे आले. त्यांनी माझ्या जागेविषयी चौकशी करून लगेच व्यवहारही केला व पैसेही दिले.

त्यावेळी ते गृहस्थ मला म्हणाले, "आम्ही आत्ताच शिरडीहून आलो." त्याचक्षणी माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. मला आठवले.... शिरडीमध्ये मी जो आवाज ऐकला तो बाबांचाच होता.... मी सद्‌गदीत झाले. डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले.

तद्‌नंतर माझ्या जागेचा व्यवहार पूर्ण होऊन मी फ्लॅटऐवजी बंगला विकत घेतला. तेव्हापासून माझी श्रद्धा आणखीनच दृढ होत गेली व माझे ठाम मत झाले की बाबा आजही शिरडीत आहेत व भक्तांच्या मनोकामना ते पूर्ण करीत आहेत. ●

# बाबांनी लाज राखली!




(सौ.वंदना नलावडे, दहिसर (प.), मुंबई यांच्याकडून):

**बा**बांच्या कृपेचे अनुभव मी लिहीन तेवढे थोडेच आहेत. त्यापैकी प्रस्तुत अनुभव माझ्या आयुष्यातला एक विलक्षण अनुभव असून या जन्मी तरी तो मी विसरू शकणार नाही लहानपणापासूनच आहे. खाली उल्लेख केलेल्या प्रसंगाला आज ४० वर्षे झाली. मी त्यावेळी १२ वर्षांची होते. माझी एक मैत्रीण, जी आज इचलकरंजी येथे आहे, ती व माझी बहीण, जी माझी स्फूर्तिदेवता आहे, ती, अशा आम्ही तिघी साईभक्त. आमचे शेजारी कै. राक्षे वढावकर हेसुद्धा एक साईभक्त होते. चांगले सधन व परोपकारी. त्यांच्याकडे साधुसंत येत असत. श्री गाडगे महाराज हे त्यातील एक. आम्ही सर्वांनी गाडगे महाराजांचा आशीर्वाद घेतलेला आहे. असो.

कै. राक्षे हे दरवर्षी भिवपुरी येथील एका ठिकाणी काहीजणांना स्वखर्चाने घेऊन जात व तेथे साईमंदिरात अन्नदान करीत. आम्ही त्यांचे शेजारीच असल्यामुळे बहुतेक दरवर्षी आम्हाला त्यांच्यासोबत जाण्याचा योग येत असे.

जाण्यास निघालो. आम्ही तिघी, अन्य बायका आणि पुरूषमंडळी असे सर्वजण मध्यरेल्वेच्या दादर स्थानकावर आलो. जिथे जिथे जागा मिळेल त्या त्या ठिकाणी बसायचे ठरले. गाडी दादर स्टेशनला येताच बाकीचे सर्व घाईघाईने एका डब्यात शिरले. नेमक्या आम्ही तिघीच एका अलग डब्यात चढलो.... गाडीची तिकिटे घेण्याचे भानही आम्हाला राहिले नव्हते. दुसऱ्या डब्यात चढलेल्यांपैकी कोणी काढली की नाही तेसुद्धा काहीच कळले नाही.... आणि आमचा दादर-भिवपुरी प्रवास सुरू झाला. थोडा वेळ आम्ही गाणी वगैरे म्हणत मजेत काढला. भिवपुरी स्टेशन येण्याच्या अगोदरचे स्टेशन आले. तेथे एक तिकिट-तपासनीस चढला. त्याला पाहताच आमची घाबरगुंडी उडाली. काय करावे, काहीच समजेना. प्रसंग बाका होता. तिकिट-तपासनीस एकेकाचे तिकिट तपासत पुढे सरकत होता. आमची तर लाज जाण्याचीच पाळी आली होती. तेवढ्यात बहिणीने मला प्रार्थना करायला सांगितले. त्यासरशी मी क्षणभर डोळे बंद केले व मनातल्या मनात बाबांचा धावा सुरू केला.... बाबा, या आपत्तीतून आम्हाला सोडवा! काहीतरी करा!.... इतक्यात माझ्या मैत्रिणीचे लक्ष पुढे बसलेल्या एका व्यक्तीकडे गेले.... आणि काय चमत्कार सांगू! त्या व्यक्तीच्या पाठीवर बरोबर अगदी नेमकी तीन रेल्वेची भिवपुरीची तिकिटं.... मी ती चट्‌कन उचलली. आजूबाजूला बसलेल्या लोकांकडे चौकशी केली. त्यांची तिकिटे त्यांच्याकडे सुरक्षित होती. तर मग ही तिकिटं कोणाची?.... तिकिट -तपासनीस चेकींग करीत आमच्याजवळ आला. आम्ही ती तपासली व पुढे सरकला.... परंतु हे सर्व होईपर्यंत ज्या व्यक्तीच्या पाठीवरून ती तिकिटं उचलली होती ती व्यक्ती तिथे नव्हती. आजूबाजूला सर्वत्र पाहिले, पण ती व्यक्ती कुठेच दिसली नाही.... कशी दिसणार! भक्तांवर आलेलं संकट दूर करण्यासाठी माझ्या साईमाऊलीने क्षणभर दृश्यरूप धारण केलं होतं ना! ●

# साईकृपेने मला एजंसी मिळाली!




(सौ. प्रतिभा बताले, पनवेल, रायगड यांच्याकडून):

**अ**खिल ब्रह्मांडनायक राजाधिराज योगीराज श्री साईबाबांनी अखंडपणे भक्तांना योग्य मार्गदर्शन करून त्यांना साक्षात्कार दिल्याचे व चमत्कार घडवून आणल्याचे आपण पहातो, ऐकतो, वाचतो. असा एक अद्‌भुत अनुभव मी नुकताच अनुभवला. तो मी येथे थोडक्यात देत आहे.

मी रायगड जिल्हा बँकेमध्ये दिनांक १३ ऑक्टोबर, १९९२ रोजी पिग्मी

## बाबांनी स्वप्नात येऊन टी.व्ही. दिला !



(श्री. मनोहर गायकवाड, मांजरी, कर्नाटक यांच्याकडून):

**म**ला माझा जन्मदिवस निश्चित माहीत नाही. शाळेत हजेरी-बुकात १२-१२-१९३७ असा तो असला तरी अंदाजे लिहिलेला आहे, असे माझे वडील सांगत असत. माझे गाव एक लहानसे खेडे आहे. म्हणून इथे वाढदिवस साजरा करण्याची प्रथा नाही.

दिनांक ११-१२-१९८९ रोजी रात्री ध्यानी-मनी नसताना अचानक मला एक स्वप्न पडले.... स्वप्नात मी श्री साईबाबांसमोर बसून जेवत होतो. बाबांच्या डोक्यावर कापड बांधलेले नव्हते. डोक्यावर बारीक पांढरे केस होते. बाबा मला सांगत होते, विचारीत होते,

"उद्या तुझा वाढदिवस आहे. तुझ्या घरात टी.व्ही. आहे का ?"

मी 'नाही' म्हटले.... आणि मी स्वप्नातून जागा झालो. पुढे थोड्याच दिवसांत हातात पैसा नसतानादेखील मला टी.व्ही. मिळाला. माझा एक मित्र टी.व्ही. विक्रेता आहे. त्याने मला उधार टी.व्ही. आणि तोही दसऱ्याचा आदला दिवस व दसरा ह्या दोन दिवसांच्या मधील वेळेत, म्हणजे बाबांच्या पुण्यतिथीच्या मुहूर्तावर धरून दिला. पहिल्यांदा 'शिरडी के साईं बाबा' ही कॅसेट आणून लावली. त्याद्वारे बाबांचे चरित्र सर्वांना पहायला मिळाले. छोट्या पडद्यावर बाबांचे दर्शन घेऊनच आम्ही सीमोल्लंघनाला गेलो. तेव्हापासून आजतागायत माझ्या घरी टी.व्ही. व्यवस्थित चालू आहे. आणखी लहान-मोठे खूप अनुभव आहेत. प्रत्येक अडचणीच्या वेळी मला बाबांची मदत होते. अशीच साऱ्या जगावर बाबांची कृपादृष्टी असो. ●

## ।। ॐ श्री साईबाबा माझे गुरू ।।

(श्रीमती लीलावती बोरकर, पनवेल, रायगड यांच्याकडून):

**म**ला आलेला अनुभव मी येथे देत आहे. १९९१ च्या जुलैमध्ये मला बाबांनी साक्षात्कार दिला.... त्या साक्षात्कारात ते मला म्हणाले,

"मी जगन्नाथ आहे. तू एवढ्या लांबून आलीस !"

त्यावर मी 'हो' म्हणाले....

आणि स्वप्नातून जागी झाले.

माझी जन्मभूमी बांधण (रायगड) या गावी स्वामी समर्थ महाराज यांचा मठ आहे. १९९२ च्या जून महिन्यात भगव्या कपड्यात त्यांनी मला दर्शन दिले. मी स्वत: आषाढी एकादशीला साईचरित्र वाचायला सुरूवात करते. ते गणपतीपर्यंत पुरे होते. कसली व कुठलीही अडचण येत नाही. मी १९५७ सालापासून साईभक्त आहे. मला मानसिक व आर्थिक अडचणी कैक आल्या; पण साईबाबांच्या आशीर्वादाने सारेकाही व्यवस्थित पार पडले. त्यांच्याच आशीर्वादाने मी एका चांगल्या घरात राहाते व सर्व दृष्टीने सुखी आहे. रोज साईस्तोत्र वाचते. गुरूवार व शुक्रवार धूप घालते. मला साईबाबांनी खूप अनुभव दिले आहेत. त्यांनी मला भिकाऱ्याच्या वेषात, तसेच भुजंगाच्या रूपात दर्शन दिले आहे. एकदा माझ्या मुलाच्या हातून समाधीवर चादर घालावयाची होती. तो एक नवस माझी आई शरीराने अपंग असलेल्या माझ्या मुलासाठी बोलली होती. त्यामुळे रोज बाबांची पूजा करताना मी बाबा, नवस फेडावयाचा आहे. तुम्ही सांगा, मी शिरडीला कशी येऊ ? अशी प्रार्थना करीत असे. बाबांनी माझी हाक ऐकली. काही वर्षांपूर्वी पनवेल-शिरडी एस्.टी. गाडी सुरू झाली व आम्ही तो नवस फेडला. मी रोज संध्याकाळी देवाजवळ दिवा दाखविताना प्रार्थना करते, माझी तब्येत चांगली ठेव! त्यानंतर मी साईबाबांचा अंगारा लावते. त्यांच्या कृपाशीर्वादाने माझे कुटुंब सुखी आहे. आज माझे वय ७८ असले तरी माझी प्रकृती बाबांच्या आशीर्वादाने खूप चांगली आहे व शेवटपर्यंत त्यांच्या आशीर्वादाने खूप चांगली राहो, हीच बाबांजवळ प्रार्थना करते. आमच्या घरातील प्रत्येक खोलीत बाबांचा फोटो आहे, त्यामुळे मला कसलीही भीती वाटत नाही.

श्री साईबाबांचे अनुभव वाचायला मिळावेत म्हणून मी 'श्री साईलीला' अंकाची वर्गणी भरून नियमितपणे अंक मागवत असते. ●

**समजून घेण्याचा समजूतदारपणा वाढवा !**

काही मला मिळाले नाही. माझ्यानंतर अर्ज केलेल्या मुलाची मात्र ८-१० दिवसांतच पिग्मी एजंट म्हणून निवड झाली म्हणून मी आशाच सोडली. तब्बल दोन महिने आम्ही बऱ्याच लोकांकडे वशिला लावण्यासाठी फिरलो; परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही.... आणि दिनांक २२ जानेवारी, १९९२ रोजी आमच्या घरी 'श्री साईलीला'चे मासिक आले.... त्यातील अनुभव वाचता-वाचता मीही साईबाबांना प्रार्थना केली,

"साईबाबा, माझी पिग्मी एजंट म्हणून ३१ डिसेंबरच्या आत नेमणूक होऊ द्या !"

....आणि काय आश्चर्य! बरोबर शेवटच्या दिवशी, म्हणजे ३१ डिसेंबरला माझ्या हातामध्ये नेमणुकीचे पत्र मिळाले.... ते पत्र वाचता-वाचता माझ्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. ●

## बाबांच्या कृपाछत्राखाली भय नाही कुणाही !

(कु. सुजाता सावंत, वांद्रे (पूर्व), मुंबई यांच्याकडून):

**जो जो मज भजे जैशा जैशा भावें।**
**तैसा तैसा पावें मीही त्यासी।।**

वरील वचनाचा अर्थ बाबांनी माझ्याबाबतीत पूर्णपणे खरा करून दाखविला आहे. माझ्याच नाही तर इतर अनेकांच्या बाबतीत साईवचनांच्या सत्यतेचा अनुभव येतो. आमच्या घरातील सर्वजण श्री साईबाबांची भक्ती मनापासून करतात.

माझ्या अल्पशा भक्तिरूपी साधनेमध्ये जे जे अडथळे आले ते ते श्री साईनाथांनी सोडविले. त्यापैकीच काही अनुभव मी येथे देत आहे. माझ्या बहिणीच्या बाळंतपणाच्या वेळची गोष्ट. माझ्या बहिणीची पहिलीच वेळ असल्याने जरा काळजीच वाटत होती. डॉक्टरांनी सांगितले होते की प्रकृती नाजूक असल्याने त्रास होण्याची शक्यता आहे. आम्ही सर्व भार साईबाबांवर टाकला. डॉक्टरांनी तिला १५-१५ दिवसांनी तपासणीसाठी बोलाविले होते. डॉक्टरांनी शेवटी ज्या दिवशी तपासणीसाठी बोलाविले होते त्या दिवशी दुपारी तिच्या पोटात दुखू लागले. बाबांची उदी लावून आम्ही तिला दवाखान्यात दाखल केले. त्याच संध्याकाळी ती सुखरूपपणे बाळंत होऊन तिला मुलगा झाला. हे सर्व बाबांच्या कृपेने शक्य झाले.


दुसरा अनुभव हा माझ्या भावाबद्दलचा आहे. माझा भाऊ ३१ डिसेंबरला अंबरनाथला आत्याकडे गेला होता. तो सकाळी ७ वाजता जो घरातून बाहेर पडला तो रात्री ९ वाजले तरी घरी परतला नाही. त्याचदिवशी त्याचा वाढदिवसही होता. ते दिवस दंगलीचे असल्याने फारच काळजी वाटू लागली. साईनामाचा जप करू लागले. मी बाबांना आर्त साद घातली,

"बाबा, माझा भाऊ सुखरूपपणे घरी परतू दे !"...आणि खरंच माझा भाऊ रात्रौ ९-३० वाजता सुखरूपपणे घरी परतला.

बाबा तुम्हा-आम्हा सर्वांना सुखी ठेवोत. सर्व साईभक्तांवर सदैव कृपाछत्र असलेल्या बाबांना आमचे कोटी-कोटी प्रणाम. ●

**शब्द वापरताना हे शब्द वापरलेच पाहिजेत का ? असा स्वत:ला प्रश्न करा !**

# स्वप्नाची प्रचिती आली !



(श्री. के. पी. पहाडे, रामदास पेठ, नागपूर यांच्याकडून):

**ही** गोष्ट नव्हे हकीकत नोव्हेंबर १९९० सालची आहे. आजपर्यंत आलेले बाबांचे अनुभव मी यापूर्वी 'श्री साईलीला' मासिकात प्रसिद्धीकरिता दिलेले होते ते वाचकांच्या स्मरणात असतीलच. यावेळचा अनुभव फारच आश्चर्यकारक आहे. माझ्या मुलीचे पहिले बाळंतपण दिनांक २३ नोव्हेंबर, १९९० रोजी झाले. त्यापूर्वी चार दिवस आधी बाबांनी स्वप्नात.... एक नवोदित मुलगा माझ्या हातावर ठेवला. इतक्यात एक पोपट कुठूनतरी उडत येऊन अगदी माझ्याजवळ आला. एका हातावर लहान मूल, दुसरा हात त्याच्या अंगावर अशा स्थितीत मी तो पोपट पकडला आणि शेजारच्या गृहस्थाद्वारे ताबडतोब पिंजरा मागवून त्यात तो ठेवला.... आणि माझे स्वप्न भंगले! या पडलेल्या स्वप्नाची चर्चा दुसऱ्या दिवशी घरच्या मंडळींबरोबर केली आणि निष्कर्ष काढला की सरिताला मुलगाच होणार!

आणि तसेच झाले बघा! दिनांक २३ नोव्हेंबर, १९९० रोजी पहाटे मुलीला पुत्ररत्नाचा लाभ झाला! पण बराच वेळ ते मूल रडले नाही म्हणून घरचे सर्व व्यथित होते. लगेच नर्सिंग होमच्या लेडी डॉक्टरने डॉ. बोधनकर (नागपूरचे नामांकित बालरोग चिकित्सक) यांना तातडीने बोलाविले. त्यांनी प्रयत्न केल्यावर मूल थोडे रडायला लागले. परंतु कमी वजन व प्रकृती चिंताजनक असल्याने डॉक्टरने त्यांच्या आय.सी.यु.मध्ये नेले. मी आपल्या घरी नेहमीप्रमाणे बाबांची पूजा करीतच होतो. डॉक्टरने मला बोलावणे पाठवून नवोदित मुलाचा एक्स-रे आणि इतर आवश्यक प्रक्रिया करवून आणावयास सांगितले. इतक्या लहान मुलावर प्रक्रिया करविणे माझ्याकरिता एक दिव्यच होते. ते सर्व करविल्यानंतर मी परत घरी आलो आणि चार दिवसापूर्वी पडलेल्या स्वप्नाची आठवण करून देत बाबांच्या फोटोसमोर म्हटले,

"बाबा! आपने तोता पकड़कर पिंजरे में रखने को बताया है। बाबा, अब उसे उड़ने मत देना!"

त्यानंतर थोडी उदी बाबांच्या चरणस्पर्शाने घेऊन लगेच दवाखान्यात त्या नवोदित मुलाच्या अंगाला लावण्यास व उरलेली त्याच्या उशीकडे ठेवण्यास नर्सला सांगितले. पण ती आय.सी.यु.मध्ये मूल असल्याने तसे करावयास तयार नव्हती. शेवटी डॉक्टरच्या परवानगीने तिने उदी मुलाला लावली. माझे थोडे समाधान झाले. इकडे त्याचदिवशी सायंकाळी त्या मुलाचा एक्स-रे रिपोर्ट व इतर रिपोर्ट डॉक्टरला मिळाले. त्यावरून त्यांनी मुलाच्या जीविताची शक्यता कमी असल्याचे निदान केले. आम्ही हे ऐकून फारच व्यथित झालो; आणि अशा मन:स्थितीत बाबांचीच करूणा भाकू लागलो. डॉक्टरांचे सर्व प्रयत्न चालू होतेच. ५-६ दिवस त्याला आय.सी.यु.मध्येच ठेवावे लागले. थोडे ग्रीन सिग्नलस् दिसायला लागल्यानंतर, डॉक्टरांनी पुन्हा पूर्वीच्या प्रक्रिया व एक्स-रे काढावयास आम्हाला सांगितले व त्याचा रिपोर्ट मिळाल्यानंतर डॉक्टरांनी सुटकेचा नि:श्वास टाकला. नि:श्वास टाकताना त्यांच्या तोंडून उद्गार निघाले,

"थँक्स् गॉड! याला परमेश्वरानेच वाचविले! ही तर फारच क्रिटिकल केस होती!"

त्यांचे हे उद्गार ऐकून मी म्हणालो,

"डॉक्टर, तुमचा देवावर विश्वास आहे का?"

ते म्हणाले,

"ही केस पाहून ठेवावाच लागेल!"

त्यावर मी म्हणालो,

"ही आमच्या साईबाबांची कृपा! त्यांच्याच कृपाप्रसादामुळे आमच्या डोळ्यांतील अश्रू पुसले गेले!"

त्या नवोदित मुलाच्या छातीच्या पहिल्या एक्स-रेवरून पूर्ण छाती आतून पांढरीफट्ट दिसत होती. हार्ट ॲबनॉर्मल होते व त्याला श्वासोच्छ्वास घ्यायला बरेच कष्ट होत होते. सहाव्या दिवशी काढलेला एक्स-रे पूर्णपणे क्लियर निघाला व ८० टक्के प्रकृतीत सुधारणा दिसली, थोडे वजनदेखील वाढले. काही दिवस दवाखान्यात ठेवून डॉक्टरने त्याला डिसचार्ज दिला. आज तो मुलगा बाबांच्या आशीर्वादाने तीन वर्षांचा झाला आहे. प्रकृतीतही उत्तम सुधारणा झाली आहे.

त्याचे काढलेले दोन्ही एक्स-रे, फिल्मस् आमच्या मुलीजवळ (डोंबिवलीला) उपलब्ध आहेत. बाबांनी दिलेले स्वप्न आणि पोपट यांची सांगड व प्रचिती प्रत्यक्षात नातवाच्या रूपात आली.

लहानसहान अनेक अनुभव बाबांच्या भक्तीमुळे मला लाभलेले आहेत. एक गोष्ट ठामपणे सांगतो की बाबांवर अतुट श्रद्धा असेल तर कठीण प्रसंगदेखील पार नाहीसे होतात. आजही त्या प्रसंगाची आठवण झाली की डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागतात, हृदय भरून येते. अशी कृपादृष्टी सर्व साईभक्तांवर राहो, हीच साईचरणी विनम्र प्रार्थना. •

# बाबांचा अतर्क्य चमत्कार !

(श्री. गणपत परब, वायंगवडे, सिंधुदुर्ग यांच्याकडून):

**श्री** साईबाबांच्या नामस्मरणाची व त्यांच्या उदीची किमया आणि त्यांचा अनुभव बाबा त्यांच्या लक्षावधी भक्तांना देत आले आहेत व पुढेही देत राहोत, ही त्यांच्या चरणी प्रार्थना करून मला आलेला त्यांच्या नामस्मरणाचा प्रताप आपणासमोर सादर करीत आहे.

ऑक्टोबर, १९८७ मध्ये माझे वडीलबंधु (कै. श्री. वि. स. परब) एकाएकी आजारी पडल्यामुळे त्यांना पहाण्यासाठी मी माझ्या मोठ्या मुलाला तीन दिवसांची रजा घेऊन गावी पाठविले. तो तिकडे गेल्यानंतर एक आठवडा झाला तरी त्याचे पत्र किंवा निरोप नसल्याने आम्ही उभयता चिंतेत पडलो व बाबांना नमस्कार करून गावी गेलो. तेथे जावून पाहतो तो काय, माझे वडीलबंधु तापाने फारच अशक्त होऊन त्यांना शब्दही उच्चारणे कठीण जात होते. खेडयात डॉक्टर नसल्यामुळे व त्यांचे वय ८० हून अधिक असल्यामुळे काय करावे तेच कळेना! बाबांना प्रार्थना करून मी त्यांना बाबांच्या उदीचे तीर्थ दिले. त्यामुळे त्यांना आराम वाटू लागला. परंतु एक दिवस ते त्यांच्या खोलीतच पडून त्यांच्या मांडीच्या फऱ्याचे हाड मोडले. डॉक्टरांनी अभिप्राय दिला की ऑपरेशन करून स्टेनलेस स्टीलची पट्टी बसवावी लागेल. म्हातारपणामुळे ऑपरेशन करणे फारच कठीण होते. आम्ही उभयता गाव्हा गहन



कै. श्री. वि. स. परब

मुलाला मुंबईला पाठवून दिले. ते दिवस भात-कापणीचे असल्यामुळे घरची कामे आटोपल्यावर शेतात जावे लागत होते. वाईट घटना घडत असताना चांगल्याही घटना घडतात असे म्हटले जात. त्याप्रमाणे माझ्या मामाचे मोडकळीस आलेले घर दुरूस्त करण्याविषयी बोलणे निघाले. त्यावेळी माझी पत्नी सहज म्हणाली की दुरूस्त केले तर मुलांना बसायला जागा होईल. जुने घर पाडून नवे उभे करणे हे काही सोपे काम नव्हते. काहीही पूर्वतयारी नसताना पायाभरणीत बाबांची उदी ठेऊन कामाला सुरूवात केली आणि काय आश्चर्य! काही

# विलक्षण योगायोग की अद्भुत चमत्कार ?

(श्री. चकोर आजगांवकर, ठाणे यांच्याकडून):

दिनांक १२ मार्च, १९९३. श्री साईलीलेतील 'श्री साईबाबांच्या जीवनकथे'चा मी २७वा भाग लिहीत बसलो होतो. शीर्षक होते '**निर्वाणीचा सखा साईनाथ!**' कथा १९०२ ची होती. नानासाहेब चांदोरकर हे जामनेर येथे मामलतदार होते. त्यांची कन्या मैनाताई ही दोन-चार दिवस मरणप्राय प्रसूतीवेदनांमुळे विव्हळ झाली होती. शतचंडी यज्ञ, हवनविधी हे दैविक उपाय, तसेच सुईणीचा प्रयत्न वाया जात होता. प्राणांतिक अवस्था होती. नाना साईबाबांची करूणा भाकत होते. शिरडी येथे बाबा एकाएकी रामगीरबुवा गोसावी (बापूगीर) यांना म्हणाले की, ''बापूगीर, तू गावी जाण्यापूर्वी नानांच्या घरी जा! त्यांना ही माधव अडकर यांनी लिहिलेली **''आरती साईबाबा''** आरती व माझी विभूती दे! तेथे दोन दिवस विश्रांती घे! मग स्वतःच्या घरी जा!'' बापूगीर खानदेशातील आपल्या गावी परतत होते. त्यांच्यापाशी फक्त २ रूपये होते. ''एवढ्यात मी शिरडीहून जामनेरला कसा पोहोचेन? जळगावपर्यंत तिकिट १ रु. १४ आणे आहे'', असा विचार त्यांच्या मनी येताच बाबांनी त्यांना कोणतीही काळजी न करण्याचे सांगून सर्व व्यवस्था अल्ला करील, असे आश्वासन दिले. बापूगीर जळगाव स्टेशनवर उतरले. तेथे एक टांगेवाला त्यांना शोधीत आला व त्याने बापूगीरास जामनेरास पोहचविले. तेथून तो अदृश्य झाला. ही सर्व बाबांची लीला होती. बापूगीरांनी उदी मैनेला पोहचविली. नानांनी बाबांना निरांजन लावून **''आरती साईबाबा''** ही आरती म्हटली व मुलीचे प्राण वाचविण्याचे प्रार्थिले, करूणा भाकली. मैना सुखरूपपणे बाळंत झाली व बाळबाळंतीण यांची हातीपायी सुटका झाली. एवढी कथा लिहिली तेव्हा दुपारचे २-४५ झाले होते. माझी मुलगी (एअर इंडिया बिल्डिंग, नरिमन पॉईंट या इमारतीखालील) बँक ऑफ इंडियामध्ये काम करते. तिचा फोन मला तीन वाजता खणखणला. तिने बँकेच्याजवळ भीषण स्फोट झाल्याचे व लगतच्या ओमान बँकेचा विध्वंस झाल्याचे, तसेच तिच्या बँकेतही पडझड झाल्याचे सांगितले. ती या अगदी काही फुटावर घडलेल्या भीषण घटनेतून सहीसलामत सुटली होती. बाहेर पडताना तिच्या अंगावर छतातून पडलेल्या व फुटलेल्या काचांमुळे किरकोळ दुखापत झाली होती, पण ती त्या संकटातून सुखरूप बाहेर पडल्याचे वृत्त तिने सांगितले. मी बाबांचे मनःपूर्वक आभार मानले. ह्या दोन बँकांमध्ये उभ्या असलेल्या मारूती कारमध्ये असलेला बॉंब फुटला तरी तिची बँक व तिचा स्टाफ किरकोळ दुखापतीवर या दुर्धर प्रसंगातून सुटला. ही कृपाकथा व हा कृपाप्रसंग एकाचवेळी घडला, यास एक योगायोग मानावयाचे की चमत्कार, ते वाचकांनीच ठरविलेले बरे!

आसन्नप्रसव नानांची दुहिता। असह्य चालल्या प्रसूतिव्यथा। जामनेराहून साईसमर्था। हांका सर्वथा मारिती॥६५॥ बाबांसीं भक्तांची एकात्मता। जाणून नानांचे एथील अवस्था। समर्थ साई द्रवले चित्ता। करिती तत्त्वतां तें काय॥६७॥ उदी धाडावी आलें जीवा। इतुक्यांत गोसावी रामगीरबुवा। जाहला तयाच्या मनाचा उठावा। आपुले गांवा गमनार्थी॥६८॥ गांव तयांचा खानदेशीं। निघाला सर्व तयारीनिशीं। पातला बाबांचे पायांपाशीं। दर्शनासी मशीदीं॥६९॥ जयास बाबा प्रेमभावा। वाहती 'बापूगीर' या नांवा। म्हणती जाई खुशाल तूं गांवा। मार्गी विसांवा घे थोडा॥७५॥ आधीं जाई जामनेरा। उतर तेथें नानांच्या घरा। घेऊनि तयांच्या समाचारा। मग तूं पुढारा मार्ग धरीं॥७६॥ वदती 'ही पुडी आणि ही आरती। नेऊनि देईं नानांप्रती। पुसूनि क्षेम कुशल स्थिती। निघें पुढती निज गांवा' ॥७९॥ एक रुपया चवदा आणे। भरलें अग्निरथाचें देणें। उरलें अवघें चवलीचें नाणें। कैसेनि जाणें पुढारा॥८८॥ ऐसा गोसावी चिंतातुर। असतां जळगांव स्टेशनावर। तिकीट देऊन पडे जों बाहेर। शिपाई दूर देखिला॥८९॥ शिपाई आधींच शोधावर। येऊनियां उतारूसमोर। पुसे शिर्डीचा बापूगीर। तो कोण साचार कथा हो॥९०॥ बुवांस अत्यंत आनंद झाला। नानांस शिर्डीहून निरोप गेला। तरीच हा वेळेवर तांगा आला। घोरचि चुकला हा मोठा॥९३॥ तांगा प्रवेशतां गांवाभीतरीं। दिसूं लागली नानांची कचेरी। घोडेही विसंवले क्षणभरी। सुखावे अंतरीं रामगीर॥१०३॥ बुवांस दाटली लघुशंका। बसाया गेले बाजूस एका। पूर्वस्थळीं परतती जों कां। आश्चर्य देखा वर्तलें॥१०४॥ नाहीं तांगा, नाहीं घोडी। दिसेना तांगेवाला गडी। कोणीही तेथें न दिसे ते घडी। जागा उघडी देखिली॥१०५॥ रामगीर मनीं विचारी। चमत्कार हा काय तरी। आणोनियां मज येथवरी। इतुक्यांत दूरी गेला कुठें॥१०६॥ बुवा वाटेनें पुसत चालला। सहज नानांचा पत्ता लागला। ओटीवर जों जाऊन बैसला। आंत बोलाविला नानांहीं॥१०८॥ परस्परांची भेट जाहली। उदी आरती बाहेर काढिली। नानांचिया सन्मुख ठेविली। वार्ता निवेदिली संपूर्ण॥१०९॥ जैसें क्षुधार्ता अकल्पित। ताट यावें पक्वान्नपूरित। किंवा तृषित चकोरा मुखीं अमृत। तैसें तंव होत नानांला॥११२॥ हांक मारिली कुटुंबाला। उदी दिधली पाजावयाला। स्वयें आरती म्हणावयाला। आरंभ केला नानांहीं॥११३॥ वेळ क्षणभर गेला न गेला। बाहेर आंतून निरोप आला। ओठास लावितां उदीचा प्याला। आराम पडला मुलगीस॥११४॥ तात्काळ क्लेशनिर्मुक्ति जाहली। मुलगी निर्विघ्न प्रसूति पावली। सुखानें हातींपायीं सुटली। काळजी फिटली सर्वांची॥११५॥ तांगेवाला कुठें गेला। येथेंही मज नाहीं आढळला। रामगीर पुसे नानाला। तांगा धाडिला तो कुठें॥११६॥ नाना वदती म्यां न धाडिला। तांगा कुठला ठावा न मजला। तुम्ही येतां हें ठावें कुणाला। तांगा कशाला धाडीन मी॥११७॥ मग बुवांनीं तांग्याची कथा। आमूलाग्र कथिली समस्तां। विस्मय दाटला नानांचे चित्ता। पाहूंनि वत्सलता बाबांची॥११८॥ कुठला तांगा, कुठला शिपाई। नट नाटकी ही माउली साई। संकटसमयीं धांवत येई। भावापायीं भक्तांच्या॥११९॥

–श्री साईसत्‌चरित, अध्याय ३३

महिन्यांतच एक टुमदार घर उभे राहिले. यासाठी माझ्या पत्नीने फारच कष्ट घेतले. श्री. मोहनलाल अग्रवाल यांच्या मताप्रमाणे चमत्कारांचे मायाजाल फक्त मोहक असते, ते चिरस्थायी व श्रेयस्कर नसते; पण बाबांचे नामस्मरण चिरस्थायी आहे, याची प्रचिती मला आली. दिनांक २६ ऑगस्ट, १९९२ रोजी वडीलबंधुंनी या जगाचा निरोप घेतला व या इहलोकीच्या त्यांच्या मरण-यातना संपल्या. त्यांच्या मरणानंतर दुसरेच संकट उभे राहिले. त्यांची पत्नी श्रीमती लक्ष्मी पार थकली व तिला बाहेर जाणेही कठीण होऊन बसले. त्या तिच्या अशा अवस्थेमुळे मी खूपच घाबरलो. अशी परिस्थिती येऊन ठेपली की माझ्यासारख्या ७६ वर्षाच्या म्हाताऱ्याने काय करावे, तेच काही सुचेना! बुधवार,



कै. श्रीमती लक्ष्मी वि. परब

दिनांक २ डिसेंबर, १९९२ रोजी रात्री ९ वाजता मी बाबांना श्रद्धापूर्वक प्रार्थना केली व झोपी गेलो.... आणि सांगायचं नवल म्हणजे, बाबांनी तिची गुरूवार, दिनांक ३ डिसेंबर, १९९२ रोजी पहाटे ४ वाजता हालअपेष्टांतून सोडवणूक केली.

# होए साम्याजी उजरी

–श्री. एस्. ए. कुलकर्णी
मिरज.

**सा**तशे वर्षापूर्वी ज्ञानेश्वर माउलीने 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथराजाची निर्मिती केली आणि साम्यता, एकता, सामाजिक सभ्यता आणि विनम्रता यांची हिरीरीने तरफदारी केलेली आहे. त्यांचे हे मार्मिक व बोधप्रद विचार आजही वादातीत आहेत. या भारतभूमध्ये आज जे काही घडते आहे त्याची चाहूल ग्रंथनिर्मितीच्यावेळी त्यांना लागली असावी असं वाटतं. कर्मठ धर्मवाद, संप्रदायवाद, उच्च-नीच ह्या बाबींवर त्यांनी खूप निवेदन केलेलं आहे. श्रीमद्भगवद्गीतेच्या श्लोकांचा आधार घेऊन माउलीनं साम्यतेचं तत्त्वज्ञान जागोजाग विस्तृतपणे आणि सुरेख दृष्टांतानं चोखपणे सिद्ध केलेलं आहे. **'यो मां पश्यति सर्वत्र सर्वंच मयि पश्यति। तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति॥'** – या श्लोकाच्या विवरणात माउली म्हणते– **'भूतांचेनि अनेकपणें। अनेकु नोहे अंतष्करणें। केवळ एकत्व चि माझें जाणे। सर्वत्र जो॥ तऱ्हैं दीपा आणि प्रकाशा। एकवंकैयेचा पाडु जैसा। तो माझा ठांइ तैसा। मी तेयामाझी॥ जैसा उदकाचेनि आयुर्ष्ये रसु। कां गगनाचेनि मानें अवकाशु। तैसा माझेनि रूपें रूपसु। पुरुषु गा तो॥'** भूतमात्रे विविध स्वरूपाची असली तरी त्यांची अंत:करणे एकच असतात; त्यांचे शारीरिक अवयव, भोजन, निद्रा, जन्म, मृत्यू ह्या उपाधींमध्ये साम्यताच असते. एका धर्मसंप्रदायाची माणसे जेवतात– झोपतात, तशी दुसऱ्या संप्रदायाची माणसे दैनंदिन व्यवहार चालवितात. सर्व धर्मियांना जन्म आणि मृत्यू यांची सांगड लागू असतेच; विकार सर्वत्रच असतात– कदाचित त्यांचे प्रमाण कमी-अधिक असू शकेल एवढेच. दिवा आणि प्रकाश एकच; आकाश आणि पोकळी एकच; पाणी आणि रसता एकच. तेव्हा कातडीचा रंग, कुळातील जन्म यावरून माजणारा भेदाभेद अमंगळच असतो.

कुळ-वंश याबद्दल माउली म्हणते– **'अगा कुळाचिया चोखटपणा नलगा। अभिजात्यें झनें श्लाघा। व्युत्पत्तीचा वाउगा। सोसु कां वाहा॥ कर्णेविण सापटें। कणिसें लागली आथि एकदाटें। काइ कराल गोमटें। वोस नगर॥ तैसें सकळ तें विभव। कुळज्ञानगौरव। जैसें शरीर आहे सावयव। परि सांस चि नाहि॥ म्हणौनि कुळें जाती वर्ण। हें आघवें चि गा अकारण। एथ अर्जुना माझेपण। सार्थक एक॥ तैसें क्षत्री वैश्य स्त्रिया। कां शूद्र अंत्यादि इया। जाती तंव चि वेगळालिया। जंव न भजति मातें॥ तंव चि नदानदीची नांवें। तंव चि पूर्वपश्चिमें तेयां धांवे। जंव नैयंति आघवे। समुद्रापारिं॥'** – चोख कूळ किंवा नीच कूळ याला असा कोणता सार्थ अर्थ आहे! भरपूर सालपटे असलेली कणसे खूप असली आणि त्यामध्ये दाणे नसले तर त्या कणसांचा उपयोग काय! सुंदर शहर असले, पण ते जर निर्मनुष्य असले तर त्याला काय महत्त्व आहे! तसं हे कूळ-जातीचं वैभव किंवा त्याचा गौरव केवळ मस्तक नसलेल्या माणसाच्या जीवनाप्रमाणेच असते. शिरच्छेद झालेले शरीर म्हणजे प्रेतच! वैश्य, क्षत्रीय, अंत्यज, स्त्रिया हे भेदाभेद परमात्म्याचं सम्यग ज्ञान होईपर्यंतच अस्तित्वात असू शकतील. नद्यांची नावे, त्यांच्या वाहिनीदिशा हे सारं त्या समुद्रापर्यंत जाऊन मिसळण्याच्या अवस्थेप्रत असू शकतं. समुद्रात विलीन झाल्यावर ही नावे, त्यांच्या वाहिनीदिशा सारंकाही संपून जातं. तसाच हा कल्पित भेदाभेद आहे. नामदेव शिंपी, रोहिदास चांभार, चोखा महार, सेना न्हावी, शेख महंमद, शेख लतीफ, सगन कसाई, तुकाराम वाणी, सावता माळी, गोरा कुंभार, जना मोलकरीण, कान्होपात्रा आदींना संतपदवी नाकारता येईल काय! **'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्'**– असं खुद्द भगवान श्रीकृष्णांचं अभिवचन आहे. याला जरूर अर्थ आहे. **'यजन्ते सात्विका देवान्यक्षरक्षांसि राजसा:। प्रेतन्भूत-गणांश्चान्ये यजन्ते तामसा जना:॥'** – असं श्रीमद्भगवद्गीता सांगते. मानव आपल्या सात्विक, राजस, तामस या वृत्तीनुसार परमात्म्यामध्ये, त्याच्या उपासनापद्धतीमध्ये भेदाभेद करीत सुटतो. परंतु भगवंत सर्वांसाठी सारखाच आहे. **'भक्तु जेथ जैसेनि पाहे। तें तें मी होतु जाये॥'**– असं माउलीचं विवरण आहे. **'आणि स्वधर्मु तो पाळावा। परधर्मु तो गाळावा। हा नियमुचि गा पांडवा। न कीजे चि पां॥'**– असं माउलीचं आणखी महत्त्वपूर्ण विवरण आहे.

**'इश्वर: सर्वभूतानां ऱ्हद्देशेऽर्जुन तिष्ठति। भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया। तमेवं शरणं गच्छ सर्वभावेन भारत। तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यासि शाश्वतम्॥ सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज। अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच:॥'**– श्रीमद्भगवद्गीतेतील हे श्लोकही महत्त्वपूर्ण आहेत. त्यांचं विवरण करताना माउली म्हणते– **'तैसें धर्माधर्माचें टवाळ। दावी अज्ञान जें कां मूळ। तें त्यजूनि त्यज सकळ। धर्मजात॥ तैसा एकु मी वांचौनि काहिं। मग भिन्नाभिन्न आन नाहिं। स्वयंबोधें तेयाचां ठांइं। अनन्यु होयें॥'** धर्माधर्मातील भेदाभेद म्हणजे निव्वळ अज्ञान– एकप्रकारची टवाळखोरी. त्याचा त्याग कर, असं अर्जुनाला दुबार बजावून सांगितलेलं आहे. सर्वांभूती परमेश्वर हाच अध्यात्माचा मूलभूत पाया आहे. परंतु 'अहंकार'–'अभिमान' या प्रवृत्तीमधून अध्यात्म दुरावते. अभिमान असावा; परंतु तो दुराभिमान असून चालणार नाही. अहंकाराला स्वार्थाची जोड मिळाली म्हणजे त्यातून काहीही अनिष्ठ पुढे उभे राहते. हे ऐतिहासिक-पौराणिक-सामाजिक सत्य आहे, हे सांगणे नलगे. दुसऱ्यांनी आपला अवमान करू नये, अपनाम करू नये, असं आपल्याला ज्याप्रमाणे वाटतं त्याचप्रमाणे आपल्याबद्दलही इतरांना वाटतं, हे सत्य एकदा का स्वीकारलं म्हणजे जगातले बहुतेक प्रश्न संपुष्टात येऊ शकतात. परमेश्वर

सगुण की निर्गुण याचं उत्तर ज्ञानदेवांनी दिलेलं आहेच – **'सगुण निर्गुण एक गोविंद रे॥'** हे विसरून उपासना पद्धतीमध्येही मतभेद असावेत आणि त्यातून रक्तपात व्हावा, हे सर्वस्वी निराधार व बेजबाबदारपणाचे लक्षण आहे, असं मानावंच लागेल.

भगवंत सर्व भूतमात्रांमध्ये नि:पक्षपातीपणे स्थित आहे, असं श्रीमद्भगवद्गीता सांगते – **'समोऽहं सर्व भूतेषु न मे द्रेष्योऽस्ति न प्रिय:। ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यमहम्॥'** यावर विवरण करताना माउली सांगते – **'ते वर्तत असति देही। परि ते देहीं ना माझा ठांइं। आणि मी तेयांचां ऱ्हदर्यी। समग्रु असे॥ सविस्तर वटत्व जैसें। बीजकणिकेमाझि वसे। आणि बीजकणिका वसे। वटीं जेवि॥'** वृक्ष कितीही मोठा असला तरी त्याचे मूळ एका बीजामध्येच असते आणि ते बीज वृक्षाच्या फळांमध्ये असते. तसं भूतमात्रे आणि भगवंत यांचं स्वरूप आहे. हे तत्त्वज्ञान स्वीकारणं म्हणजेच आत्मज्ञान प्राप्त करून घेणं. आत्मज्ञान झाल्यावर भेदाभेदाचा प्रश्नच उद्भवत नाही – **'जें जें भेटें भूत। तें तें मानिजे भगवंत। हा भक्तियोग निश्चित। जाण माझा॥'** हे जाणल्यावर **'हे विश्वचि माझें घर। ऐसी मती ज्याची स्थिर। किंबहुना चरांचर। आपण जाला॥'** ही संतावस्था निर्माण होते. इथे अडथळा येतो एकाच बाबीचा – **'मग मशकु हा गजु। कां श्वपचु हा द्विजु। पैल इतरू हा आत्मजु। हें उरैल कैं॥ ना तरि धेनु हे श्वान। एक गरूये एक हीन। हें असो कैंचे स्वप्न। जागतेया॥ एथ भेदु तरि देखावा। जरि अहंभाओ उरला होआवा। तो आर्दी चि नाहिं आघवा। आतां विषम काइ॥ म्हणौनि सर्वत्र सदा सम। तें आपण चि अदूय ब्रह्म। हें संपूर्णतया जाणैं वर्म। समदृष्टयांचे॥'** ही माशी, हा हत्ती, हा अस्पृश्य, तो द्विज, हा आपला, तो परका, ही पवित्र गाय, तो हीन कुत्रा हा भेदाभेद मानणे म्हणजेच एक खोटे स्वप्न आहे. स्वप्नातून जागे झाल्यावर, आत्मज्ञान झाल्यावर हे सारं अदृश्य होऊन जाईल. असा भेदाभेद असला म्हणजे नक्की समजावं की यामागे 'अहंकार-अहंभाव' अस्तित्वात आहे. संत-सत्पुरुषांच्या ठायी तो असतच नाही – त्यांना सर्वत्र ब्रह्म-भगवंताचं स्वरूपच दिसतं. नामदेवराय भाकरी पळविणाऱ्या कुत्र्याच्यामागे तुपाची वाटी घेऊन धावू लागले – भाकरीवर तूप माखण्याच्या उद्देशाने. तहानेने तडफडणाऱ्या गाढवाला एकनाथांनी गंगेचं पवित्र तीर्थ पाजलं. थंडीने कुडकुडणाऱ्या वृद्धाला कबीरांनी आपला नवा-कोरा शेला फाडून पांघरण्यासाठी दिला. तुकोबारायांनी ऊस गल्लीतील सर्व मुलांना वाटून टाकले. स्वत:चा जीव धोक्यात घालून दामाजीपंतांनी अन्नधान्याविना तडफडणाऱ्या गावकऱ्यांना सरकारी कोठारातील धान्य मुक्तहस्ते वाटलं. ही संतांची आत्मज्ञानवृत्ती – सर्वांभूती परमेश्वर मानण्याची. सद्गुरू साईबाबा नेहमी म्हणत – **'सबका मालिक एक.'** ज्ञानेश्वर आणखी एका ठिकाणी विवरण करतात – **'आतां सुन्हदु आणि शत्रु। कां उदासु आणि मित्रु। हा भावभेदु विचित्रु। संकल्पु कैचा॥ तेय बंधु काइ कासेयाचा। द्वेषिया कव्हणु कैंहाचा। मी च विश्व ऐसा जेयाचा। बोधु जाला॥ मग तेयाचिये दृष्टी। अधमोत्तम किरीटी। काइ परिसाचिये कसवटी। वानिया जाणे॥ ते निर्वाण सुवर्णचि करी। तैसी तेयाची बुद्धि चराचरीं। होए साम्याची उजरी। निरंतर॥'** – अध्यात्मज्ञान झाल्यावर हा मित्र – तो शत्रू, हा कल्याणकारी – तो अपायकारी, हे विकल्प उरतच नाहीत. इथे बंधु कोण आणि द्वेष करावयाचा कोणाचा! मी म्हणजेच 'विश्व' ही भावना रूढ झाल्यावर हा विकल्प शिल्लक राहूच शकत नाही. परिस लोखंडाचे सोने करतो. सोनार सोन्याचा कस पाहू शकेल; परिसाचा कस तो काय पाहणार! अशा स्वरूपाची बुद्धी प्राप्त झाल्यावर साम्यतेला निश्चित तेज प्राप्त होऊ शकते.

एरव्ही कोणत्याही अधिकारपदाची धारणा घेऊन, सामाजिक सेवेचा बुरखा पांघरून, इतरांना दुखवून, अहंकाराच्या आहारी जाऊन कोणतेही कर्म केले तर ते कर्मकांडाचेच कट्टु प्रतीक ठरते व अंती निष्फळच बनते. या संदर्भात ज्ञानदेव आवर्जून सांगतात – **'मग अश्वमेधां कोडी कीजे। रत्ना भरूनि पृथिवी दीजे। एकांगुष्टीं हि तपिजे। तपसहस्रीं॥ जळाशयाचेन नावें। समुद्र ही कीजतु नवे। परि किंबहुना आघवे। वृथा चि तें॥ पाषाणावरि वर्षलें। जैसें भस्मीं हवन केलें। कां खेंव दीधलें। साउलिये॥ नातरि जैसें चडकणां। गगन हाणितलें अर्जुना। तैसा समारंभु सुना। गेला चि तो॥ घाणा गाळिले खडे। तेल ना पेंडि जोडे। तैसें दळिद्र तेवडें। ठेलें चि आंगीं॥ गांठि बांधली खापरी। एथ अथवा पैली तीरीं। न सरौनि जैसी भारी। उपवासिं गा॥'** कोटी अश्वमेध यज्ञ केले, पृथ्वीच्या वजनाचे रत्नदान केले, एका अंगठ्यावर उभं राहून सहस्र तप केले, समाजासाठी पाणी प्राप्त व्हावे म्हणून समुद्राएवढा विशाल जलाशय निर्माण केला, तरी हे सर्व व्यर्थच असते; पाषाणावर मुसळधार पाऊस कोसळला किंवा राखेमध्ये आहुती दिल्या अथवा साउलीला आलिंगन दिल्याप्रमाणे हे निरर्थक ठरते; हाती चाबूक घेऊन आकाशाला फटके मारण्यासारखा हा निष्फळ प्रयत्न होय! घाण्यामध्ये खडे घालून घाणा कितीही फिरविला तरी त्यातून तेलही मिळणार नाही वा पेंडही; दारिद्र्य तेवढे हात धुवून मागे लागणार; प्रवासाला निघताना शिदोरी म्हणून खापऱ्या घेतल्या बांधून तर उपवास घडून मृत्यूच कोसळणार – तसं हे आहे.

**'मग सर्वत्र सच्चिदानंदु। तैसा मी स्वत: सिद्धु। जो आपणेनसि भेदु। नेणौनि जाणें॥ तेणें चि सर्व जाणितलें। हें इं म्हणणें थेकुलें। जें तेया सर्व उरलें। द्वैत नाहिं॥ म्हणौनि माझेया भजना। उचित तो चि अर्जुना। गगन जैसें आलिंगना। गगनाचेया॥ क्षीरसागरा परगुणें। किजे क्षीरसागरपणें। कां अमृत चि होउनि मिळणें। अमृतिं जेविं॥'** जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी, जनसमुदायी एकच सच्चिदानंद परमेश्वर स्थित असतो सिद्ध स्वरूपात – हे ज्याने जाणून घेतले आहे, जो असे अनुभवतो, त्यालाच खरे ज्ञान प्राप्त झाले, असे मानावे लागेल. हा सिद्धांतही संपूर्ण म्हणता येणार नाही; कारण अशा मानवामध्ये द्वैतभावना शिल्लकच रहात नाही. असा मानवच भगवंताच्या भक्तीला योग्य ठरतो. गगनाने गगनाला आलिंगन द्यावे, क्षीरसागराने क्षीरसागराला मेजवानीचे

(पृष्ठ क्र. ३४ वर)

# स्वानंद-सम्राट साईबाबा

–श्री. शाम जुवळे
दादर (प.), मुंबई.

नाम आणि रूप यांच्या संदर्भात जी लीला अविरतपणे चालू आहे तिला 'विश्व' अशी संज्ञा आहे. ही विश्व-लीला म्हणजेच 'साईलीला' होय! शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध ह्या पाच विषयांपैकी फक्त 'शब्द' हाच प्रमुख विषय अंतरातून बाह्य प्रांगणात प्रवेश करीत असतो. म्हणून 'शब्द' ही ॐकाराच्या प्रणवाची लीला आहे. ज्या भक्ताला सम्राट साईबाबांच्या स्वानंदाची अनुभूती घ्यावयाची आहे त्याने प्रत्येक शब्दाचा सन्मान राखूनच संभाषण वा लेखन यांची कृती केली पाहिजे. व्यक्तिगत जीवन निष्कलंक राखून स्वानंदाची अनुभूती घेण्याचा हा 'साईमार्ग' होय! या साईमार्गावर जीवनाची वाटचाल करताना साईबाबांनी खालील महान मंत्र देऊन ठेवलेला आहे. या मंत्राचे आचरणयुक्त पालन प्रत्येकाला सक्तीने करावेच लागते.

**''वादावादी नाही बरी।**
**नको कुणाची बरोबरी।**
**नसता श्रद्धा आणि सबुरी।**
**परमार्थ तिळभरी साधेना॥''**

## अंतरीचा आनंद

देहाचे वैराग्य लाभो साईदेवा।
अहंता गळाया मीपणाची॥१॥
तुझीच आवडी उपजावी पोटी।
नाम तुझे ओठी सदा वसो॥२॥
विवेकाचे देई बसाया आसन।
ठेवी श्रद्धास्थान स्थिर माझे॥३॥
जगाचे मिथ्यत्व यावे प्रचितीशी।
तेणेच जीवा सौख्य लाभे॥४॥
मनाने असावे सदा अंतर्मुख।
भोगण्यासी सुख अंतरीचे॥५॥
विशुद्ध चित्ताची असावी धारणा।
उभारोनी फणा साईवरी॥६॥
''अहम् ब्रह्मास्मि'' यावे अनुभवा।
ध्यानी तो ठसावा प्रेमभाव॥७॥
ध्यान विरोनिया लागावी समाधी।
हीच परमावधी लाभो जीवा॥८॥
जीवन तरी हे कृपा तुझीच साई।
पूर्णत्वाची ग्वाही ऐक्यभाव॥९॥

स्वानंद-सम्राट साईबाबांचे लौकिक जीवन हे अलौकिक प्रेमाचे पवित्र जीवन आहे. आज सारे जग या दिव्य जीवनाने भारावून गेलेले आहे, त्याचे इंगित हेच होय! लाभेवीण प्रीत करणारा हा साऱ्या जगाचा महात्मा होय! 'राग' ही अनुरागाची प्रतिकृती, जीवनात कशी वापरावी, याचे प्रात्यक्षिक बाबांनी जगाला यशस्वीरीत्या करून दाखविले. केवळ स्वतःच्या दैनंदिन आचरणाद्वारे नीती-धर्माचे महान धडे या महात्म्याने जगाला दिले. त्यागातून डोकावणारा 'स्वानंद' हा मनाचे पावित्र्य कसे अबाधित ठेवीत असतो, हे बाबांनी स्वतःच्या जीवनावरून जगास दाखवून दिले. मनाचे हे पावित्र्यच जीवनाचे प्रशांति-स्थान होय! स्वानंद व प्रशांती हे जीवन-पक्षाचे जगामध्ये विहार करण्यासाठीचे दोन पंख होत, असे बाबांनी जगाला शिकविले.

---

(पृष्ठ क्र. ३३ वरून)

आमंत्रण द्यावे किंवा अमृताने अमृतात मिसळून जावे– असा हा प्रकार असतो.

हीच 'साम्याची उजरी'. ती प्राप्त करून घेण्यासाठी यात्रा-पदयात्रा यांचा काहीही उपयोग होणार नाही. देशातील आजच्या जीवघेण्या संकटकाळामध्ये आत्यंतिक जरूरी आहे ती अठरा पगड जाती-जमातींना समवेत घेऊन समभावनेने वारकरी संप्रदायाच्या प्रसाराची. संतच अचूक मार्ग दाखवू शकतात. **'काय वानूं मी या संतांचे उपकार। मज निरंतर जागविती॥'**; **'संतांचिया गांवीं प्रेमाचा सुकाळ। नाही तळमळ दुःख लेश॥'**; **'संत मारगीं चालती। त्यांची लागो मज मातीं॥'**; **'जें कां रंजले गांजलें। त्यासि म्हणे जो आपुले। तो चि साधु ओळखावा। देव तेथेंचि जाणावा॥'** – असं तुकोबारायांनी बजावलेलं आहे. आज गरज आहे ती या विचारमूल्यांच्या प्रसाराची. ज्ञानेश्वरी, तुकाराम-नामदेव गाथा, एकनाथी भागवत आदी संतवाङ्मयाचा सर्व भाषांमध्ये अनुवाद झाला पाहिजे व त्याचे अध्ययन शाळा-कॉलेजांमध्ये सक्तीचे केले पाहिजे. म्हणजेच भरकटलेली मने ताळ्यावर येऊ शकतील. विज्ञान व बुद्धिवाद जरूर असावा; परंतु त्याच्याहीपलीकडे जे अध्यात्म आहे त्याचे अध्ययन अधिक आवश्यक आहे. आकाशवाणी, दूरदर्शन, पत्रकारिता, भजन, कीर्तन, निरूपण, प्रवचन आदी माध्यमांद्वारे हेच प्रामुख्याने शिकविलं पाहिजे. बोलपटांमध्ये बलात्कार, मारामाऱ्या, नशाबाजी, नग्नसौंदर्य यांचाच मागोवा आपण घेतला, तर भ्रष्टाचार-दुराचार यांना वेसण घालता येणे अशक्यप्राय आहे. धर्म-जाती-जमातीवर आधारित राजकारणाने फार तर मते मिळतील, सत्ता मिळेल; परंतु सामाजिक साम्यता दुरावत गेल्याविना राहणारच नाही. **'होए साम्याची उजरी'** यासाठीच कार्यक्रमांची योजना होणे अगत्याचे आहे.

**व्यक्तिगत किंवा सांघिक अहंकाराचा निचरा करा!**

# जय-जय परब्रह्म सद्गुरू

–श्री. भालचंद्र गन्द्रे
चेंदणी, ठाणे.

**सं**साररूपी भवसागरातून तरून जावून पैलतीर गाठण्यासाठी गुरूभक्ती अत्यंत आवश्यक आहे. तसेच गुरूभक्ती ही एकनिष्ठेने, एकचित्ताने, दृढतेने, निर्विकल्प व नि:संदेह मनाने करणे आवश्यक आहे. तप-अनुष्ठानानेही साध्य न होणाऱ्या गोष्टी केवळ अद्वैत गुरूभक्तीने सहजसाध्य होतात.

मनुष्ययोनी अनेक योनी फिरल्यावर प्राप्त होते. मात्र, जीव हा आपल्या पूर्वसंचितानुसार वर्तमान कर्मे करीत असतो. या जन्मात गुरूंनी सांगितलेली दृढ उपासना केल्यास मोक्ष निश्चित मिळत असतो. यासाठी गुरूचे मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्त्व असले तरी सद्गुरू मिळणे, तो जाणणे नि त्याने आखून दिलेला मार्ग अनुसरणे याही गोष्टी भाग्यात असाव्या लागतात. संतांच्या सातत्याने संपर्कात असूनही कित्येक जीवन मोह, माया, पैसा यातच शेवटपर्यंत अडकतात नि मोक्षाचा पैलतीर गाठण्याचे साफ विसरून पुन:श्च जन्ममृत्यूच्याच फेऱ्यात अडकतात. प्रत्येक जीवावर सुक्षपणे त्याच्या अनेक जन्मांतील संस्कार, विचार-आचारांची पुटे असल्यामुळे त्याच्या चित्तवृत्ती जागृत करून त्याला निश्चित गती देण्यासाठी सद्गुरूंच्या उत्तम मार्गदर्शनाची नितांत आवश्यकता आहे. यासाठी शिष्याकडे शिकण्याची आवड, जिज्ञासूवृत्ती, सातत्य, प्रयत्न नि महत्त्वाचे म्हणजे श्रद्धा असणे फार आवश्यक आहे. विविध ग्रंथपठन, शास्त्रअध्ययन यामुळे बौद्धिक विकास निश्चित साधतो, परंतु आत्मज्ञान व परमानंद मिळण्याची किमया फक्त गुरूकृपेनेच साध्य होते.

अध्यात्म-मार्गात काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे षड्रिपु हिंस्त्र श्वापदासारखे दबा धरून बसलेले असतात. निश्चित उपासना-मार्गाने आगेकूच करणाऱ्या साधकासही हे षड्रिपु कुठल्या वळणावर केव्हा अडवतील नि क्षणात त्याला पुन्हा खालच्या पायरीवर केव्हा नेऊन सोडतील याचा नेम नसतो. यासाठी गुरूरूपी शिडीचा भक्कम आधार श्रद्धापूर्वक घेऊन, ज्ञानाची एकेक पायरी आस्ते कदम चढून अंतिम लक्ष्य गाठावयास हवे. गुरूला प्रसन्न केले असता, ईश्वर आपल्या आधीन होऊन, परमसत्याची, परमज्ञानाची प्राप्ती होते. गुरू हा चारी वेद जाणणारा कृपेचा महासागर आहे. म्हणून गुरूवर अढळ निष्ठा व श्रद्धा ठेवून सर्वस्व त्याला अर्पण केल्याने गुरू शिष्याची माउली बनून त्याचा उद्धार करतो. शिष्याचा सारा भार गुरू स्वत:च्या शिरावर घेऊन, शिष्याच्या सर्व शंकांचे निरसन करतो, त्याला परमज्ञान, परमानंदाचा अनुभव देतो व त्याच्या मोहमायारूपी अंध:काराची पटले क्षणात दूर करतो. ज्याप्रमाणे चंद्राच्या शीतल प्रकाशात सर्व तापाचे निर्मूलन होते, कल्पवृक्षाच्या छायेत इच्छित फलप्राप्ती होते, तसे गुरूकृपेने सर्व पाप-तापांचे क्षालन होऊन ज्ञानप्राप्ती होते. हे अखंड ब्रह्मांड सद्गुरू-स्वरूप असल्यामुळे सद्गुरू-सेवा व सद्गुरू-वचनाचे पालन हेच ब्रह्मप्राप्तीचे सर्वश्रेष्ठ साधन आहे. त्यामुळे द्वैतभाव न उरता कर्ता-करविता सद्गुरूच जाणल्याने सुख-दु:खाची बाधा जीवाला होत नाही. गुरूकृपेमुळे शिष्य परमपदाला पोहोचल्याची अनेक उदाहरणे आहेत. उदाहरणार्थ:

श्री स्वामी समर्थ– बाळाप्पा महाराज
श्री रामकृष्ण परमहंस– स्वामी विवेकानंद
श्री जनार्दन स्वामी– संत एकनाथ
श्री समर्थ रामदास– कल्याण
श्री स्वामी रामतीर्थ– नारायण स्वामी
श्री निवृत्तीनाथ– ज्ञानेश्वर महाराज
श्री विसोबा खेचर– संत नामदेव
श्री साईबाबा– उपासनी महाराज
श्री सिद्धारूढ स्वामी– कलावती आई

सद्गुरूचे कृपा-प्रेम प्राप्त झाल्याने भवरोगाचा समूळ नाश होऊन, आसक्ती विरल्याने सर्व वासना नष्ट होऊन जीव शेवटी परमानंदास प्राप्त होतो. यासाठी ज्ञान, योग, कर्म व भक्ती ह्या मार्गांतील सद्गुरूंचे परमोच्च स्थान ध्यानी धरून, सद्गुरू-वचन पाळल्यास जीवाला याची देही मोक्ष प्राप्त होईल हे निश्चित!

॥ गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णु: गुरूर्देवो महेश्वर:।
गुरू: साक्षात् परब्रह्म तस्मै: श्री गुरवे नम:॥

## 'ध्यानी मनी राम राम'

प्रात:समयी 'रामाच्या' आठवणीसाठी
प्रहरालाही 'रामप्रहर' म्हणतो
कुणी दाखविला 'रामबाणा'
तर 'रामशास्त्री-बाणा' म्हणतो
कर्मात 'राम' नाही वाटला तर
'राम' नाही म्हणतो
'रामाशिवाय कुडी' त्याने
'राम' म्हटला म्हणतो
'राम राम' असे वंदन केल्याने
जीव 'आत्मारामाचा' फुलतो
हरेक कार्यामागे 'राम' जोडून
पुकार 'रामनामाचा' वाढतो
उठता-बसता 'राम' म्हणून
शब्दपुकार 'रामाचा' फुलतो
ध्यानी-मनी 'राम' त्याचा
संसार 'रामप्रभु' करतो

**पुरुषार्थ करा!**
**कृतज्ञतेचा भाव ठेवा!**
**आर्थिक चिंता करू नका!**

# एकात्मतेचा संदेश देणारे महान संत
# शिरडीचे साईबाबा

–श्री. केशव देशमुख
नांदेड

महाराष्ट्र म्हणजे संतांची खाण असलेला प्रदेश. येथील संत-महंतांनी आपल्या कर्तृत्वाने आपल्या देशाचे नाव जगाच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक क्षेत्रात अजरामर करून टाकले आहे. अखिल जगातील मानवास जीवन-प्रकाश देणारी संतरत्ने याच भूमीत अवतरली. संतांच्या पावन वास्तव्याने ही भूमी समृद्ध झाली आहे. महाराष्ट्रात संतरूपाने प्रत्यक्ष परमेश्वर वारंवार अवतरत असतो. देव आणि संत हे अभिन्न आहेत. संत ही देवाची प्रत्यक्ष रूपे आहेत. देव ते संत व संत ते देव. देवस्वरूप अनिर्वचनीय आहे. संत हे देवस्वरूप असल्यामुळे त्यांचेही यथार्थ स्वरूप कोणास वर्णिता येणार नाही. संतांच्या बाह्यरूपात, राहणीत, बोलण्यात, चालण्यात, स्वभावात, परिस्थितीत भेद असतील, दिसतील; पण त्यांचे अंतरंगस्वरूप एकच आहे. कोणी गृहस्थाश्रमी वर्णाश्रमधर्म पाळून शिस्तीने राहत असतील, कोणी फटिंगपणे वागतील, कोणी सौम्य व शांत दिसतील, कोणी उग्रता धारण करतील, कोणी जगाशी फटकून वागतील, कोणी जग सुधारण्याचा अट्टहास करतील, कोणी ज्ञाननिष्ठ, कोणी योगारूढ, कोणी भक्तिमार्गी, कोणी कर्मप्रवण असतील. संतांच्या बाह्यरंगात विविधता असते; पण सर्व संत अंतर्यामी भगवत्स्वरूपाकार असतात. संतचरित्रे म्हणूनच सर्व लोकांना तारक, मार्गदर्शक असतात. संतमाउलीचा प्रेमपान्हा मिळाल्याशिवाय आजवर कोणीही उद्धरला नाही. सर्व संत गुरूरूप आहेत, असे मानून त्यांच्या अंतरंगाशी मिळून जावे. आपले निजसुख आपण संतांच्या सहवासात भोगावे. धर्म, पंथ, संप्रदाय, उपासना-मार्ग, जात, गोत, धन, दौलत, रूप, रंग, लिंग, वय, विद्या हा सारा बहिरंग आहे. संतपण याहून पलीकडे आहे. संतचरित्रात ते धुंडावे. संतरूप-आरशात आपण आपले निजरूप पाहावे व सुखरूप व्हावे. संतसेवा ही भगवद्सेवा आहे. संतांची सेवा करणे, हा आत्मश्रेयाचा मार्ग आहे.

वरील उताऱ्यात संतांबद्दल जे वर्णन केले आहे त्या वर्णनाप्रमाणे मराठवाड्यातील मानवत गावी जन्मास आलेल्या साईबाबांची यात गणना होते.

**साईबाबांच्या जन्माचा पूर्वेतिहास :**

साईबाबांच्या सूचनेप्रमाणेच संतकथामृत, भक्तलीलामृत व भक्तिसारामृत हे तीन संतचरित्रात्मक ग्रंथ श्री दासगणूंनी लिहिले. भक्तिसारामृत ग्रंथाच्या सव्वीसाव्या अध्यायात गोपाळ महाराज शेलवाडीस (सेलूस) कसे येऊन स्थायिक झाले, श्री व्यंकटेशाच्या कृपेने गोपाळ-सुशिला या दांपत्याच्या पोटी पूर्वजन्मीच्या रामानंदस्वामींनी कसा जन्म घेतला, यासंबंधीचा वृत्तांत आलेला आहे. गोपाळ महाराज उत्तर भारतातील तीर्थस्थळांना भेटी देत देत अहमदाबादेस आलेले असताना सुबागशहाच्या दर्यात गेले. त्यावेळी समाधीस घाम फुटला व कबरीतून, ''सलाम आलेकूं'' असा आवाज आला. इतकेच नव्हे तर सेलूपासून पाच कोस अंतरावर असलेल्या मानवत गावी एका फकिराच्या पोटी तुमचा पूर्वजन्मीचा शिष्य कबीर जन्मास येणार असल्याचे सांगितले. काही दिवसांनी पन्नाशीच्या वयातील एक स्त्री आपल्या पाच वर्षाच्या मुलाला घेऊन सेलूस आली व महाराजांना म्हणाली,

''माझा नवरा देवाघरी जाऊन सव्वा महिना झाला. तो हयात असतानाच सेलूस जाण्याविषयी त्याने मला सांगितले होते. त्याप्रमाणे मी आपल्या मुलासह आश्रयार्थ आले आहे.''

महाराजांनी आपल्याच घराच्या अंगणातील एका खोलीत तिची राहण्याची व्यवस्था केली. पुढे काही दिवसांनी फकीर कांता देवाघरी गेली व मुलाची सर्वस्वी जबाबदारी महाराजांवर आली. महाराजांनी त्या मुलास घेतले व घोर अरण्यात घेऊन गेले. सेलूची मंडळी महाराजांचा शोध घेत अरण्यात गेली. पाहतात तो एका पर्णकुटीत मूल समोर घेऊन महाराज झोपलेले आहेत. शोध घेत आलेल्या मंडळींपैकी एकास त्या फकिराच्या मुलाचा राग आला व त्या मुलाला कायमचे नाहिसे करण्यासाठी एक वीट फेकून मारली. मुलाचा घात करण्यासाठी मारलेली वीट महाराजांनाच लागली. खोक पडून शरीर रक्तबंबाळ झाले. महाराजांनी खोकीत चुना भरून खोक बंद केली व फडके डोक्यास बांधले. सज्जनगडावर शिष्य मंडळींत वाद निर्माण झालेला असताना समर्थांनी ज्याप्रमाणे कल्याणस्वामीस डोमगावी पाठविले तद्वतच महाराजही या मुलास इतरत्र पाठविण्यास तयार झाले.

**गुरू-शिष्य संवाद :**

एके दिवशी जवळच असलेल्या लमाण तांड्यात जाऊन हुल्ला लमाणीच्या घरी असलेल्या कपिला गाईचे दूध काढून आणण्यास महाराजांनी आपल्या शिष्याला सांगितले. शिष्य तांड्यात दूध आणण्यास गेला असता गाईच्या मालकाने गाय वांझ असल्याचे सांगितले. पंधरा वर्षे झाली तरी तिने कांसही केलेली नाही, हे ऐकून शिष्य रिक्त हस्ते परतला. दुसऱ्या वेळी महाराज स्वतःच दूध काढण्यास गेले व लमाण्यास म्हणाले,

''अरे, या गाईने शरीरात आतल्या बाजूनेच कांस केलेली आहे.''

महाराजांनी गाईच्या पाठीवर थाप मारली व हात फिरविताच गाय पान्हवली आणि

तिने तीन शेर घट्ट दूध दिले! गाईचा मालक आश्चर्याने पाहतच राहिला. महाराजांनी ते सर्व दूध आपल्या शिष्यास दिले व सांगितले,

''तू आता येथे न राहता गोदावरीच्या काठाकाठाने दक्षिण भागात जाऊन रहा!''

त्यानंतर त्यांनी आपल्या डोक्याचे फडके सोडून ते शिष्याच्या डोक्यास बांधले आणि म्हणाले,

''माझे सर्वस्व आज तुला दिले. मी सेलूस जातो व समाधी घेतो.''

इतक्यात बरीच मंडळी तेथे आली व म्हणाली,

''महाराज, आमच्यातील या माणसाचा प्राण गेला असून याला सजीव करा! जीवदान द्या! कृपा करा!''

महाराज म्हणाले,

''बाबांनो, मी माझे सर्वस्व या शिष्याला अर्पण केले आहे. तुम्हाला विनंतीच करावयाची असेल तर या मुलास करा!''

सर्व लोक त्या पोरास विनंती करू लागले,

''बाबा रे, तू साई झाला आहेस, असे तुझ्या गुरूचे म्हणणे आहे. तेव्हा या प्रेतास जिवंत कर!''

शिष्याने गुरूकडे आज्ञेस्तव पाहिले व गुरूनेही होकारार्थी मान डोलाविली. शिष्याने गुरूची आज्ञा प्रमाण मानून गुरूच्या पायाची माती आपल्या हाताने त्या प्रेताच्या कपाळास लाविली आणि काय चमत्कार! कपाळास माती लागताच प्रेत सजीव झाले व उठून बसले. लोकांनी गुरू-शिष्याची भव्य मिरवणूक काढली. दुसऱ्याच दिवशी गुरूंनी सर्व लोकांना पूर्वकल्पना देऊन मार्गशीर्ष शुद्ध एकादशीस सेलू मुक्कामी देह ठेविला. देह ठेवण्यापूर्वी संपूर्ण गीतेचा पाठ केला व शिष्याला सेलू सोडून ताबडतोब जाण्यास सांगितले. फकीर-शिष्याने गुरूजींनी दिलेल्या धोतराचीच कफनी करून अंगात घातली व सेलू सोडले. दासगणू भक्तिसारामृतात वर्णन करतात:

**मला वाटते शिर्डीचे।**
**समर्थ साईबाबा साचे॥**
**तेंच हे पोर फकिराचे।**
**असावे की नि:संशय॥२६-२३२॥**

**श्री साईबाबांची भेट:**

१८९६ साली श्री. नानासाहेब चांदोरकरांच्या समवेत दासगणू महाराज प्रथमच शिरडीस साईबाबांच्या दर्शनाकरिता गेले. श्री साईबाबांशी त्यांचा परिचय जसजसा वाढत गेला, त्यांच्या त्रिकालज्ञानाचा प्रत्यय आला, तसतसे श्री साईबाबाही अलौकिक विभूती आहे, याची साक्ष पटून बाबांच्या चरणी दासगणूंची निष्ठा स्थिरावली. ''श्री साईबाबा हे माझेच स्वरूप आहेत,'' असे सद्गुरू वामनशास्त्री इस्लामपूरकरांनी जे सांगितले होते, त्याची प्रचिती आली. शेवटी तर –

**''शिरडी माझे पंढरपूर।**
**साईबाबा रमावर॥**
**शुद्ध भक्ती चंद्रभागा।**
**भाव पुंडलीक जागा॥''**

असे मानण्याइतके उज्ज्वल स्वरूप प्राप्त झाले. साईबाबांच्या आज्ञेप्रमाणेच दासगणूंनी नोकरी सोडली व पुढे दोन-तीन वर्षे ते बाबांच्याच सहवासात होते.

एकदा काही विशेष पर्वाच्या निमित्ताने गोदास्नानास जावे, असा श्री दासगणूंचा विचार होता. त्यासाठी ते साईबाबांची पुणतांब्यास जाण्याकरिता संमती मागत होते व बाबा संमती देत नव्हते. उद्या जा! परवा जा! इतक्यात काय घाई आहे? अशा शब्दांनी अडवावे व जाऊ देऊ नये, असे बाबा करीत होते. परंतु या वेळेस गोदावरीस स्नानास जाण्याची इच्छा महाराजांच्या मनात प्रबळ होती. गोदावरीविषयी त्यांना अत्यंत जिव्हाळा. गोदेचा उल्लेख केव्हाही करण्याचा प्रसंग आला तर **'माय माझी गोदावरी'** या शब्दात करावा. महोदयासारखे पुण्यकारक पर्व, गोदावरी चार कोसावर, पण अनेक वेळा विनंती करूनही बाबा परवानगी देत नव्हते. बाबा म्हणाले,

''इतकी तळमळ रे कशासाठी गणू? विशेष दिवशी गोदास्नानात काही अधिक आहे का? गोदा नेहमीच जवळ असावी. आपल्याजवळ आहे. उगीच दु:ख का करतोस!''

पर्व दिवशी सकाळीच श्री दासगणू श्री साईबाबांच्या दर्शनास गेले. चरणावर मस्तक ठेविले आणि चरणांस हात लाविला, तो बाबांच्या पायांच्या दोन्ही अंगठ्यांतून निर्मल जलधारा स्त्रवू लागली. श्री दासगणूंनी ते पाणी ओंजळीत घेतले. अत्यंत श्रद्धेने स्वत:च्या डोक्यावर शिंपडले आणि गोदास्नानापेक्षाही निरूपम आनंद उपभोगिला. बाबा म्हणाले,

''झाले का समाधान गणू?''

या चमत्कारामुळे श्री दासगणूंच्या मनामध्ये श्री साईबाबांच्या विषयीची श्रद्धा दृढ झालीच, परंतु तीर्थस्नानाचे खरे उद्दिष्ट काय, तेही या प्रसंगाने त्यांच्या मनावर कायमचे ठसले. आध्यात्मिकदृष्ट्या हेच खरे महत्त्वाचे आहे.

**त्रिकालज्ञानी बाबा:**

नांदेडास रतनजी सेठ म्हणून एक पारशी व्यापारी गृहस्थ होते. त्यांना बारा मुली होत्या, पण मुलगा एकही नव्हता. म्हणून ते मनातून दु:खी असत. दासगणू महाराजांनी त्यांना बाबांचे दर्शन घेण्यास सांगितले होते. रतनजींच्या मनात जरी जावयाचे होते तरी कामाच्या व्यापामुळे ते जाऊ शकले नव्हते. एकदा इथलेच एक संत मौलवीसाहेब अचानक शेठजींच्या घरी आले. शेठजींनी मोठ्या भक्तीने त्यांची पूजा केली व नारळ, हार, पेढे, बर्फी इत्यादी वस्तू त्यांना अर्पण केल्या. मौलवीसाहेब प्रसन्न होऊन निघून गेले. पुढे बऱ्याच दिवसांनी रतनजी शिरडीस गेले. ते बाबांसमोर हात जोडून बसलेले असताना बाबा म्हणाले,

''तू मला पूर्वीच तीन रूपये चौदा आणे दक्षिणा दिली आहेस. तेव्हा काही काळजी करू नकोस. आज तर मशिदीत आला आहेस. अल्ला तुझी इच्छा पूर्ण करील जा!''

असे म्हणून बाबांनी शेठजींस उदी लावली. शेठजी समाधानाने परत आले, पण बाबांनी सांगितलेल्या तीन रुपये चौदा आणे या दक्षिणेचा उलगडा त्यांना होईना. त्यांनी दासगणूंना सांगितले, परंतु दासगणूंच्याही काही लक्षात येईना. शेवटी बोलण्याच्या ओघात त्या दोघांना मौलवीसाहेबांच्या भेटीचा प्रसंग आठवला. त्यावेळी रतनजींनी जेवढा खर्च केला होता त्याची तपशीलवार यादी त्यांनी केली तेव्हा

तो खर्च नेमका तीन रुपये चौदा आणे भरला. खाते-वही काढून पाहताच खात्री पटली. अर्थात् मौलवीसाहेबांना भेट दिलेल्या वस्तू बाबांनाच पोचल्या होत्या, हे स्पष्ट झाले. कुठे नांदेड व कुठे शिरडी! पुढच्याच वर्षी बाबांच्या आशीर्वादाने रतनजींना मुलगा झाला.

**श्री साईबाबा व श्री वासुदेवानंद:**

साधारणपणे वीस वर्षांपूर्वी श्री क्षेत्र गाणगापूर येथे हुमनाबादमार्गे गेलो असतानाचा हा प्रसंग आहे. संगमावर स्नानास गेलो असताना तेथे एक वयस्कर गृहस्थ भेटला. धोतर, सदरा, कोट आणि डोक्यावर टोपी व तीही मळकट. त्या गृहस्थाने माझी चौकशी करण्यास सुरूवात केली. संपूर्ण नाव, शाखा व गोत्र विचारले. मी माझ्यासंबंधीची माहिती दिली. त्या गृहस्थाने लागलीच खरे, खोटे तपासण्यासाठी की काय? गोत्राचे प्रवर विचारले. प्रवर सांगताच मोठ्याने हसतच विचारले,

''जवळ ग्रंथही दिसतोय! काय त्या ग्रंथाचे नाव? कोणी लिहिलेला आहे?''

माझ्या तोंडून ग्रंथाचे व ग्रंथकर्त्याचे नाव ऐकताच ते गृहस्थ म्हणाले,

''तो चोर काय!''

डोके सुन्न झाले. अंग गरम झाले. आमच्या श्रद्धास्थानास 'चोर' म्हटलेले ऐकून क्षणभर काहीच सुचले नाही. तशाही स्थितीत त्यांना हात जोडले. काहीही उत्तर न देता स्नानास सुरूवात केली. ते गृहस्थ मात्र मोठ्याने हसले व निघून गेले. मी मात्र स्नान आटोपून औदुंबराच्या झाडाखाली, 'गुरूचरित्र सारामृत' ग्रंथाचे पारायण केले व मुक्कामासाठी गाणगापूर येथील चिदानंद धर्मशाळेत परतलो.

नांदेड मुक्कामी परतल्यावर तीर्थस्वरूप प्रभाकरराव नांदेडकरकाकांना पुंडलिकवाडी येथे जाऊन घडलेला प्रसंग सांगितला. ॲड. माधवरावजी नांदेडकरही तेथेच बसलेले होते. मी सांगितलेला प्रसंग ऐकून दोघेही हसले व दासगणू महाराजांच्या चरित्रातील त्यांनी प्रसंग सांगितला; तो असा:

श्री दासगणू महाराज आपल्या इष्टमित्रांसह जगन्नाथपुरीच्या यात्रेस गेले होते. तेथून परत येत असताना राजमहेंद्रीस त्यांची आणि प्रसिद्ध सत्पुरुष वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराज यांची गाठ पडली. श्री वासुदेवानंद अतिशय कर्मठ उपासक व अग्निपूजक होते. वेदविद्या व मंत्रविद्या ह्या दोन्हींवर त्यांचा पूर्ण अधिकार होता. त्यांनी तरूण वयातच संन्यास घेतला होता. बाबा व वासुदेवानंद एकमेकांना 'बंधु' म्हणत असत. असे हे सत्पुरूष दासगणूंना पाहताच उपस्थित असलेल्या मंडळींना उद्देशून म्हणाले,

''अरे, हा पंढरपूरच्या भ्रष्ट देवाचा भक्त. कोणीही शिवले तरी त्या देवाला चालते. मग हा कशाला फारसे सोवळे-ओवळे पाळतो?''

त्यावर दासगणू महाराज हसले व म्हणाले,

''महाराज, आपल्या श्री दत्तात्रेयापेक्षा माझा देव पुष्कळच बरा हं! सोवळे जरा कमी, पण त्याने धर्म सोडला नाही. श्री दत्तात्रेयाने मुसलमानाचे रूप कितीदातरी घेतले.''

श्री वासुदेवानंद हे ऐकून मनापासून खदखदा हसले आणि म्हणाले,

''आपल्या आराध्यदेवतेवर अशी निष्ठा असावी.''

स्वामींची भेट झाल्यावर त्यांनी सहज चौकशी केली,

''आता येथून कोठे जाणार?''

''आधी नांदेडास जाणार आहोत. तेथून शिरडीस जाऊ.''

''मग आमचा हा एवढा नारळ साईबाबांना द्या आणि नमस्कार सांगा!''

ठीक आहे, असे म्हणून श्री दासगणू महाराजांनी तो नारळ घेतला व आपल्या पडशीत ठेवून स्वामींचा निरोप घेतला.

पुढे सर्व मंडळी नांदेडहून शिरडीस जावयास निघाली. वाटेत मनमाड स्टेशनवर फराळ करीत असताना चिवडा फार तिखट लागला. पुंडलिकराव नांदेडकर म्हणाले,

''अहो, महाराजांच्या पडशीत एक नारळ आहे. फोडा ना तो!''

नारळासंबंधीची त्यांना कल्पना नसल्यामुळे त्यांनी तो नारळ फोडून खोबरे खाल्ले. दुसऱ्या दिवशी ही मंडळी शिरडीस पोचली. बाबांच्या दर्शनास जाताच श्री दासगणूंना उद्देशून बाबा श्री. माधवराव देशपांडे यांना म्हणाले,

''श्याम्या, हा गणू लई चोरटा आहे. माझ्या भावाने मला खाऊ दिला होता. याने मधल्यामध्येच खाऊन टाकला.''

दासगणू म्हणाले,

''खाऊ कसला बाबा?''

''वा रे वा! चोर तो चोर आणि वर शिरजोर! माझा नारळ नाही खाल्लास तू?''

पडशीत पाहतात तो नारळ नाही. चौकशी केल्यानंतर मनमाडलाच खाल्ल्याचे समजले. बाबांच्या या अंतर्ज्ञानाचा श्री दासगणूंच्या मनावर परिणाम झालाच, पण त्याहीपेक्षा संतांच्या एकरूपतेचा जो साक्षात्कार त्यांना घडला त्याचे त्यांना विशेष महत्त्व वाटले.

एकाने दुसऱ्याला आदराने भेट पाठवावी, तर दुसऱ्याने पहिल्याचा सख्खा भाऊ म्हणून उल्लेख करावा, संतांची अलौकिक समत्वबुद्धी ती हीच! 'संत' ही एकच जाती आणि 'जगताचे रक्षण' हा एकच धर्म! बाकीचा भेद हा सर्व वरवरचा व सापेक्ष. आम्ही हा प्रसंग पू. काकांच्या तोंडून ऐकला व चरित्र वाचून खात्री पटली. आजही हा प्रसंग आठवला म्हणजे वाटते, कोठे संगम (गाणगापूर), कोठे नांदेड! सारेच आश्चर्य!

**शिरडीतील उत्सव:**

श्री रामनवमी (चैत्र शुद्ध अष्टमी ते दशमी), गुरूपौर्णिमा (आषाढ शुद्ध चतुर्दशी ते कृष्ण प्रतिपदा), पुण्यतिथी उत्सव (आश्विन शुद्ध नवमी ते एकादशी), पारण्याच्या दिवशी एकादशी आल्यास द्वादशीस असा परिपाठ आहे.

पहिल्या रामनवमी उत्सवाच्यावेळी बाबांनी 'पेमा' वाण्याकडे तेल मागितले व त्याने नकार दिला. यावेळी बाबांनी एक हजार 'पणत्या' स्वत:च तयार केल्या व तेलाऐवजी पाण्याचा वापर करून एकदा लावलेले दिवे चोवीस तास टिकविले! नानासाहेब डेंगळे यांच्यासमोर हा प्रकार घडला. शिरडीच काय अवती-भोवतीच्या खेडेगावच्या लोकांनीही हा चमत्कार पाहिला. हा चमत्कार पाहणाऱ्यास बाबा हे प्रतिईश्वरच वाटले असल्यास नवल वाटू नये.

श्री दासगणूंनी 'गुरूचरित्र सारामृत' नावाच्या, १६ अध्याय व २७१५ ओवीसंख्या असलेल्या ग्रंथात पहिल्या १५

अध्यायांतून सरस्वती गंगाधरांच्या गुरूचरित्रातील कथा वर्णिल्या असून १६ व्या अध्यायात आधुनिक दत्तावतार म्हणून हुमनाबादचे माणिकप्रभू महाराज, अक्कलकोटचे स्वामी समर्थ, आळंदीचे नरसिंह सरस्वती, माणगावचे वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराज व शिरडीचे साईबाबा यांची चरित्रे वर्णिली आहेत. संतकथामृत ग्रंथाच्या ५७ व्या अध्यायात साईबाबांनी शिष्यांना जो बोध केला आहे त्यात परमेश्वर कोण, कैसा, कोठे आहे व तो कोणास दिसतो यासंबंधी साधनचतुष्टय संपन्नता स्थिती व ब्रह्मज्ञानाचा अधिकारी यासंबंधीचे क्रमवार वर्णन, विवेक, वैराग्य, शमदमादिषट्क व मुमुक्षत्व आदी भाग समजावून सांगितलेला आहे.

अशा अनंत लीला करून अश्विन शुद्ध दशमी (विजयादशमी), शके १८४० मध्ये शिरडी मुक्कामी तृतीय प्रहरी बाबांनी देह ठेविला.

---

## साई–अवतार

सांग बाबा, कोणत्या नामी मी तुज हाकारू
मी तर तव अजाण लेकरू
प्रभातसमयी दिससी तू, विष्णू चर्तुभूज
शोभे तुझ्या गळा, वैजयंती साज
अरूणोदयी भासे तू, बजरंग
भ्रमात पडे मी हाच का तो, श्रीरंग
सकाळच्या प्रहरी वाटे हा तर, जगन्नाथ
विटेवरी उभा राहूनी हसतो, पंढरीनाथ
द्वारकामाई का असे, तुझ्या द्वारी
खरेच आहेस का तू, कृष्ण–मुरारी
गुरूस्थानी पाहता, शिवलिंग असे
कशावरून तू, काशीविश्वेश्वर नसे
पाहूनी माध्यान्ही, सगुण रामावतार
किती अवतार धरिसी, करण्या उद्धार
मग दुपारी आपुली स्वारी, करविरी
मागतसे माधुकरी, दारोदारी
संध्यासमयी जाता, बद्रीकेदार
तुझ्याठायी वसती, हरिहर
निद्रा घेता जाऊनी, माहुरीगडी
भ्रांती मज काय वंदू तुज, मी वेडी
श्रीनाथ काशीनाथ रामनाथ
परि रात्रंदिन ध्यास शिरडी साईनाथ

**–सौ. मंदाकिनी इनामदार**
प्रभादेवी, मुंबई.

## निवेदन

श्री साईलीला द्वैमासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशीलाबद्दल दरवर्षी फेब्रुवारीनंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाचे निवेदन.

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशनाचे स्थळ | - | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४. |
| २. प्रकाशनाचा कालावधी | - | द्वैमासिक |
| ३. मुद्रकाचे नाव | - | प्रा. डॉ. लेखा पाठक |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| पत्ता | - | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४. |
| ४. प्रकाशकाचे नाव | - | प्रा. डॉ. लेखा पाठक |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| पत्ता | - | साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४. |
| ५. संपादकाचे नाव | - | प्रा. डॉ. लेखा पाठक |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| ६. हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे, त्यांचे व १ टक्क्याहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक किंवा भागदार यांची नावे व पत्ते | - | श्री साईबाबा संस्थान, शिरडी (धार्मिक व चॅरिटेबल संस्था) |

मी, प्रा. डॉ. लेखा पाठक यानुसार असे जाहीर करते की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

प्रा. डॉ. लेखा पाठक
(प्रकाशकाची सही)
अध्यक्षा,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

# प्राचीन भारतातील राजनीति

राजनीतिशास्त्रावर भारतात अनेक ग्रंथ लिहिले गेलेले आहेत. यासच नीतिशास्त्र किंवा दंडनीति असेही म्हणत असत.

अर्थशास्त्राच्या अध्ययनात नीतिशास्त्रही शिकविले जात होते. स्वतंत्र अर्थशास्त्रही शिकविले जाई.

महाभारतातील 'शांतिपर्व' राजनीतिशास्त्रावरील एक उत्कृष्ट प्रामाणिक ग्रंथ मानला जातो. या विषयावरील अति महत्त्वपूर्ण ग्रंथ 'कौटिल्याचे अर्थशास्त्र' हा आहे. या ग्रंथाने सर्वसामान्य भारतीयांच्या जीवनात खूपच परिवर्तन घडविलेले आहे. 'कामंदकीय नीतिसार' हा छंदबद्ध ग्रंथ आहे. पंडित कामंदकाने कौटिल्यास गुरू मानलेले आहे. १० व्या शतकात पंडित सोमदेव सूरिने 'नीतिवाक्यामृत' नामक ग्रंथाची रचना केली. पंडित हेमचंद्राने 'लघु अहेन नीतिशास्त्र' नामक जैन राज्यशासनासाठी लहानसा ग्रंथ लिहिला.

प्राचीन भारतातील 'नीति' विषयक ग्रंथात, राष्ट्र, राष्ट्राची उत्पत्ति, उत्पत्तिचा मात्स्यन्याय आदिंचे विवरण आहे. भिन्न भिन्न सिद्धांतानंतर, राजा (स्वामी) अमात्य, जनपद, दुर्ग, कोष, दंड तथा मित्र या सात अंगांवर, तसेच राजाची कर्तव्ये, अधिकार, युद्धसंधि आणि युद्ध इत्यादि अनेक उपयुक्त विषयांवर विचार केलेला आहे. या व्यतिरिक्त कितीतरी ग्रंथांमध्ये राजनीति सिद्धांतांचा उल्लेख दिसतो. दशकुमारचरितम्, किरातार्जुनीयम्, मुद्राराक्षसं आदि ग्रंथांमध्येही राजनीतिविषयक विश्लेषण आहे.

**कायदे-कानूनविषयक साहित्य –**

काव्य, दर्शन, कलाकौशल्या संबंधीच्या साहित्याबरोबर राजनीति तथा राजनियम (कायदा, धर्म) विषयक साहित्याही उन्नत झालेले दिसते.

'धर्म' शब्द खूपच व्यापक आहे. इंग्रजी भाषेतील 'रिलिजन' तथा 'लॉ' हे दोनही यात अंतर्भूत आहेत. धर्मशास्त्रात फक्त धर्माविषयक नियम नाहीत तर राजनीतिक, सामाजिक नियमही विस्तारपूर्वक दिलेले दिसतात. आपस्तंभ धर्मसूत्रे तथा 'बौद्धायन धम्मसुत्र' हे यापूर्वीच भारतात विद्यमान होते. तसेच महर्षि गौतम तथा ब्रह्मर्षि वसिष्ठ यांनीही धर्मसूत्रें तयार केलेली होती. प्राचीन ग्रंथात अधिक सन्मानित तथा प्रचारित असलेला 'मनुस्मृति' (९ वे शतक) तथा गोविंदराज (११ वे शतक) यांच्या टीका प्रसिद्ध आहेत. या मनुस्मृतिचा प्रचार ब्रह्मदेश, जावा, सुमात्रा, बाली अशा अनेक देशात झाला. नंतर याज्ञवल्क्य स्मृतिवरही टीका लिहिल्या गेल्या. यात मनुस्मृतिहून अधिक उन्नत पद्धतिचे वर्णन आहे. यात तीन भाग आहेत. (१) आचाराध्याय, (२) व्यवहाराध्याय, (३) प्रायश्चित्ताध्याय असे ते भाग आहेत. आचाराध्यायात, वर्णाश्रम, धर्म, भक्ष्याभक्षविचार, दान, शुद्धि, ग्रहशांती, राजधर्म आदिंचा विचार आहे. व्यवहाराध्यायात कायदेविषयक अनेक बाबींचे विवरण आहे. न्यायालय, न्यायनियम, अभियोग (खटला) साक्ष (गवाही), सफाई, कर्जाचे देणे-घेणे नियम, व्याज, चक्रवाढ व्याज, तमस्सुक, दिव्यसाक्षी, उत्तराधिकार, स्त्री-संपत्ति, सीमा विवाद, सेवक-जमीनदार-गुलाम-पालक विवाद, वेतन, द्यूत, कठोर शब्द, व्याख्या, कठोर दंड, चोरी, व्यभिचार इत्यादि अपराध आदिंचे विवेचन आहे. प्रायश्चित्ताध्यायात, सामाजिक नियमांविषयी वर्णन आहे.

११ व्या शतकात पंडित विज्ञानेश्वर याने यावर 'मिताक्षरा' किंवा 'मिताक्षरवाद' नावाची एक टीका लिहिली नंतर ही टीकाच एक स्वतंत्र ग्रंथ बनली. पंडित विज्ञानेश्वराने प्रत्येक बाबींवर विस्तृत लिखाण केले आहे. ठिकठिकाणी याने, हरित, शंख, देवल, विष्णु, मिताक्षर, वसिष्ठ, यम, व्यास, बृहस्पति, पराशर आदि अनेक स्मृतिकारांचा उल्लेख याने केलेला आहे. यात वर उल्लेखिलेल्या आचार्यांच्या मतांचाही उल्लेख पंडित विज्ञानेश्वराने केला आहे. १२ व्या शतकात पंडित लक्ष्मीधर याने 'स्मृति कल्पतरू' नावाचा ग्रंथ लिहिला. नंतरच्या काळात केलेल्या ग्रंथात स्पृश्य-अस्पृश्य असे भाग जोडलेले दिसतात. यापूर्वी छूत-अछूत यांचा उल्लेख दिसत नाहीं.

**अर्थशास्त्र**

प्राचीन भारतात अर्थशास्त्राचाही विकास परिपूर्ण झालेला दिसतो. 'वार्ता' किंवा अर्थशास्त्र (इकॉनॉमिक्स) याची उन्नति प्राचीन काळात झालेली होती. भारतामध्ये उच्च पातळीवर पोहोचलेल्या शास्त्रात या शास्त्राची गणना होते. आचार्य विष्णुगुप्त चाणक्य उपाख्यकौटिल (यांचे गोत्र कौटिल आहे) यांनी अर्थशास्त्रास 'वार्ता' अशा नावाने संबोधिले आहे. युरोपात वर्तमानकाळी उत्पत्ति (प्रॉडक्शन), विनिमय (एक्स्चेंज), वितरण (डिस्ट्रिब्यूशन) तथा व्यय (कंझंप्शन) असे चार भाग मानले जातात. पण पूर्वी या युरोपीय अर्थशास्त्रात केवळ उत्पत्तिसच (म्हणजे प्रॉडक्शन) अर्थशास्त्र म्हटले जात होते. वार्ताशास्त्रातदेखील उत्पत्ति महत्त्वाची मानली जाते. कृषी, शिल्प, व्यवसाय तथा पशुपालन, व्याज ही प्राचीन वार्ताशास्त्राची मुख्य अंगे मानलेली आहेत. वार्ताशास्त्रात, कृषीसंबंधी 'पादप विवक्षा' वृक्ष दोहद, वृक्षायुर्वेद, शस्यानंद, कृषी पद्धति, कृष्णी संग्र असे वार्त कृषीग्रंथ आहेत. शिल्पशास्त्र किंवा वास्तुशास्त्रात वास्तुसौख्य, अपराजित वास्तुशास्त्र, प्रसादानुकीर्तन, चक्रशास्त्र, 'चित्रपट', जलार्गल, पक्षि मनुष्यालय लक्षण, रथ लक्षण, विमान विद्या, विमान लक्षण, (हे दोनही हवेत उडणाऱ्या विमानांसंबंधीचे आहेत.) विश्वकर्मीय, कौतुक लक्षण, मूर्ति लक्षण, 'प्रतिमा द्रव्यादि वचन' सकलाधिकार, सारस्वतीय, शिल्पशास्त्र, विश्वविद्याभरण, विश्वकर्मप्रकाश, तथा समरांगण सूत्रधार असे ग्रंथ आहेत. याशिवाय मयशिल्प, विश्वकर्मीय शिल्प असेही ग्रंथ आहेत. मयशिल्पात शिल्पाची लक्षणे, भूमिपरीक्षा, भूमिमापन, दिशा निर्णय, ग्राम विस्तार, नगर विस्तार, भवनांची भिन्न भिन्न अंगे, दोन-तीन माळ्यांची उंच घरे, द्वारे, उंबरठा, आदिंचे वर्णन आहे. विश्वकर्मीय शिल्पात मंदिर, भिन्न भिन्न मूर्ति उत्पन्न करण्याच्या पद्धति

मूर्ति आभूषण, मनुष्य-स्त्री आभूषण, प्राणी आभूषण आदिंची संगतवार माहिती आहे. हे सर्व ग्रंथ तक्षशीला विश्वविद्यालयात अभ्यासासाठी होते.

**रत्नपरिक्षा –**

रत्न, पाचू, मणिक, वैडुर्य, मोति यांचे वेगवेगळे तज्ञ तक्षशीला विद्यापीठात अध्यापन करीत होते असे इत्सिंग लिहितो. रत्नसंबंधी रत्नादि परीक्षा, रत्नपरीक्षा, मणिपरीक्षा, ज्ञानरत्नकोष, रत्नदीपिका, रत्नमाला आदि ग्रंथ लिहिलेले दिसतात.

**धातुविज्ञान (मेटालर्जी) –**

धातुविज्ञानशास्त्र हे वैद्यकशास्त्राचे एक अंग मानले गेलेले आहे. तक्षशीला विद्यापीठात वैद्यक, शल्यचिकित्सा, शरीरविज्ञान, धातुविज्ञान, मंत्रविज्ञान चैत्रलेखन, वनस्पतिशास्त्र असा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर आयुर्वेदाचे ज्ञान दिले जात असे. या शास्त्रासंबंधी 'लोहरत्नाकर' लोहार्णव, लोहशास्त्र, सुवर्णपरीक्षा, 'कांस्य परिस्फुट', परिस्फुट रस संग्रह, 'पारद परिस्फुट' मिश्रधातुनिधान आदि ग्रंथ लिहिले गेलेले आहेत.

**भूमापन –**

(लँड सर्व्हे) भूमापन हा विषय, कृषी, कृषी औजारउत्पत्ती तथा भूगर्भशास्त्र त्याचबरोबर वनस्पतिशास्त्र, वनरक्षाशास्त्र, प्राणीशास्त्र, वनौषधीशास्त्र, पशुसंवर्धनशास्त्र आणि भूमापनशास्त्र असा अभ्यासगट निसर्गशास्त्राचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नियुक्त होता. भूमापनासंबंधी तक्षशीला विद्यापीठात 'क्षेत्रगणितशास्त्र' नावाचा ग्रंथ लिहिला गेला होता.

**जहाज बांधणीशास्त्र –**

खिस्तिशकाच्या पूर्वी ४ थ्या शतकात द्रविड, त्रावणकोर येथील राजा ज्ञानचंद्रकीर्ती याने अतिपूर्वेकडील देशात रत्नांनी भरलेले जहाज पाठविले. पूर्व, दक्षिण तथा पश्चिम किनाऱ्यावरील सर्व राजघराण्यांच्या नांवा तथा नौकायुद्ध असे सैन्य प्रदेशाच्या रक्षणार्थ ठेवलेले होते. गोव्यातील कदंब राजघराण्याने युद्धनौका तथा राजनौका बांधणीच्या संबंधात पाठशाळा उघडलेली होती असे पोर्तूगीजांनी लिहिलेल्या ग्रंथात दिसते. तक्षशीला विद्यापीठात नौकाशास्त्र नावाचा विषय शिकविला जात होता.

**समुद्री व्यापार –**

समुद्री व्यापारासंबंधी द्रविड भाषेत (तामिळ भाषेत) 'वैश्यार पेरूमई' नावाचा ग्रंथ मिळतो. त्यात परदेश, त्यांचा अभ्यास तथा व्यापारविषयी बरीच माहिती लिहिलेली आहे.

**प्राचीन भारतातील शासनपद्धति –**

प्राचीन भारतीय पद्धतित 'राजा' हा महत्त्वाचा घटक आहे, तरीही राजाचे अधिकार कोठल्या ना कोठल्या पद्धतिने नियंत्रित केलेले दिसतात. बऱ्याच भागात गणराज्ये किंवा प्रजातांत्रिक राज्ये होती. कितीतरी राज्यांत राजा 'निवडला' जात होता. राजा प्रजेवर अत्याचार करूं शकत नव्हता. प्रजेचा आवाज तत्पर, ऐकून घेतला जात होता.

सम्राट हर्षाच्या ताम्रलेखात, हर्षचरित, तथा युवान च्वांगने केलेल्या वर्णनावरून तात्कालिक शासनपद्धति समजते, त्या काळी राजा सर्वेसर्वा नव्हता एक मंत्रीपरिषद होती. या मंत्रीपरिषदेच्या हातात राज्यातील बहुतेक सर्व शक्ति, शासन, होते. सम्राट राज्यवर्धनाचा प्रधान सचिव भण्डि हा होता. राज्यवर्धनाच्या मृत्युनंतर प्रधान सचिव आचार्य भण्डि यांनी मंत्रिपरिषदेची खास बैठक बोलविली त्यांत राजाचा मृत्यु, देशातील परीस्थिती समजाविली आणि सांगितले कीं, सम्राट राज्यवर्धनाचा भाऊ, श्रीहर्ष हा कर्तव्य परायण, प्रजाप्रिय तथा दयाळू आहे, प्रजेचा त्याजवर विश्वास बसेल. म्हणून असा प्रस्ताव मांडतो कीं, श्रीहर्ष यास राजा बनविले जावे, प्रत्येक मंत्र्यांनी आपली मते मांडावीत. मंत्रिपरिषदेत थोडावेळ कुजबुज झाली त्यानंतर प्रत्येकाने उठून आचार्य भण्डि यांचा प्रस्ताव मंजूर केला. त्यानंतर मंत्रिपरिषद श्रीहर्ष रहात होता त्या भागाकडे श्रीहर्षास राजपद स्वाकारण्याची प्रार्थना करण्यासाठी गेली. त्यानंतर श्रीहर्ष राजा झाला. यावरून मंत्रिपरिषदेची शक्ति 'राजा बनविणारी शक्ति (किंग मेकर) म्हणजे मंत्रिपरिषद होती हे लक्षात येते.

सांधिविग्रहिक, रण भाण्डा गारिक, विनयस्थितिस्पक, (न्याय, कायदाशाखेचा प्रमुख) अक्षपटलाधिपति (आय व्यय यांचा रोखा हिशोब पाहणारा) अशी अनेक पदे शासनप्रमुख खाती, मंत्रिपरिषदेचे सदस्य मंत्रीगण पहात असत. राजाचे मुख्य काम राज्यशासन चालविणे, मंत्रिपरिषदेच्या सल्ल्यानुसार राज्यशासन सुरळीत चालविणें, तसेच प्रजेत शांति उत्पन्न करणे, प्रजारक्षण करणें आदि कामे राजा करीत. असे युवान च्वांग लिहितो. भारतात राजाचे शासन दयायुक्त नियमांनी चालते. प्रजेवर कोणत्याच पद्धतिची सक्ती केली जात नाहीं. भारतात क्षत्रिय वर्णाचे लोक अनेक पीढ्यांपासून शासन करीत आलेले आहेत. दया तथा परोपकार हा एकच उद्देश यांच्या शासनात आहे (पहा– 'वॉटर ऑन युवान च्वांग्स ट्रॅव्हल्स' भाग १, पृष्ठ १६८)

**राजाची कर्तव्ये**

भारतात कांही ठिकाणी राजाचे एकतंत्री शासन होते. एकतंत्रि शासन असून देखील प्राचीन भारतात राजा परोपकारी तथा प्रजाहितैषी शासक होता (बिनिव्होलंट मोनार्क). प्राचीन भारतात धर्मगुरूंचा प्रभाव राजांवर खूपच होता. धर्मगुरू त्यास राज्यातील सर्व घडामोडींचा (ॲक्टिव्हिटिज) उत्तरदाता समजत असत. राजा प्रजेच्या आर्थिक, राजनैतिक, शिक्षणपद्धति, धार्मिक अवस्था यांचेसंबंधी उत्तरदाता मानला गेला आहे. कलिपथ राजांनी धार्मिक उन्नतित भाग घेतलेला आपणास दिसतो. कित्येक राजांनी स्वतंत्र पद्धतिच्या पाठशाला काढलेल्या दिसतात. बहुतेक राजांच्या दरबारात मोठ्यामोठ्या विद्वान-कवि यांचा सत्कार होत असे. कांही राजांनी हजारो कवि-विद्वानांना आश्रय दिलेला होता. कांहीच्या मंत्रिपरिषदेत कवि-विद्वान होते. कांहीनी कवि-पंडितांना राजदूत म्हणून पाठविलेले दिसते. कित्येक राजांनी विद्वान-कविंकडून नवनवीन ग्रंथ तयार करविले. त्यांच्या उद्घाटनसमयी प्रजेबरोबर इतर राज्यातील प्रतिनिधि, प्रसंगी राजासही निमंत्रणें दिली जात. काश्मिरचा राजा जयसिंह याने त्याच्या दरबारातील विद्वानकवि मंख याने लिहिलेला ''श्रीकण्ठचरितम्'' ऐकण्यासाठी कन्नौज नरेश राजा गोविंदचंद्र यांचेकडून

सुहलपंडितास आमंत्रण दिले होते. तसेच उत्तर कोंकण प्रांताचा अधिपति सम्राट अपरदित्य यांच्या दरबारातून अनेक पंडित उपस्थित राहीलेले आहेत. बहुधा प्रत्येक राजाच्या दरबारात कांही ना कांही कवि पंडित असतच. यांच्या संख्येवरून राजाची प्रतिष्ठा वाढत असे. त्यां त्यां दरबारात ते सन्मानित म्हणून गणले जात. त्यांचेकडून नवनवीन ग्रंथ राजे लोक लिहून घेत असत.

**ग्राम संस्था**

प्राचीन काळी भारतात राज्यशासनाच्या सुविधेसाठी देशाचे भिन्न भिन्न भाग केले जात. भुक्ति (प्रांत) हा होता, विषय (जिल्हा) तथा ग्राम असे तीन भाग होते. या तीनही भागात ग्रामसंस्था मुख्य होती. अतिप्राचीन काळापासून भारतात ग्रामसंस्था अस्तित्वात आहे. ग्रामाचा पूर्ण व्यवहार तेथील ग्राममंडल (पंचायत) ठरवित तथा करीत असे. राजाच्या केंद्रसरकारचा याच ग्रामसंस्थाशी सतत संपर्क असे.

प्राचीन तामिळ इतिहासात शासनपद्धतिचे वर्णन आहे. शासनकार्यात मदत करण्यासाठी, राजास मदत करण्यासाठी ५ समिती असत. याव्यतिरिक्त जिल्ह्यात तीन सभा असत. या सर्व सभांमध्यें पंडित ज्ञानी ब्राह्मण यांचा समावेश आहे. व्यापारी, कृषक हेही असत. व्यापाऱ्यांची स्वतंत्र सभा असून त्यांत व्यापारीच सभासद असत. व्यापाराची व्यवस्था ही सभा करीत असे. चोल घराण्यातील राजा राजराज (पहिला) याच्या एका शिलालेखात १५० गांवांमध्ये ग्रामसभा कार्यरत असल्याचा उल्लेख आहे. या सभांच्या आयोजनासाठी मोठमोठी भवने उत्पन्न केली गेली. अशी भवने तंजाऊर प्रांतात (तामिळनाडू) आजही दिसतात. साधारण गावात मोठमोठ्या वटवृक्ष प्रांगणात, देवालय प्रांगणात, पाठशाला प्रांगणात या सभा होत असत. या ग्रामसभा दोन पद्धतिच्या असत (१) विचारसभा तथा (२) शासनसभा. या दोनही सभांच्या सभ्यांना (सदस्यांना) लहान लहान समितींवर नियुक्त केलेले असे. कृषी, उद्यान, पाटबंधारे, व्यापार, मंदिर, दान, राजशिष्टाचार अशा त्या समित्या होत्या. एकेकाळी एका तलावात पाणी अधिक आल्याने ग्रामास हानी पोहोचण्याचा संभव उद्भवला. ग्रामसभेकडून तलावात सुधारणा करण्यासाठी तलाव समितीस बिनव्याजी कर्ज दिले तथा हे व्याज मंदिर समितीस द्यावे असा आदेश दिला. असा उल्लेख सापडला. भूमि विक्रीच्यावेळी त्याचे रीतसर दस्तऐवज ग्रामसभा तयार करून देत असे. तथा त्याची एक प्रत राजदरबारी करवसूली खात्याकडे पाठवीत असे. सर्व व्यवहार ताडपत्रावर होत असत. ग्रामसभेच्या आय-व्यय हिशोब तपासण्यासाठीं राजाकडून लेखापाल या हुद्द्याचा अधिकारी येत असे. (पहा– व्ही सरकार – दी पोलिटिकल इंस्टिट्यूशंस अँड थिअरीज ऑफ दी हिंदूज, पृष्ठ – ५३/५६.)

चोल राजा परांतक याच्या शिलालेखावरून ग्रामसंस्थांचे निर्माण तथा नियमन समजते. त्यात ग्रामसभेच्या सभ्यांची (सदस्यांची) योग्यता-अयोग्यता संबंधीचे नियम, अधिवेशन नियम, सदस्यांच्या सार्वजनिक निवडीचे नियम, उपसमिती निर्माण नियम, आय-व्यय पक्षकाची नियुक्ती, आदि अनेक बाबींवर विचार केलेला दिसतो. सार्वजनिक सभेत निवड होत असे. सामान्य सभाजन मातीच्या खापरीच्या तुकड्यावर आपल्या पसंतीच्या उमेदवारांची नावे लिहित. नंतर हे तुकडे एका मोठ्या घड्यात (घागरीत) घालीत. सर्वांसमक्ष अधिक लोकांचे अनुमोदन असलेली व्यक्ति ह्या सभ्य किंवा सदस्य आहे असे घोषीत करीत (पहा– १९०४ सालचा आर्कियॉलॉजिक सर्व्हे ऑफ इंडिया ॲन्युअल रिपोर्ट, पृष्ठ – ५).

या सर्व ग्रामसंस्थांचा परिणाम सामान्य जनता राजकीय कार्यासंबंधी उदासिन राहीली. राज्यांमध्ये वेगवेगळी परिवर्तने होत गेली असली तरी पंचायत ग्रामसंस्थेवर त्याचा फारसा परिणाम झाला नाही. त्यामुळे पारतंत्र्याची भावना जनसाधारणात नव्हती. नवीन आलेल्या राजास विशाल पसरलेल्या देशातील ग्रामसभांवर नियंत्रण ठेवावेसे वाटले नाहीं. भारताच्या इतिहासात अनेक परिवर्तने दिसतात. तथापि ग्रामसभामध्ये संपूर्ण इतिहासात फारशी परिवर्तने दिसत नाहीत. किंवा कोण्याहि नव्या आलेल्या राजाने ग्रामसंस्था नष्ट केली नाहीं. शहरांमध्ये नगरसभा असत. ते शहराचा सर्व कार्यभार सांभाळीत असत.

**दंड**

प्राचीन भारतात शासन तथा न्याय याविषयीचे नियम पर्याप्त कठोर होते. अंगच्छेद, देशनिर्वासन, कारागृहवास, धनदंड, फासावर देणे आदि दंड प्रचलित होते असे युवानचँग लिहितो. श्रीहर्षाच्या जन्मानंतर अनेक कैद्यांच्या शिक्षा माफ करून त्यांना मुक्त केले असे बाणभट्ट लिहितो. याज्ञवल्क्य स्मृतित कठोर तथा क्रूर दंडाचे वर्णन आहे. त्याकाळी ज्ञानी, पंडित, कवि, ब्राह्मण यांना फारसा कठोर दंड दिला जात नसे. राजदरबारात न्यायव्यवस्था पाहणारा एक विशेष अधिकारी नियुक्त केला जात असे. याच्या हाताखाली भिन्न भिन्न प्रांतात तथा स्थानात अन्य अधिकारी नियुक्त असत. याज्ञवल्क्य स्मृतित न्यायदानाच्याअनेक नियमांचे वर्णन केले आहे. अभियोगात (खटल्यात) लिखित तथा मौखिक साक्षीदारांची परीक्षा केली जात होती. तथापि दिव्यसाक्षी (ऑर्डियल्स)ची प्रथाही विद्यमान दिसते. अर्थात ही शिक्षा क्वचित प्रसंगीत दिली जात असे. (पहा– अल्बरूनीज इंडिया, भाग – २, पृष्ठ १५८/६०)

**स्त्रियांची राजनैतिक स्थिती**

प्राचीन भारतात कायद्यात स्त्रियांचेही स्थान होते. उत्तराधिकारासंबंधीच्या नियमांत स्त्रीधन, स्त्री-संपत्तिचे वेगळे कायदे होते. पुत्र नसल्यास कन्या, पित्याच्या संपत्तिची अधिकारिणी आहे. विवाह, मंगलप्रसंगी विवाहितेस पितृगृहाकडून मिळालेल्या धन, आभूषण तथा संपत्ति याजवर विवाहित कन्येचे संपूर्ण हक्क मानलेला आहे. मनुस्मृतित, मिताक्षरवादात, महाभारतात याचे उल्लेख दिसतात.

व्यापारउद्योग करणाऱ्यांच्या पत्नींना विशेष रीण दिले जात असे. कारागीर शिल्पकार, लाकूडकाम इत्यादिंच्या नियमन तथा रक्षणासाठी वेगळे कायदे अस्तित्वात होते. अधिक मूल्य घेणाऱ्या व्यापाऱ्यास दंड दिला जात असे.

**शासन प्रबंध**

प्राचीन भारतातील शासनपद्धतिचा विशेष

परिचय त्यां काळातील कर्मचाऱ्यांच्या श्रेयनामावलीवरून मिळतो. सम्राटाच्या हाताखाली अनेक राजे असत. ज्यांचा उल्लेख महाराज, महासामंत आदि उपाधिंनी होतो. हे राजे सम्राटाच्या दरबारात उपस्थित असत. कांही कांही वेळेस जहागीरदार ही राजपदावर जात असत. प्रांताच्या शासकास 'उपरिक महाराज' म्हणतात. अनेक शिलालेखात या प्रांतिक शासकास, गोष्टा, भोगिक, भोगपति, राज-स्थानीय असे उल्लेखिलेले दिसते. प्रांतीय शासक जिल्ह्याच्या शासकाची नियुक्ति करीत असे. त्यास आयुक्तक किंवा विषयपति असे म्हणत असत. हा विषयपति जिल्ह्याच्या मुख्य गांवी ज्यास 'अधिष्ठान' म्हणतात तेथे रहात असे. त्याच्या कार्यालयास 'अधिकरण' असे म्हणतात.

प्रांतीय शासकांजवळ राजाच्या लिखित आज्ञा जात असत. अशा आज्ञांची तपासणी छाननी होत असे. ही छाननी कशी करावी या विषयींचा एक ताम्रलेख प्राप्त झाला असून– राजाची मुद्रा, राजाची सही. लिपिकाचे हस्ताक्षर याविषयीं पूर्ण खात्री करावी असे त्यांस सांगितले आहे. (पहा– शिलाहारवंशी राजा रट्टराज याचा शक ९३० संवत् किंवा इ.स. १०६५ चे दानपत्र– एप्रिग्राफीका इंडिया, भाग ३, पृष्ठ ३०२)

त्यानंतर प्रांतीक शासक या लिखित राजपत्रास आपल्या भूमापन यादीत राजाज्ञेची दिवस, तारीख, वार इत्यादींसह नोंद करीत असे. राजांकडून दिल्या गेलेल्या सर्वच सनदांवर महत्त्वाच्या कागदपत्रांवर राजमुद्रा असे. बऱ्याच दानपत्रात, ताम्रपत्रात राजमुद्रेचा उल्लेख असतो त्याचबरोबर वेगळा राजमुद्रेचा तांब्याचा तुकडा जोडलेला असे. बऱ्याच राजमुद्रांवर राजा, राजाचे पूर्वज यांची नामावलीच दिलेली दिसते. अशापैकी कन्नोजचा रघुवंशी प्रतिहार राजा भोजदेव तथा मौखरीचा राजा रवि वर्मा आदिंच्या मुद्रा आहेत.

स्थानिक सरकारच्या भिन्न भिन्न कर्मचारी त्यांची कामे इत्यादि माहिती असलेले बरेच शिलालेख सापडले आहेत. महत्तर (ग्रामसभा अध्यक्ष), ग्रामिक (ग्रामसभा मुख्यशासक), शौल्किक (कर वसूल करणारा कर्मचारी), गौल्मिक (किल्ल्यांचा अध्यक्ष), ध्रुवाधिकरण (भूमिकर घेणारा कर्मचारी), भांडाराधिकृत (कोषाध्यक्ष), तलवाटक (ग्रामसभेचा हिशोब लिहिणारा), विविर किंवा लेखनिक (क्लार्क), करणिक (रजिस्ट्रार), दंडपाशिक, चौरोद्धरणिक वगैरे रक्षकदलातील कर्मचारी. (पहा– वैद्य हिस्टरी ऑफ मिडिएवल इंडिया, भाग १, पृष्ठ १२८/४१)

**आय–व्यय**

राज्यास अनेक भागातून उत्पन्न मिळत असे. सर्वाधिक आय भूमिकरापासून मिळत होती. भूमिकर उत्पन्नाचा सहावा भाग मानला गेला आहे. अतिरिक्त कर म्हणून बऱ्याच वेळा धान्यसाठाही राज्यास प्राप्त होत होता. मणहिपिका (चूंगीकर) नांवाचा कर अनेक पदार्थांवर लावलेला होता. किनारपट्टीतील राज्यांत बंदरावर उतरणाऱ्या दुसऱ्याराज्यातून आलेल्या वस्तूंवर (मालावर) सीमा कर (आयातकर) लावलेला होता. जुगाराचे अड्डे, द्यूत गृह, पत्त्यांचे गांजिफा जुगार, खाद्यवस्तू (बाहेर विकल्या जाणाऱ्या) आदिंवर कर लावलेले असत. ह्युयेन चँग म्हणतो, भारतातील करपद्धति, इतर करपद्धतिंशी पाहता अत्यल्प आहे. त्याने पुढें राजकीय जमा संपत्तीची चार वेगवेगळ्या पद्धतित विभागणी केली आहे. राज्याच्या जमेचा एक भाग सरकारी खर्च तथा राष्ट्रीय कार्यासाठी खर्च होतो. दुसरा भाग सार्वजनिक कार्यकर्ता प्रशिक्षण पोषणासाठी खर्च होत असे. तिसरा भाग, शिक्षण आणि चौथा भाग भिन्न भिन्न धार्मिक संप्रदायांच्या धर्मार्थ कार्यासाठी खर्च होत असे. (पहा– ऑन युवान च्वांग्स ट्रॅव्हल्स, भाग १, पृष्ठ १७६/७७)

कृषिविकासातून पर्याप्त उत्पन्न मिळविणेसाठी वेगवेगळे शेतीप्रयोग केले जात असत. सरकारकडून भूमिचे मापन विनमोबदला करून दिले जात असे. त्यासाठी 'भूमिमापकलिपिक' नावाचा अधिकारीही नियुक्त केला जात असे. कित्येक शिलालेखात, मानदंड, निवर्तक, पदावर्त आदि मापन दंड दर्शविणारे शब्द आहेत. राज्याकडून लांबी या शब्दाचा स्पष्ट अर्थ दाखविणारे 'मापक' ठरवून दिला जात असे. 'पारमेश्वरीय हस्त' हे असेच एक परिमाण आहे. ग्रामांच्या सीमा निश्चित केलेल्या होत्या. ग्रामावर कर बसविला जात असे. प्रत्येक गावात गो-चरभूमि (गायरान) जोडलेली असे. इनाम, जाहगीर, बक्षीस आदिंच्या जमिनीवर, ग्रामांवर कर लावला जात नव्हता. राज्याकडून वर्णादि धातुंच्या हिरे, रत्न आदिंवर वेगवेगळे कर असत इतर वस्तूंहून यावरील कर अधिक असे. यासाठीही एक स्वतंत्र 'रत्नगृहरक्षक' नावाचा अधिकारी तथा बाजारपेठेतही अधिकारी नियुक्त केलेले होते. (पहा– वैद्य हिस्टरी ऑफ मिडिएवल इंडिया, भाग १, पृष्ठ १३३ तथा भाग २, पृष्ठ २४०)

**सार्वजनिक कार्य**

राज्याच्या प्रमुख कक्षाकडून समाजकार्य, विकास, वृद्धि, तथा आयोजन ही कार्ये होत असत. नगरात धर्मशाला तथा विहिर, पाणपोई, सार्वजनिक औषधालयें, पथिकालये, वृक्षलागवड, जलाशय, भोजनालये यांचे व्यतिरिक्त शिक्षणालयांसाठी राज्यें खर्च करीत असत. नाटक, गायन, नृत्य, बाहुल्यांचे खेळ, बैलांची झुंजी, हरिण शर्यती यांच्यासाठीही राज्यांकडून विशेष अनुदान दिले जात असे. मोठमोठ्या विद्वत्सभा ठिकठिकाणी जाहीर उत्सवासारख्या होत असत.

**सैनिक प्रबंध**

प्राचीन भारतात सैनिकशास्त्र (मिलीटरी सायंस) नावाचे शास्त्र हा विषय राजाच्या मुलांसाठी वेगळा असा शिकविला जात असे. तक्षशीला विद्यापीठात हा ग्रंथ शिकविला जात होता. नालंदा विश्वविद्यालयात अहिंसा शिकवित असल्याने हा विषय न शिकविता समाजशांति नावाचा एक वेगळा ग्रंथ शिकविला जात असे. महाभारतात सैनिकशास्त्र, शस्त्रविद्याशास्त्राबरोबर शिकविला जात असे. रामायणात तथा वेदकाळात प्रत्येक मानवटोळीत कोणी ना कोणी शस्त्रविद्याविशारद झालेला मनुष्य जातीप्रमुख होता. (जसे भारतात आलेल्या आर्यांच्या वेळीचा प्रमुख राजा महाण्याव्य भरत हा होता.) ऋग्वेदात शस्त्रांमधून ॐकार जाणवतो असे लिहिलेले आहे.

प्राचीन भारतात सैनिक विभाग शासन प्रबंधक नावाचा अधिकारी होता. सर्वसामान्य अधिकार प्रांतिक शासकांना

दिलेले असले तरी सैनिकांवर त्याचा अधिकार नव्हता. प्रांतातील सैनिक अधिकारी वेगळे नियुक्त केले जात हाते. सेनादल अधिकात अधिक असणे महत्त्वाचे समजले जात असे. सम्राट हर्षवर्धनाच्या सेनेत, ६० हजार हत्तीदल तथा २० लाख अश्वसारथीदल होते. युवान च्वांगनी हर्षाच्या सेनेचे चार भागात वर्णन केले आहे. हत्तिदल, अश्वदल, रथदल तथा पदाति (पायदळ) असे वर्णन आहे. (पहा– युवान च्वांग्स ट्रॅव्हल्स, भाग १, पृष्ठ १७०/७१)

या चार प्रकाराव्यतिरिक्त जलसेना नावाची आणखीही एक सेना प्राचीन भारतात प्रचलित होती. युवान च्वांगनी आपल्या यात्रावर्णनात मलाया, जावा, बाली, सुमात्रा आदि बेटांवर हिंदु राज्ये होती आणि त्यांचा व्यापारहू मूळ भारताशी सतत होता. त्यांचे स्वत:चे जलसैनिक आणि जहाजेही आहेत असा उल्लेख केला आहे. किनारपट्टीतील चोल राजघराणे जलसेना या भागावर एकूण उत्पन्नाच्या अर्धा भाग खर्च करीत असे. त्यांच्याकडे सुसज्ज जलसेना होती. सम्राट राजराज याने चोलराज्यांच्या प्रचंड जलसेनेस हरवून पुढे लंकेवर राज्य मिळविले होते. चोल राजांची प्रचंड जलसेना सम्राट राजेंद्रदेव चोल याच्या आज्ञेने हनुमान बेटे (अंदमान) निकुर्वरि बेटे (निकोबार) मालद्वीप यावर स्थापित केली होती. मॅगास्थनीस नावाच्या विद्वानाने सम्राट चंद्रगुप्ताची जलसेना होती असे लिहिले आहे. पूर्व-पश्चिम समुद्राधिपति असे चंद्रगुप्ताचे वर्णन केले आहे.

संपूर्ण सेनेचा प्रमुख अधिकारी 'महासेनापति' (जनरल) याचे सोबत महाबलाध्यक्ष तथा महाबलाधिकृत, नावाचे अधिकारी असत. भूदल तथा अश्वदल यांच्या प्रमुखास भटाश्वर सेनापति म्हणत असत. घोड्यांच्या सेनेचा प्रमुख 'बृहपाश्ववार' नावाचे ओळखला जाई. युद्धविभागाच्या प्रमुख कोषाध्यक्षास 'रण भांडागारधिकरण' असे नांव होते. युद्धासाठी आवश्यक सामुग्री एकत्रित जमवितो त्या अधिकाऱ्यास महासाधनिक असे पदनाम होते.

सेनेतील शिपायांना रोख रकमेने वेतन दिले जाई. (प्रांताधिकाऱ्याच्या नियमनातील सरकारी कार्यकर्त्यांना धान्याच्या रूपाने वेतन दिले जात होते.) 'स्थिर सेना' (स्टॅंडिंग आर्मी) या दलाच्या व्यतिरिक्त 'अस्थायी सेना' नावाचाही एक भाग प्रमुख राजधानी, मोठ्या नगराच्या रक्षणासाठी तयार असत. यांचेसाठी स्वतंत्र शिक्षण शिबिरे भरवित असत तथा महाबलाध्यक्ष पदाचा अधिकारी अशा शिबिरांना मार्गदर्शन करीत असे. वेगवेगळ्या राज्यातील नागरिकांना सेनेत भरती केले जाई. गुप्तवार्ता तथा गुप्तहेर यांचे काम ते करीत. काश्मीर नरेशांनी त्रावणकोर या दक्षिणेतील लोकांना आपल्या गुप्तवार्तालाप सैन्यात भरती केलेले दिसते.

**राजनैतिक स्थिती तथा शासनपद्धति-परिवर्तन**

नंतरच्या काळात भारतातील राजनैतिक स्थिती अस्थिर झाली. अनेक लहान लहान राज्ये उत्पन्न झाली. श्रीहर्ष तथा पुलकेशी यांच्या मृत्युनंतर त्यांच्या एकसंघ राज्याचे अनेक भाग झाले. सोळंकी, पाल, सेन, प्रतिहार, यादव, गुहिल, राठोड आदि बरेच वंश आपापली उन्नती करीत होते. या उन्नतितून नवनवी राज्ये उत्पन्न झाली. त्यातून एकसंघत्वाची शक्ति विघटित झाली. याची परिणती एकसंघत्वाची भावना बदलत गेली. बहुतेक या सर्व राज्यात आपापसात युद्धे होत असत त्यातून समाजातील शांतता बिघडत गेली. या सर्वांचा परिणाम देशातील सर्वच शासनपद्धति तथा राजकिय संस्थांची स्थिती बिघडत गेली. परिणामी अनेक राजे स्वैराचारी, उच्छृंखल बनत गेले. देशाच्या शासनापेक्षा करमणूक अधिक महत्वाची ते समजूं लागले. राजा दरबारात येत नसल्याने अधिकारी प्रजेचा आवाज ऐकत नसत. राजास भेटण्यासाठी लाच-लुचपत बळावली. राज्याच्या रक्षणासाठी नवीन कर लादले जात असत. राजा स्वेच्छेने मंत्रिपरिषद तयार करूं लागला. क्रमागत मंत्रिपरिषदेची पद्धति बदलली.

अशावेळी सर्वच यंत्रणा राजाच्या इच्छेने नव्याने नियुक्त केली जात असे. ११व्या तथा १२व्या शतकातील शिलालेखांमध्ये राजामात्य, पुरोहित, महाधर्माध्यक्ष, महासंधिविग्रहक, महासेनापति, महामुद्राधिकृत (राजमुद्रेचा रक्षक), महा-क्षपटलिक, महाभोगिक आदि नावांचा संदर्भ दिसतो. त्यावरून शासनपद्धतित येथपर्यंत परिवर्तन झालेले दिसत नाही. याकाळी पूर्वीच्याच परंपरा पद्धतिनें शासन होते. या अधिकाऱ्यांच्या 'महा' या उपाधिने यांचे हाताखाली अनेक लोक काम करतात हे दिसते. महाराणी तथा युवराज हे दोघेही शासनकार्यात भाग घेत असत. याकाळी राजाच्या अनुपस्थितीत प्राग्विवाक (न्यायाधीश) नावाचा अधिकारी प्रजेस न्याय देत असे.

अरब यात्री अल्बरूनी लिहितो–

अभियोग उपस्थित करण्यापूर्वी वादी आपल्या म्हणण्याच्या पुष्ठ्यार्थ प्रमाण सादर करीत असे. लिखित प्रमाण नसल्यास किमान ४ साक्षीदार आवश्यक असतात. बलात्कार, हत्या, बालहत्या, स्त्रीहत्या, भ्रूणहत्या आदिंसाठी प्राणदंडापासून ते संपत्ति सरकारजमा होणे तथा देशनिर्वासित केले जात असे. चोरीच्या अपराधात ब्राह्मणांस डोळे काढणे, उजवा हात कापणे, डावा पाय कापणे आदि शिक्षा दिल्या जात असत. क्षत्रियास डोळे काढणेची शिक्षा केली जात नसे. (पहा– अल्बरूनीज इंडिया, भाग ३, पृष्ठ १५८/६३)

नंतरच्या काळात सैनिक व्यवस्थेत बरेच परिवर्तन येत गेलेले दिसते. राजे विलासी बनत गेल्यामुळे एकतर अधिक सेना मंत्रिगण जमवित असत आणि त्यायोगे राजास मारून राज्यावर स्वत: बसत. म्हणून कित्येक विलासी राजे आपल्या राज्यात राखीव सैन्य ठेवित नसे. बऱ्याच वेळेस तशा सक्त आज्ञा असलेली ताम्रपत्रे उपलब्ध आहेत. त्यातून राजांचा विलास निर्वेध चालला. त्याचबरोबर जाहगीरदार, सरदार यांचेकडे सैन्य दिले गेले. गरजेनुसार राजा सैन्यास पाचारण करील असे फर्मानही काढलेले दिसते. त्यामुळे भिन्न भिन्न राज्यातील व्यक्ति सेनेत दाखल झाल्या. त्याचबरोबर भिन्न भिन्न राजांचे वैयक्तिक रागद्वेष, कन्या, दासी, स्त्रीसाठी आपापसातील मतभेद वाढत गेले. पारस्परिक द्वेष तथा शत्रुता वाढलेले सर्वच राजे निर्बल बनत गेले.

८व्या शतकात सिंध प्रांत मुसलमान राजांनी ताब्यात घेतला होता. ११व्या शतकात लाहोर पर्यंतचा पंजाब प्रांत त्यांनी काबीज केला. १२व्या शतकाच्या अंती,

दिल्ली, अजमेर, कन्नौज आदिप्रांत त्यांनी ताब्यात घेतले. नंतरउत्तर प्रदेश, बंगाल, बिहार यांना सल्तनतीत सामील केले. नंतर दक्षिणेत मुसलमान राजे सावकाश घुसत गेलेले दिसतात सावकाश सावकाश १५ व्या शतकानंतर एकही हिंदु राज्य त्यांनी ठेवले नाहीं. विलासी राजांचा अंत मंडलिक, आश्रीत राजा म्हणून झालेला दिसतो.

**आर्थिक स्थिती**

प्राचीन भारतात आध्यात्मिक दृष्टीने उन्नति पथावर गेलेला समाज आपण पाहिला. आध्यात्मिकतेबरोबर भौतिकपथावर देखील हा समाज उन्नत पावलेला दिसतो. आपण क्रमश: कृषी, पाटबंधारे, व्यापारी नगरे, जलमार्ग व्यापार, धातु व्यापार, कांचसामान व्यापार, गणसंस्था, चलनी नाणी तथा सर्वसामान्य आर्थिक स्थिती यांचा परामर्ष घेऊ.

**कृषि व्यवस्था**

प्राचीन भारतात कृषी हा प्रमुख व्यवसाय मानलेला होता. कित्येक प्रकारची अन्नधान्ये, फळफळावळ येथें उत्पन्न होत असत. राज्याकडून कृषीविषयीं प्रत्येक बाबींत मदत दिली जात असे. नदी-नाले, ओढे, तलाव, पाझर तलाव, विहीरी तथा लघु पाट-बंधारे यांची व्यवस्था शेतीनिष्ठ पाणी वापरासाठी विशेष पद्धतिने केलेली होती. राजतरंगिणी नामक ग्रंथात सूर्यदेव नावाच्या इंजिनियराचे वर्णन मिळते. काश्मीर देशात महापूर आला असता सम्राट अवन्तिवर्मन् राजाने या सूर्यदेव अभियंत्रिकास व्यवस्थापनासाठी पाठविले होते. त्याने विवस्ता (झेलम्) नदीच्या तीरावर मोठमोठें बांधारे बांधविले. त्यांतून अवजलकालवे (टेलरेस वॉटर) उत्पन्न केले. त्याचबरोबर काश्मीर देशातील प्रत्येक ग्रामाचे याने सर्वेक्षण घेतले आणि प्रत्येक गावाची पाण्याच्या वापराची निश्चित क्षमता शोधिली. त्यानुसार प्रत्येक ग्रामास यथोचित जल मिळण्याची व्यवस्था केली. काश्मीर पंडित कल्हण लिहितो कि सूर्यदेवाने, गारूडी सापास नाचवितात तसे नद्यांना नाचविले आहे. या मुळे शेतीउत्पन्न वाढले. सर्वसामान्य बाजारपेठेतील धान्याचा भाव, २०० दिनारास एक पोते भात (चावल) यावरून ३० दिनारावर आला. तामिळ प्रांतात नदींना त्यांच्या समुद्रमुखाजवळ पाणी आडवून तेथें तलाव करीत असत. करिकालचोला राजांनी दक्षिणेत कावेरी नदीवर एक मैल लांबीचा बंधारा बांधलेला होता. चोल राजा राजेंद्रदेवाने (१०१८ते १०३५ सन) आपल्या राजधानीजवळ मोठा जलाशय बांधलेला होता.

सम्राट चंद्रगुप्त मौर्याने गिरनार पर्वताच्या पायथ्याशी एका विशाल सरोवराची निर्मिती केली. सम्राट अशोकाने त्यातून बरेच कालवे तयार करविले. (पहा– दी पोलिटिकल इन्स्टिट्यूशन्स अँड थियरिज ऑफ दी हिंदूज– पृष्ठ १०३/४) वेळोवेळी या तलावाची तथा कालव्यांची दुरूस्ती होत होती.

अनेक राजांनी आपल्या नावानी मोठमोठे तलाव बांधलेले दिसतात. असे तलाव आजही बऱ्याच ठिकाणी दिसतात. परमार राजा भोज याने भोजपूर गांवी खूप मोठा तलाव बांधला होता. त्याकाळी जगातील सर्वात मोठा कृत्रिम तलाव म्हणून तो ओळखला गेला होता. मुसलमान राजांनीं नंतर त्याचा विध्वंस केला. अजमेर या गांवी आनासागर, बीसला, आदि तलाव पूर्वीच्या राजांनी बनविलेले होते. विहिरीतून पाणी उपसून शेती करण्याची पद्धत भारतातून श्रीलंकेत गेली. सम्राट पराक्रमबाहु (११५० इसवी सन) याने लंकेत १ हजार ४७० तलाव तथा ५३४ कालवे तयार केले. वेळोवेळी त्यांची दुरूस्ती होती होती. (पहा– थिअरिज ऑफ दी हिंदूज, पृष्ठ १०३/४)

**व्यापारी नगरे**

कृषीनंतर, दुसरा क्रमांक व्यापार उद्योग याचा लागतो. प्राचीन भारतात व्यापाराची मोठमोठी केंद्र, बाजारपेठा होत्या. पांडववंशी राजांची राजधानी मदुराई (मदुरा) हे एक विस्तृत केंद्र होते. गगनभेदी तथा अतिसुंदर वास्तूंनी हे नगर नटलेले होते. मलबार प्रांताच्या किनारपट्टीवर वंजी (वंची) नांवाचे शहर व्यापाराची बंदरपेठ होती. कोरोमंडल म्हणून प्रसिद्ध असलेल्या समुद्रतटावर 'कावेरीप्पुंपहितम्' किंवा 'पकर' नावाचे उत्तम बंदर जहाज नांगरण्यासाठी उपयोगात आणले जात होते. सोळंकी राजवंशाची राजधानी वातापी (बादामी विजापूर जिल्हा कर्नाटक) हे आंतरराष्ट्रीय व्यापारी केंद्र होते. बंगाल प्रांतात 'ताम्रलिप्ति' (तमलक) हेही विशाल व्यापारी बंदर होते. येथून चीन, जपान तथा पूर्वेकडे व्यापार होत होता. कन्नोज हे प्राचीन काळापासून आंतरराष्ट्रीय ख्यातीचे व्यापारी केंद्र होते.

मालव प्रांतात उज्जयिनी महानगरी ही विशातिविशाल अशी बाजारपेठ होती. येथूनच उत्तर भारत तथा गुजरातेतील भडोच या बंदराशी साधनसामुग्री. परदेशात जाण्यासाठी निघत असे. यालाच 'मध्यस्था नगरी' असेही उल्लेखिले जाते. उत्तर भारत तथा दक्षिण भारत यातील बाजारपेठांना आयात-निर्यात कामासाठी मदत करणारी नगरी जी मध्यात आहे अशी उज्जयिनी नगरी. असाही या नगरीचा प्राचीन उल्लेख दिसतो. या नगरीत– 'पाहिला नाही माळवा। आणि फिटली नाही भ्रांत।'' असे अनेक कवींनी यथार्थ वर्णिलेले आहे. 'उज्जयिनींत नाहीं असे या जगात कांहीच नाहीं', अशा गौरवपूर्ण उद्गारांनी या व्यापारीपेठेचे वर्णन आहे. येथे बौद्ध, जैन, वैष्णव, शाक्त, शैव, कौलिक, वेदांति, असे अनेक भिन्न धर्मप्रवाह सुखाने तथा शांतीने राष्ट्रीय समभावाने प्रत्येक उत्सवात एकत्रित येत असत.

मुंबई प्रांतात, भडोच (भृगुकच्छ) या बंदरातून फारस (पर्शिया) मिश्र, (इजिप्त) आदि देशांकडे भारतातून मालाची निर्यात होत असे. पाटलीपुत्र महानगरी ही मौर्य साम्राज्यापासून उन्नत नगरी होती. मेगास्थिनिस या विद्वान प्रवाशाने या नगरीचे विस्तृत वर्णन केलेले आहे. तो म्हणतो, या नगरीत ५७० बुरूज तथा ६४ वेगवेगळे दरवाजे होते. या नगरीचे क्षेत्रफळ २१ १/२ मैल होते. (रोमचा सम्राट अरेलियनच्या कालखंडातील एकूण रोमन साम्राज्याच्या दोनपटीने ही संख्या अधिक आहे.) अशी कितीतरी लहानमोठी केंद्रे भारतात त्याकाळी विद्यमान होती.

**व्यापाराचे जलमार्ग**

प्राचीन भारतात स्थलमार्ग तथा जलमार्ग अशा दोन मार्गांनी व्यापार चालत होता. जलमार्गाच्या व्यापारासाठी मोठमोठी केंद्रे तथा जहाजबांधणी कार्यालयें (कारखाना) उत्पन्न केलेली होती. अरबस्थान, फिनिशिया, फारस, मिश्र, ग्रीस, रोम, चंपा,

जावा, सुमात्रा, जपान, चीन अशा अनेक देशांशी जलमार्गाने भारतातून आयात-निर्यात चालत असे. चीनी यात्री युवान च्वांग यास जहाजातून चीनकडे जाण्यासाठी सांगितले होते. तथापि चीनी यात्री प्रकृति अस्वास्थ्यामुळे जलमार्गाने गेला नाहीं. असे त्यानेच लिहिलेले आहे. जावा या बेटातील लोककथांप्रमाणे, ५ हजार भारतीय लोक एकदा आपल्या द्वीपावर उतरले आणि त्यांनीबरोबर 'ईश्वराचे ज्ञान' आणले, जादू आणली, परी आणली, हे वर्णन– भारताशी जहाजाने मनुष्यें जाणे अशा अर्थाचे आहे.

प्रथम चीनी यात्रिक इत्सिंग हा परत जाताना भारतातून जलमार्गानेच चीनला परत गेला आहे. असे तोच म्हणतो.

प्रोफेसर मॅक्स डंकर यांच्या म्हणण्यानुसार इसवी सन पूर्व २ हजार वर्षेपासून भारतात जहाजबांधणी तथा जलसैन्यपद्धति जाणीत होते. (पहा– सारडा – हिंदु सुपिरियॉरिटी, पृष्ठ ३६४) हिंदु ही मनुष्यजात अनेक कलांमध्ये प्रवीण होती. परमेश्वराशी प्रत्यक्ष बोलता येते असे ठामपणे विश्वास ठेवणारा हा वंश, जगातील अनेक मानववंशाची परिपूर्णावस्था करू शकेल असे ज्ञान या आर्यवंशाकडे दिसते. असेही प्राध्यापक महाशय म्हणतात.

**व्यापाऱ्याचे स्थलमार्ग**

जलमार्गाप्रमाणेच स्थलमार्गानेही खूपच व्यापार होत असे. प्राचीन भारतात व्यापारासाठी मोठमोठे महामार्ग, रस्ते तयार केलेले होते. युद्धासाठीसुद्धा या महामार्गांचा अवलंब करीत असत. एक विशाल महामार्ग कोरोमंडल किनाऱ्यावर पूर्वीपूरम्पासून ते कुमारी अंतरीप (कन्याकुमारी) पर्यंत १ हजार १०० मैल लांब होता. हा मार्ग कुलोत्तुंग चोड़देव राजाने (इ.स. १०७०/१११८) बनविला होता. मौर्यकालात पाटलीपुत्र ते अफगाणिस्तान ११०० मैलाची सडक बनविली होती. सामान्य राजमार्ग खूपच बनविलेले होते. स्थलमार्गाने स्वदेश तथा विदेशात व्यापार होत असे. राइज डिविड लिहितो– भारतातून स्वदेश-विदेश असा व्यापार अहोरात्र चालत असे. ५ हजार बैलगाड्यांच्या एका गटाचे सविस्तर वर्णन प्राप्त झाले आहे. स्थलमार्गातून चीन, बाबीलानदेश, अरबस्थान, फारस आदि भागात भारतातून व्यापार होत असे. (पहा – १९०१ सालचा. दी जर्नरल ऑफ दी रॉयल एशियाटिक सोसायटी)

इंग्रजी भाषेचा विश्वकोष एन्सायक्लोपिडिआ ऑफ ब्रिटानिका, भाग ११, पृष्ठ ४५९) प्रमाणें. युरोपीय देशांती भारताचा व्यापारसंबंध दोन पद्धतिने होत होता. (१) भारतातून दक्षिणेतील पलमायरा नामक शहराच्या द्वारा रोम तथा सिरिया देशांकडे व्यापार होत असे. (२) हिमालय पर्वत पार करून आक्सर देशातून कॅस्पियन समुद्र आणि तेथून मध्य युरोपाकडे भारतीय माल जात असे.

**भारतीय व्यापार**

प्राचीन भारतातून, रेशीम, वाक (घायपात), मलमल आदि भिन्न भिन्न प्रकारांची वस्त्रप्रावरणे, मणि, मोती, हिरे, मसाल्याचे पदार्थ, मोराची पिसे, हस्तिदंत आदि वस्तू विदेशात जात असत. इजिप्तमधील अधिकांश ममीज्मधून भारतीय बनावटीची मलमल सापडलेली आहे. अतिप्राचीन गणल्या गेलेल्या थडग्यातूनदेखिल भारतीय मलमल मिळाली आहे. प्लीनी नामक विद्वान् लिहितो – प्रतिवर्षी रोमन साम्राज्यातून दहा लाख पौंड (एक कोटि रुपये) इतकी रक्कम भारतात येत असे. (पहा– दी जर्नल ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी, १९०१ सन) तसेच केवळ रोम शहरातून चाळीस लाख रुपये भारतात येत असत. (पहा– एन्सायक्लोपिडिया ऑफ ब्रिटानिका, भाग ११, पृष्ठ ४६०)

प्राचीनकाळी भारतात आंतरिक व्यापार मेळे वेगवेगळ्या तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भरविण्याची प्रथा होती. आजही हरिद्वार, वाराणसि, पुष्कर आदि ठिकाणी व्यापारीमेळे भरत असलेले दिसतात.

**प्राचीन भारतातील व्यवसाय**

कृषीव्यतिरिक्त प्राचीनकाळी भारतात व्यवसाय, उद्योगधंदे यांची परिपूर्णता होती. सर्वात अधिक लोक वस्त्राचा व्यवसाय करीत असत. वेगवेगळ्या पद्धतिने तथा वेगवेगळ्या धाग्यांनी वस्त्रे तयार करीत असत.

कांही पश्चिमात्य तथा भारतीय विद्वानांच्या म्हणण्यानुसार भारतात श्रीहर्षाच्या काळापर्यंत 'सुईने शिवणे'ची कला माहित नव्हती हे सांगण्यासाठी युवन च्वांगचे एक कथनही ते देतात. (पहा– चि. वि. वैद्य, हिस्टरी ऑफ मिडिएवल इंडिया, भाग १, पृष्ठ ८९ तथा वॉर्टर्स – ऑन युवान च्वांग्स ट्रॅव्हल्स, भाग १, पृष्ठ १४८) परंतु या पाश्चात्य किंवा भारतीय विद्वानांचे अनुमान भ्रांतिपूर्ण आहे तथा असत्य आहे. भारतात शीत, उष्ण, तथा शीतोष्ण प्रदेश असल्याने भिन्न भिन्न स्थानी भिन्न भिन्न प्रकारची वस्त्र परिधान केली जात होती. ऋग्वेदात तथा ब्राह्मण ग्रंथात सुई शब्दासाठी सूचि (ऋग्वेद मंडल २/३२/४॥) तथा 'वेशी' (ऋग्वेद मंडल ७/१८/१४॥) असे शब्द आहेत. तैत्तिरिय ब्राह्मण ग्रंथात 'सुई' तीन प्रकारची असते. लोखंड, चांदी आणि सोने असे ते तीन प्रकार आहेत असे सांगितले आहे. (तैत्तिरिय ब्राह्मण ३/९/६॥).

ऋग्वेदात कातरी (कैची) साठी 'भुरिज' असा शब्द आलेला आहे. (ऋग्वेद मंडल ८/४/१६॥). सुश्रुत संहितेत बारीक धाग्यांनी शिवण्याविषयी– 'सीण्ये सूक्ष्मेण सूत्रेण' असे वर्णन आहे. रेशमी पायघोळ वस्त्रासाठी 'तार्प्य' असा शब्द अथर्ववेदात आहे (अथर्ववेद १८/४/३१). लोकरीच्या अंगरख्यास 'शामूल' असे म्हणत असत (जैमिनीय उपनिषद ब्राह्मण १/३८/४॥). द्रापि नावाचे (ऋग्वेद १/२५/१३) एक प्रकारचे शिवलेले वस्त्र होते. पंडीत सायणाचार्यंनी हे द्रापिवस्त्र युद्धासाठी वापरीत असत असे सांगितले आहे. कापडाबरोबर 'चर्म'ही विणले जात होते. भस्त्री (थैली) चे वर्णनही वैदिक साहित्यात मिळते. यावरून एतद्देशीय किंवा पाश्चात्य विद्वानांचे अनुमान पूर्णत: चुकीचे दिसते. भारतात विणण्याची कला प्राचीन काळापासून विद्यमान होती.

स्त्रियां अंतरीय किंवा साडी नेसत असत. जी अर्धी नेसली जात असे आणि अर्धी पांघरली जात असे. घराबाहेर निघतांना यावर एक उत्तरीय (दुपट्टा) घेत असत. नृत्यासाठी जरीचे काम केलेला परिकर (लेहेंगा) वापरित असत. या परिकरास 'पशेस्' असे म्हणत असत (ऋग्वेद २/३/६६॥). मथुरा प्रांतात कंकाली डोंगराच्या उत्खननात सापडलेल्या एका शिलेत राणी तथा दासी यांचे चित्र आहे. ज्यात राणी परिकरात असून वरून उत्तरीय

वस्त्र घेतलेले आहे. (पहा– स्मिथ, मतुरा ॲंटिक्विटिज, प्लेट १४.) स्मिथ यांनी आपल्या पुस्तकात एक जैनमूर्ती, त्याखाली एक श्रावक तथा तीन श्राविका उभे असलेले मूर्तिचे चित्र दिले आहे. यातील तीनही श्राविकांनी परिकर, उत्तरीय नेसलेले आहे. (पहा– स्मिथ–मदुरा ॲंटिक्विटिज, प्लेट ८५.) दक्षिण भारतातदेखिल नृत्याच्या वेळी परिकर घालण्याची प्रथा होती. त्याकाळी स्त्रिया छिटाचे बारीक बारीक कलाकुसर असलेली वस्त्रे परिधान करीत; जसे अजंठा येथील गुहांमध्ये लहान मुलास मांडीवर घेऊन बसलेल्या श्यामवर्णीय स्त्रिचे सुंदर चित्र आहे. या चित्रात कमरेच्या खालीपर्यंत अर्ध्या बाह्या (हात असलेले छिटाचे अंगरखे घातलेली स्हे. (स्मिथ– आक्सफर्ड–हिस्टरी ऑफ इंडिया, पृष्ठ १५९) व्यापारीजन कापसाच्या सुताचा अंगरखा तथा विजार (चोंगा) वापरीत असत. दक्षिणेतील लोक सामान्यत: धोतर-लुंगी नेसत असत. या धोतींना सुंदर सुंदर किनारी (कांठ) असत. एक धोती नेसत असत तथा दुसरी धोती पांघरीत असत. काश्मीर भागाकडे कछनी (हाफ् पँट) घालीत असत.

या सर्व पेहेरावात, विविधता, सुंदरता तथा स्वच्छता यांजकडे विशेष लक्ष दिले जाई. कन्नौज येथील राजकन्या राज्यश्री हिच्या विवाहप्रसंगी तयार केलेल्या वस्त्रांचे वर्णन बाणभट्टाने केलेले आहे. रेशीम, कापूस, लोकर, सापाच्या कातडीसारखे पारदर्शक तथा विलोभनीय, सामान्य श्वासाने सहज हे कापड उडून जात असे. स्पर्शास अनुमेय, इंद्रधनुष्याच्या अनेक रंगछटा असलेल्या विविध कपड्यांनी राजवाडा भरून गेलेला होता. (बाण– हर्षचरित, पृष्ठ २०२/३) बहुतेक स्त्रिया रंगीत कपडे वापरीत असत. बौद्ध साधु बहुतकरून लाल रंगाचे, हिंदु संन्यासी भगवा रंग, श्वेतांबर जैन साधु पांढरा किंवा पिवळा, अशा रंगाचे कपडे परिधान करीत. विधवा स्त्रिया स्वच्छ पांढरे कपडे घालीत. राजे लोक डोक्यावर रत्नजडित मुकुट धारण करीत. सामान्य लोक डोक्यावर उष्णीव (पगडी) घालीत असत. पुरुषही खूप लांब लांब केस राखीत असत. स्त्रिया भिन्न भिन्न प्रकारांनी केशविन्यास करीत असत. त्याकाळच्या मूर्तीही केशविन्यास केलेल्या दिसतात. केसांचा मागे अंबाडा बांधून त्यावर पुष्पमाला बांधीत असत. त्याचबरोबर रत्नजडीत अलंकारही घालीत. ब्राह्मण लोक डोके तथा दाढीचे केस कापीत असत. क्षत्रिय केस दाढी कापीत नसत.

त्या काळी भारतात सूक्ष्मातीसूक्ष्म तलम मलमल, छिट, लहान शाली, दुशाली आदि कशीदाकारीचीही कामें होत असत. कपड्यांना रंगछटा देणे (डाईंग तथा प्रिंटींग) त्यावर बेलबुट्टी काढणें आदि कामे होत असत. भिन्न भिन्न वनस्पतींपासून भिन्न भिन्न रंगद्रव्ये तयार करीत असत. ही कला प्राचीन काळापासून भारतात विद्यमान होती. निळीची शेती ही प्राचीन काळापासून भारतात सुरू होती. वस्त्रोद्योग अठराव्या शतकापर्यंत निर्वेधपणे चालू होता. ईस्ट इंडिया कंपनीच्या आगमनानंतर हा व्यापारउद्योग नष्ट झालेला आहे.

### धातुंचे व्यापार

कच्च्या लोखंडाचा तापवून रस तयार करून त्यातून पोलाद तयार करण्याची कला प्राचीन भारतीयांना माहीत होती. शेतीविषयक औजारे तथा युद्धासाठी शस्त्रास्त्रे ही अतिप्राचीन काळापासून चालत आलेली आहेत. त्यां काळी लोखंड फिनिशिया तथा युरोपीय देशांसाठी निर्यात केले जात असे. दश्मिक देशातील धारदार हत्यारांना युरोपात खूपच मागणी होती. कारण दश्मिक लोक फारस देशातून ही कला शिकून आले. फारस देशातील लोक पूर्वेकडील भारतातून ही कला शिकून आले. फारस देशातून अरब लोक ही कला शिकून आले असे वर्णन लोखंडी हत्यारांविषयीचे हिंदु सुपिरियॉरिटी (पृष्ठ ३५५) या ग्रंथात आहे.

भारतातील लोक-व्यवसाय पद्धतिचा उत्कर्ष समजण्यास आपणास दिल्ली येथील कुतुमबीनारजवळ असलेला 'अशोक स्तंभ' पर्याप्त आहे. इतका विशाल स्तंभ युरोप किंवा अमेरिका येथील मोठ्यातील मोठा कारखाना पिघळविला तरी तयार होत नाही. या स्तंभास बनवून किमान १५०० वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे. सूर्य, वारे, पाऊस यांना हा सतत तोंड देतो आहे तरीही 'गंजलेला' नाहीं. तसेच यावरील सूक्ष्म कारगिरी ही तशीच सुबक, सुंदर आहे. थार राज्यातील जयस्तंभही दर्शनीय आहे. मुसलमानी आक्रमणात हा तोडला गेला. याचा एक खण्ड २२ फूट तथा दुसरा १३ फूट लांबीचा आहे. याचाच एक अवशेष मांडु येथील उत्खननात नुकताच सापडला आहे.

एनिशियंट ॲंड मिडिएव्हल इंडिया (भाग २, पृष्ठ ३६५) या पुस्तकात– श्रीमति मॅनिंगबाई लिहितात– आजही ग्लॅसगो तथा शेफील्ड येथें बनणारे पोलाद भारतातील कच्छ येथें बनणाऱ्या पोलादापेक्षा प्रतिने हलके आहे. भारताइतके चांगले पोलाद जगात नाहीं.

सोने-चांदी या धातुंचा वापर, पूजापात्र, अभिषेकपात्र, भोजनपात्र, अन्न शिजविण्यासाठीं पात्र, स्वयंपाकघरातील वस्तू, शस्त्रे, शल्यचिकित्सेची हत्यारे, मुखवटे, आभूषणें, खेळणी, घंटा, घोड्याच्या रिकिबी, प्राण्यांची आभूषणे हत्तीवरील अंबारी पालखी, राजदंड, राजसिंहासन, चलनी नाणी, पूजेच्या किंवा व्यक्तिच्या मूर्ती, बाण, तलवार, भाला आदि शस्त्रे आदि कारणांसाठी होत असे. तांब्याचा उपयोग सर्वसामान्य पात्र म्हणून केला जात असे. सोन्याच्या पात्रांवर वेगवेगळ्या पद्धतिने कापलेली रत्ने लावीत असत. अशा कांही रत्नजडित भांड्यावर संपूर्ण बुद्ध जातक लिहिलेले दिसते. यातील कितीतरी पात्रांवर माणिक, पन्ना, वैडुर्य, रत्ने तथा पोवळे चिकटविलेले दिसतात. हे सर्व 'पचीकारी' किंवा 'पंचकारी' या पद्धतिने मध्ये व इतरत्र ४ असे ५-५ खडे लावलेले आहेत. सुवर्णमूर्तीच्या कान, डोळे, बेंबी, हात, पाय, गुडघे, डोके अशा ठिकाणी रत्न-माणिक-पन्ना आदि चिकटविलेले दिसतात. स्फटिकाच्या बनविलेल्या कांही मूर्तींवरही रत्ने लावलेली दिसतात. पिपरावा येथील स्तूपाजवळ उत्खननात एक मूर्ती सापडली. ही एक फूट उंच मूर्ती आहे त्याचबरोबर वर्तुळाकार स्फटिकाचे एक पात्रही मिळाले. याच्या झाकणावर स्फटिकात कोरलेली एक सुंदर मासोळीही आहे.

पितळ तथा मिश्रधातुंच्या मूर्ती आजही आपण पाहतो आहोत.

यावरून धातुंविषयीं प्राचीन भारतीयांनी खूपच प्रगती तथा खाणकामाविषयी त्यांना माहिती होती हे सिद्ध होते.



# वाजे नगारा

## शापीत सर्पसाधू
(मागील अंकावरून)

**मोहनलाल अग्रवाल**

**मी** खूप उदास होतो. पश्चात्तापाने माझी मनस्थिती ठिक नव्हती. उदयनाथजींना वंदन करून, सामान झोपडीत तसेच ठेवून, आधीस्थापन केलेल्या स्मशानात जाऊन बसलो. निसर्गक्रमाला हातात घेऊन मी चार कुटूंबांची विल्हेवाट लावली. वैराने प्रेरीत होऊन घोर अपकृत्य करण्याचा पश्चात्ताप मला क्षणाक्षणाला तीव्र अग्नीसारखा जाळू लागला. पहिल्यांदा वैरामुळे मी पेटत होतो; आणि आता पश्चात्तापाने माझे मन अशांत होत होते. वैराग्नीपेक्षा पश्चात्तापाचा अग्नी जास्त प्रबल होता. ४-५ दिवस कांहीपण न खाता-पिता मी शून्य मन:स्थितीत पडून राहिलो. असे वाटायचे भूक-तहानेने शरिराला पीडा देऊन अंत करावा. झोप येत नव्हती. उदयनाथजी माझी मनोवेदना जाणीत होते. एक दिवस सकाळी उदयनाथजी आले व प्रेमाने त्यांनी माझे खूप सांत्वन केले. जसा श्रीकृष्णानें अर्जुनाला कर्माचा सिद्धांत समजावला तसे ते मला म्हणाले, ''एकाग्र चित्तानें केलेला पश्चात्ताप हा देवाजवळ मागितलेल्या क्षमेसारखा आहे, म्हणून पश्चात्ताप सोडून चारही शत्रूंच्या आत्म्यांच्या मुक्तीचा प्रयत्न करा. ते प्रेतयोनीत त्रास भोगीत आहेत. त्यांच्या मुक्तीने तुम्हांला सांत्वन मिळेल.'' त्यांच्या सूचनेवरून माझे थोडे समाधान झाले. मी लगेच चारही आत्म्यांना मुक्ती देण्याचा निर्णय घेतला.

रात्री चंडभैरवाचा प्रेताकर्षण मंत्रजप करून चारही प्रेतात्म्यांचे आवाहन केले. भेरूमल, गोपाल टंडन, वीरेंद्र मेहरा, देवचंद बन्सल त्यांच्या विकृत मुखाकृती घेऊन हजर झाले. मी त्यांना म्हणालो, ''मी तुमचा घातक आहे, तुमची जी कांही इच्छा असेल ती सांगा, माझे अनिष्ट करण्याची जर इच्छा असेल तर ती सुद्धा सांगा.'' चौघेही समजून

चुकले होते कीं, त्यांच्या हातून माझें अनिष्ठ घडणार नव्हते; त्यामुळें त्यांनी स्वत:च्या यातनामुक्तीसाठीची इच्छा प्रकट केली; मी त्यांना म्हणालो, ''मी परशुराम कुंडाकडे जाऊन तुमचे तर्पण करून पिंड देईन; तुमची प्रेतयोनीतून मुक्ती होईल.''

दुसऱ्या दिवशी सकाळीं मी उदयनाथजींना भेटून परशुराम कुंडाकडे जाण्याची इच्छा प्रकट केली. त्यावर ते म्हणाले, ''तुमचे कार्य पूर्ण करून देशाटन करा. बारा वर्षानंतर मी तुम्हाला परशुराम कुंडावर भेटेन.'' देशाटनाची साधुशाहींची पद्धत मला समजावून काही युक्ती-मुक्तीची साधने दिली; मला त्यांनी निरोप दिला.

चार-पांच दिवस आसाम-नेफाच्या सरहद्दीवर असलेल्या पर्वतात जाऊन राहिलो. परशुराम कुंडांत स्वत: भगवान परशुरामांनी मातृहत्येचे प्रायश्चित्त करण्यासाठी तर्पण केले.

परशुराम कुंडात स्नान करून, जव-तांदुळाचा भात करून, चार पिंड बनविले. परशुराम कुंडांत उभे राहून चार प्रेतात्म्यांना आवाहन करून पिंडदान केले. पिंड ते हातोहांत घेऊन गेले. त्यांना प्रेतयोनीमधून मुक्ती मिळाली. त्यामुळे माझ्या मनाचे खूप समाधान झाले. कुंडात उभे राहून प्रतिज्ञा केली की, अनिवार्य कारणाशिवाय कधीही माझ्या शक्तीचा दुरूपयोग हिंसेत करणार नाही. तीन महिने तिथेच राहून देवाचे नामस्मरण केले. तेथील वातावरण प्रशान्त महासागरासारखे मन-आत्म्याला शांती देत होते. पूर्ण स्वस्थता मिळाल्यावर देशाटन करण्यास रवाना झालो. तीन वर्षे राजस्थानात, अलवर, मेवाड, मारवाड, सिकर, जेसलमेर वगैरे विस्तारांत थोड्या अधिक प्रमाणात राहून नामस्मरणाबरोबर, तंत्रक्रियेचा अभ्यास करीत होतो. एकदा अलवरच्या पहाडांत चातुर्मास करीत असताना एका दसनामी सांप्रदायाचे साधु नागाबावा दत्तप्रकाश भारतीच्या संपर्कात आलो. ते हठयोगी होते. माझ्याबरोबर ते एक महिना राहिले. त्यांच्यापासून मी खूप प्रभावित झालो. ज्यांत एका दिवसाच्या प्रसंगावरून मी आजन्म त्यांचा ऋणी झालो. माझी साधना चालू असताना, माझ्या हातून काही उणीव राहिली त्यामुळे मला जीवघेणी मारहाण झाली. ज्या वीराचे मी साधन करीत होतो, त्यानेंच मला एका खडकावर जोराने आपटले; ज्यामुळें मला रक्ताच्या उलट्या व रक्ताचे शौचाला झाले. मृत्यू जवळ आला आहे असे वाटू लागले. त्याचवेळी दत्तप्रकाश भारतीनी स्वत:च्या बळावर माझे संरक्षण केले. एका आठवड्याने मी संपूर्ण बरा झालो. या प्रसंगामुळें मी त्यांचा ऋणी झालो. मी त्यांना त्यांचा शिष्य मला बनवून घ्यायची खूप विनन्ती केली. त्यांनी सांप्रदायाचा विचार करून सांगितले की, तुम्ही कुठल्याही सांप्रदायाचे असाल. परंतु कुठलीही साधना करण्यासाठी गुरूचे सान्निध्य आवश्यक आहे. तुमचा नाथ-सांप्रदाय सोडून दसनाम-सांप्रदाय अंगीकारण्याची काहीच जरूरी नाही.'' शेवटी माझा हट्ट पुरविण्यासाठी त्यांनी मला दिक्षा दिली. मी दसनाम-सांप्रदायाचा शिष्य बनलो. गुरूमहाराजांनी मला 'प्रयागभारती' नांव दिले. 'बालकनाथ' जाऊन मी 'प्रयागभारती' झालो. मी त्यांच्याबरोबर, भ्रमण करायचे ठरविले. थोड्या दिवसानंतर मला उज्जैनीच्या कुंभमेळ्यांत विराजसंस्कार करून नागाची पदवी देण्यात आली.

दसनाम सांप्रदायात जेव्हा दिक्षा देण्यात येते तेव्हा त्यांचे पाच गुरू असतात. ज्यांत शेंडीचा संस्कार करणारा मुख्य गुरु ओळखला जातो. बाकीचे चार भगवे वस्त्र, लंगोटी, भस्म, दंड, या ४ वस्तू देतात. अशारितीने संस्कार झालेल्या साधूला 'महापुरूष' म्हटले जाते. अशा रितीने स्वेच्छेनुसार महापुरूष म्हणून राहू शकतो. त्याला नागा बनायची इच्छा असल्यास कुंभमेळ्यांत होमसंस्कार होऊन नागा बनविले जाते. हा विधी खूप वेळ चालतो. वेद-मंत्राने हवनक्रिया करण्यात येते तेव्हा, साधुला वस्त्रे व इतर वस्तूंपासून मुक्त केले जाते. नदीच्या प्रवाहात उभे राहून मुख्य गुरूदिक्षा देणाऱ्या साधुच्या लिंगाला पकडून जोरानें तीन झटके मारतात. त्याची वेदना असह्य होते. ही पीडा खूप वेळां कांही साधूंना महिनोंमहिने होते. ही क्रिया पूर्ण झाल्यावर त्याला 'नागाजी' म्हणून ओळखले जाते. जे साधू हरिद्वारच्या कुंभमेळ्यांत दिक्षा घेतात, त्यांना 'बर्फाणी-नागा' म्हणतात. उज्जैनच्या कुंभमेळ्यांत संस्कार झालेल्यांना खुनी-नागा म्हणतात. अलाहाबादेतील नागांना 'राजराजेश्वरी नागा' म्हणून ओळखले जाते. आणि जे साधू नाशिकला दिक्षा घेतात त्यांना किचडिया-नागा म्हणून ओळखले जाते. दसनामी सांप्रदायांचे नागा मुख्यत्त्वें हरिद्वार, उज्जैन, आणि अलाहाबादला तयार होतात. यारितीनें संस्कार झालेल्या साधूंना दिगंबर अवस्थेत रहावे लागते. अर्थात् यांत एक मर्यादा असते. जर साधुची इच्छा वस्तीत किंवा वस्तीच्या आसपास रहायची असली तर तो भगवी वस्त्रे धारण करू शकतो. नागा बनल्यावर कर्मकांड, भजन, तपस्येच्या प्रकारांत परिवर्तन होते. हठयोग यांत मुख्यत्त्वे असतो.

प्रयागभारतींनी (बालकनाथ) पुढे सांगितले, ''नागा बनल्यावर १२ वर्षे गुरूमहाराजांच्या सहवासांत राहिलो. त्यानंतर ४ वर्षे श्रीपंच जूना आखाड्यांत राहिलो. त्यामुळे जमातीचे नियम, रितीभातींविषयी खूप समजले साधुंची सहनशक्ती, शीलता, भजन, ध्यान, मर्यादा वगैरे कशाप्रकारची असते. त्यांत काय भिन्नता असते. काय ग्राह्य असते वगैरेविषयी सुक्ष्म माहिती मिळते. ज्यावेळेस माझें गुरु 'दत्तप्रकाश भारतीनी' नर्मदा किनारी 'अमरकंटक'मध्यें समाधी घेतली; त्यावेळेस त्यांनी आज्ञा केली की मी, पांचाल विस्तारांत मांडवच्या बीडमध्यें राहून तपस्या करावी. त्यामुळेंच मी गेली ८ वर्षे ह्या विस्तारांत रहात आहे.''

असा हा महान सिद्ध महात्मा आणि किती निर्दोष, निष्पाप बालकासारखें अस्तित्त्व! त्यांच्या सान्निध्यांत इतका संतोष वाटला कीं, तो शब्दांत वर्णन करता येणार नाही, याप्रमाणें त्यांची आत्मकथा ऐकल्यावर धार्मिक विषयावर थोडी औपचारीक चर्चा केली. संध्याकाळ होत आलेली असल्याने आम्ही त्यांची रजा मागितली; व परत भेटीची मागणी केली. त्यावर त्यांनी दर पौर्णिमेच्या नंतरचे ४ दिवस व दर अमावास्येनंतरचे ४ दिवस— या दिवशी कधीही भेटायला आलांत तरी चालेल असे सांगितले. इतर दिवशी मी माझ्या कार्यांत प्रवृत्त असल्यामुळे मी आपल्याला भेटूं

शकणार नाही. मी त्यांचे आभार मानून त्यांना म्हणालो, ''आपण जर या गुंडाळलेल्या सर्पाविषयी माहिती सांगू शकलांत तर बरे होईल, आपण ती पुढच्या भेटींत सांगाल का?'' त्यावर त्यांनी जरूर सांगेन म्हणून उत्तर दिले. माझ्या पाकीटांतील सर्वच गांजा, चरस त्यांना देत म्हणालो, ''माझ्यापेक्षा आपल्याजवळ या वस्तूंचा सदुपयोग चांगला होईल.'' त्यांनी स्मित करून सांगितले. ''संग्रहवृत्ती साधुंसाठी निषिद्ध आहे. यांची कांही जरूर नाही. नाहीतर प्रसिद्ध दृष्टांतकथा 'लंगोटी-लालसा' सारखी परिस्थिती निर्माण होईल.'' मी मनोमन विचारू लागलो. कुठे चिलीम ओढण्याची उत्सुकता व कुठे त्याच पदार्थासाठी स्वाभाविक अलिप्तता! मी व रामकुंभाईंनी परत येण्यासाठी महाराजांजवळ रजा मागितली. परत फिरतांना आम्ही नक्की केले की, दर बीजेच्या दिवशी याप्रमाणे तयारी करून घोड्यावरून न येतां पायी चालत यायचे. त्यानंतर माझ्या बीजेच्या दिवशी नियमित येण्याचा क्रम सुरू झाला. सुरूवातीला ३-४ वेळा रामकुंभाईंबरोबर आले नंतर ते स्वत:च्या व्यवहारामुळे येऊ न शकल्यामुळे मी एकटाच जाऊ लागलो असा आमचा गुप्त कार्यक्रम सुनिश्चितपणें चालला होता.

आमच्या तिसऱ्या मुलाखतींत त्यांनी सर्पाविषयी माहिती दिली, ''हा सर्प माझा परम मित्र आहे. गुरूमहाराजांच्या आदेशानुसार मी फिरत-फिरत येथें या गुहेजवळ आलो. ही रहाण्याची जागा पसंत आल्यानें मी झेंडा व धूनीं येथें स्थापित केली. धूनी पेटवल्यावर अजाण व अपरिचित जागी सुरूवातीच्या तीन रात्री जागरण करण्याचा नियम आहे; त्यानुसार मी स्मरण करीत होतो. तिथे हा सर्प ज्याला आपण सुंदर स्वरूपांत पहात आहांत, तो माझ्याबरोबर परिचय करून घेण्यासाठी महाकाय अजगराचे रूपांत आला. माझ्या आयुष्यांत प्रथमच मी इतका अक्राळविक्राळ अजगर पहात होतो. मी थोडासा अस्वस्थ झालो; परंतु अनुभव व गुरूस्मरणाने मी निर्णय घेतला कीं, हा सर्प कुणीतरी अलौकीक माया आहे.''

नागाजी (प्रयागभारती उर्फ बालकनाथ) जेव्हां सर्पाविषयी आम्हांला सांगू लागले, तेव्हां तो सर्प त्यांच्या मांडीवर जावून बसला. त्याने सहज स्मित करून त्यांचे बोलणे पुढे चालूं ठेवले; ''अजगर रूपांत येऊन भयंकर फुत्कार करून खोल विहिरींतून आवाज यावा त्याप्रमाणे मानवी भावानांने मला ही जागा सोडून जाण्यांस सांगू लागला. माझें अनुमान खरे होते. हा कुणीतरी देवकोटीचा आत्मा असावा. मी दृढपणें त्याला सांगितले, मी साधू असून, माझ्या संकल्पामुळें तुम्ही मला इथून हटवू शकत नाही. त्यावर तो म्हणाला, ''या गुहेंत मी वर्षापासून रहात आहे आणि या गुहेंत २ प्राणी कधीही एकत्र रहात नाहीत. या गुहेंत मी स्वतंत्र विहार करतो. तुमचे अस्तित्त्व मला बंधनरूप आहे. जर उद्यां सकाळपर्यंत तुम्ही ही गुहा सोडून गेला नाहीत तर तुमचा मृत्यू अटळ आहे.'' मी नम्रपणें त्याला म्हणालो, ''आपले म्हणणे बरोबर आहे परंतु मी आतां येथे धुनी स्थापन केली आहे, त्याचे उत्थापन १२ वर्षापर्यंत होणार नाही. तेव्हां ही गुहा आपले निवासस्थान आहे तेव्हां आपण राहूं शकता; मला त्यामुळें कांहीही त्रास नाही.'' मी आत्मीयता मिळवण्यासाठी त्याला सांगितले कीं, ''जंगलांत, पहाडांत, असलेल्या गुहेंत कुणी साधू रहातांत, किंवा सिंह, किंवा सर्प! त्यामुळें या गुहेंत रहाण्याचा मला अधिकार आहे.'' माझ्या बोलण्यानें तो जास्ताच चिडला. त्याचे वजनदार शरिर माझ्याकडें लांबविले. मीं सावधानतेंने, निडरपणें, त्याच्या गुरूवाणींत शेवटचे सांगितले, 'मैदानमें डट जाए सों गुरू का लाल, और भाग जाए सो बेकारका बाल.' असे म्हणून अघोरक्रियेचा नागपाशमंत्र फुंकला. त्याबरोबर अजगर मुर्च्छीत होऊन जमिनीवर पडला.''

''२-४ दिवस मुर्च्छीत अवस्थेंत पडून राहिल्यावर मी त्याची मुर्च्छीत अवस्था दूर केली. त्यानें भानावर येऊन स्वत:चे लहान रूप धारण केले. त्यानंतर आमची मैत्री झाली. आम्ही दोघे एकमेकांच्या खूप जवळ आलो. हा सर्प साधा नसून, खूप वर्षांचा जुना योगी आहे. या विस्तारात असलेल्या धनसंपत्तीचा ज्ञाता आहे. अनंतांतील अनेक गुढरहस्ये त्याच्या उदरांत साठवलेली आहेत. तो परम शिवभक्त आहे. त्यांच्या कंठांत त्रिपुंड आहे.

असे सांगून त्यांच्या मांडीवर बसलेल्या सर्पाच्या डोक्यावर बोट ठेवून त्याला बसायला सांगितले व फणा उघडायला सांगितले. सर्प हळू उठला व फणा उभारला, त्याच्या फण्यावर मध्यभागी चकचकीत पांढरे त्रिपुंड नैसर्गिकरितीने काढलेले स्पष्ट दिसत होते.

नागाजींनी सर्पाविषयी सांगितलेली गोष्ट माझ्या मनाला थोडी पटत नव्हती. ह्यामुळे मी विवेकपूर्वक नागाजींना म्हणालो, ''महाराज! शंका म्हणून नाही पण जिज्ञासा म्हणून कुतुहलवृत्तीच्या समाधानाकरितां विचारीत आहे की, हे कसे शक्य आहे की, सर्प माणसाच्या आवाजांत बोलणें, त्याचे रूप बदलणे?''

नागाजींनी माझ्या मनोभावाला तपासून पाहिले व माझ्याकडे वेधक दृष्टीनें पाहून, सहजस्मित करून सांगितले, ''संसारी महानुभावात किती नादानी असते. त्या विचाराने मला दया येते कीं, स्वत: परिक्षा करण्यासाठी आपण योग्य आहात का? स्वत:मध्ये खात्री करून घेण्याचे तुमचे सामर्थ्य आहे का? हे निर्णय घेतल्याशिवायच तुम्ही संसारी लोक स्वस्त भावानें सर्व जाणून घेण्याचा आग्रह करतां.'' नागाजींच्या या बोलण्यानें मी थोडा मौन राहिलो. थोड्यावेळाने नागाजी सर्पाला संबोधून म्हणाले, ''हे देवते! यांना कांहीतरी सांगा!'' त्याबरोबर सर्पाने आमच्याकडें ध्यान केंद्रीत केले व स्वत:चे तोंड उघडून 'शिवा-शिवा', 'शिवा-शिवा' असे म्हणून कांही संस्कृत आणि मागधी मिश्रीत भाषेंत एक वाक्य सांगितले जे आम्हांला बिल्कुल समजले नाही. चौदा-पंधरा वर्षांच्या किशोर युवकासारख्या आवाजांत सर्प बोलला. मी प्रश्नार्थक दृष्टीनें नागाजींकडे पाहिले. त्यावर ते म्हणाले कीं हा सर्प सांगतो कीं, प्रथम शिव-शिवाचे स्मरण करून योग्यता मिळवा.'' नंतर थोडावेळ वातावरण मुके झाले. शेवटी नागाजींनीच सांगितले कीं, ''आजची रात्र थांबा! रात्री सर्पाच्या विराट स्वरूपाचें दर्शन होईल.'' त्यांनी ही गोष्ट कटाक्षाने सांगितली. मी बोलण्याचें स्वरूप बदलण्यांकरितां प्रत्युत्तर केले,

''आपल्यासारख्या सिद्ध-संतांची अटळ माया असल्यावर ते पहाण्याची वा समजून घेण्याची आमची योग्यता नाही. आतां मी जे कांही समजत आहे, पहात आहे, आणि अनुभवीत आहे; ते सुद्धा आपल्या करूणामयी दृष्टीने. माझी तर फक्त इतकींच जिज्ञासा आहे कीं, सर्पाचे बोलणे, स्वरूप बदलणें या दोन्ही क्रिया कुठल्या कारणामुळे, कुठल्या योगामुळे, संभवित आहेत तो प्रश्न मला महत्त्वाचा आहे. माझे जरूर समाधान झाले कीं, दिव्य कोटीचे नागजातीचे सर्प मानवी आवाजात बोलतात, स्वरूप बदलतात, परंतु अधिक याविषयीं माहिती न मिळाल्यानें समाधान अर्धवट आहे.''

नागाजींनी मला अडवित सांगितले, ''पहा! एक गोष्ट लक्षात ठेवा; प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या बुद्धीची शक्तीमर्यादापर्यंत तर्क करू शकते. त्यापेक्षा जास्त तर्क करू शकत नाही. जेव्हां वास्तविकतेच्या पातळीवर यायला तुम्हांला विश्वासाचा आधार घ्यायला लागतो. मी जर ह्या रहस्याचा स्फोट केला तर त्याचे अर्थ तुम्ही तर्काच्या आधारे लावाल. ज्यांत तुम्हांला परिणाम शून्य मिळेल. परंतु या रहस्याला खरोखर जाणून घ्यावयाचे असेल, तर सर्पांनी सांगितल्याप्रमाणें 'शिव-शिवाचे' स्मरण सतत करा; आणि या रहस्याला जाणून घेण्याची प्रबल इच्छा प्रकट करा. बस्स्, हे रहस्य तुम्हांला आपोआप कळेल इतकेंच नव्हे तर इतरही रहस्ये या लोकांतील तसेंच परलोकांतील समजतील; आणि तुम्ही जे स्वत: समजू शकाल ते कुठल्याही ग्रंथांत किंवा पुस्तकांत लिहिलेले मिळणार नाही; तो तुमचा आगळा-वेगळा अनुभव असेल.''

आमची मुलाखत इथेंच संपली. त्यानंतरच्या मुलाखतींत परत सर्पाविषयी उल्लेख झाला. आज परत त्यांनी स्वत:च सर्पाविषयीं चर्चा सुरू केली. आज ते खूप आनंदात होते. ते म्हणाले, ''आज मी इतका खुश आहे की, माझ्याबरोबर रहाणाऱ्या सर्पाची शापमुक्तीची वेळ जवळ आली आहे. यासाठी मी थोड्या दिवसांनी उज्जैनला जाणार आहे. तेथून आदेश आला आहे. मी अष्टमीच्या दिवशी प्रयाण करीन.''

नागाजींना मी आज प्रथमच इतके आनंदी पहात होतो. ते म्हणाले, ''मी तुम्हांला आता दिड-दोन महिने भेटणार नाही. आज तुमच्या प्रश्नाचे उत्तर द्यायला मला आनंद होईल. खूप दिवसांपासून तुमची इच्छा या सर्पाच्या पूर्वभूमिका जाणून घेण्याची होती त्याचा थोडक्यांत उल्लेख करतो.''

''आजपासून चारशे वर्षांपूर्वी हा सर्प नर्मदा नदीच्या किनारी महात्मा रूपांत भजन करीत होता. सुर्पर्णाच्या दुर्गम झाडींत ते गुप्त राहून मस्तींत देवाचे नामस्मरण करायचे. त्यांना तंत्रक्रियेची आवड होती. वेळ मिळेल तसा ते तंत्रक्रियेचा अभ्यास करीत. एकदा त्यांच्या कुणी गुरूबंधुनी स्वत:चा देहांत (देहान्त) व्हायच्या आधी यांना कुठलेही रूप बदलण्याची क्रिया बहाल केली.

या सर्पमहात्म्यांचे नांव होते 'देवश्रीवन'. बननामा परिवाराचे असल्यामुळे ते जंगलांत रहाणे अधिक पसंत करीत. त्यांना स्वरूप बदलण्याची क्रिया सिद्ध झाल्यावर ते जंगलांत विहार करण्याआधी सर्पाचे, हरणाचे, वाघाचे, असे इच्छीत रूप घेऊन विहार करायचे. या स्वरूप बदलण्याचा आशय फक्त आदिवासी व भिल्ल लोकांना दूर ठेवण्याचा होता. भिल्ल लोक या विस्तारात येऊन साधू-महात्म्यांनापण लूटीत, त्यामुळे त्यांनी या विस्ताराला भयग्रस्त बनविले होते. एक दिवस ते सर्परूपात फिरता-फिरता एका सिद्धमहात्म्यांच्या गुहेंत गेले. ते महात्मा भृगु पर्वतावरील मार्कंडेय गुहेंत राहून भजन तपस्या करीत. नर्मदेच्या दक्षिण किनाऱ्यावरील भृगु पर्वतांवरील 'शूलपाणि' महादेवाच्या मंदिराच्या विस्तारांत राहून हे सिद्ध महात्मा भगवान मंजुघोषाची उपासना करीत. ती उपासना एकान्तात रात्रीच्यावेळी करीत. ही गोष्ट देवश्रीवनच्या लक्षात आली; त्यामुळें त्यांनी स्वत:चे निजरूप धारण करून त्या सिद्ध महात्म्यांना भगवान मंजुघोषांची क्रिया जाणून घेण्यासाठीची उत्सुकता दाखवली व तसा आग्रहही केला. त्यावर सिद्ध महात्म्यांनी सांगितले की, ''आतां माझ्या साधनेची वेळ झाली आहे; जोपर्यंत मी स्वत: हा मंत्र सिद्ध करू शकत नाही. तोपर्यंत मी तुम्हांला शिकवू शकत नाही. तुम्ही थोडावेळ धीर धरा. मंत्र पूरा झाल्यावर मी तुम्हाला जरूर मंत्रदीक्षा देईन.''

त्यावेळेस देवश्रीवन महात्मा निघून गेला; परन्तु तो रोज गुप्तपणें सर्पाच्या रूपांत रात्री हजर राहू लागला. ही गोष्ट सिद्ध महात्म्यांच्या लक्षांत आली; परंतु जोपर्यंत त्यांचा प्रयोग पूर्ण होत नाही. तोपर्यंत ते देवश्रीवनला काही हानी करू शकत नव्हते. त्यांनी मंत्र व क्रियेला गुप्त ठेवण्यासाठी एक मार्ग शोधला. रात्रीं ते उलटक्रिया करायचे आणि देवश्रीवन गेल्यावर सुलटक्रिया करीत. अशारितीनें त्यांनी भगवान मंजुघोषांची कृपा मिळवून सिद्धी प्राप्त करून घेतली.

ती रात्र देवश्रीवनसाठी वाईट रात्र होती. तो सर्पाच्या रूपांत नेहमीप्रमाणे तेथे पोहोचला. सिद्ध महात्म्यांनी रागावून देवश्रीवनला हजर रहाण्याचा आदेश दिला. तो घाबरला. त्याला समजेना, यांना कसे काय कळले? मी इथे येतो ते! परन्तु प्राणहानीच्या भयानें देवश्रीवन सिद्धमहात्मा मुळ स्वरूपांत हजर झाला. त्यावर ते म्हणाले, ''तुम्ही शास्त्र, धर्म आणि संन्यासाच्या दीक्षेच्या मर्यादेचे उल्लंघन केले आहे. तुम्हाला वचन दिल्यावरसुद्धा तुम्ही अविश्वासाने गुरूद्रोह केला आहे. त्यामुळे आजपासून तुम्ही मृत्यूपर्यंत सर्पदेह धारण करून रहाल. तुमची शक्ती मी क्षीण करतो.'' असे म्हणून त्यांनी धुनीमधील विभूती घेऊन देवश्रीवनवर फेंकली. त्यानंतर देवश्रीवनने प्राप्त केलेली विद्या क्षीण होऊन आजीवन सर्परूपांत रहाण्यासाठीं शापीत केले गेले. या प्रसंगानंतर देवश्रीवनला स्वत:ची चूक समजली. त्याच्याजवळ वाचा नव्हती, शक्ती नव्हती, त्यामुळें त्यानें सिद्ध महात्म्यांच्या पायाला विळखा घालून, क्षमायाचना केली. एक महिनापर्यंत उपाशी त्या गुहेंत पडून राहिला. सकाळ, दुपार, संध्याकाळ तिन्हीवेळां सिद्धमहात्म्यांच्या पायाला विळखा घालून वारंवार विनंती केली. शेवटी त्या सिद्ध महात्म्यांनाच दया आली. त्यांनी तीन गोष्टी सांगून, उद्धार करण्याचा मार्ग सांगितला. ते म्हणाले, ''तुम्ही मनुष्ययोनीचीं भाषा बोलू शकाल, तुमच्या स्वसंरक्षणासाठी तुम्ही सर्पाचे रूप पाहिजे तितके लहान मोठें करू शकाल. इथून जाऊन मांडव इथें देवाचें स्मरण करा.'' बस्स्, तेव्हांपासून सर्प महात्मा या मांडव विस्तारांत येऊन राहिला. माझ्या गुरूमहाराजांनी जेव्हा

अमरकंटकांत समाधी घेतली तेव्हां त्यांनी आदेश दिला होता की, १२ वर्षे मांडव येथे जाऊन तपस्या कर. त्यांची आज्ञा घेऊन मी इथें आलो, इथे आल्यावर सर्प-महात्म्यांचा परिचय झाला. नंतर भूतकाळातील गांठी जोडल्या गेल्या. गुरूमहाराजांची महती अगाध आहे. मला अज्ञानात ठेवून त्यांनी इथे पाठवले. तपस्येबरोबर या सर्प महात्म्यांचा उद्धार करण्याचें निमित्त मी आहे. हा सर्प महात्मा, माझ्या गुरूमहाराजांचा गुरूबंधु आहे. त्यामुळे या सर्पमहात्म्यांचे कष्टनिवारण करणे माझें कर्तव्य आहे. साडेतीनशें वर्षे तो माझी वाट पहात इथे तपस्या करीत आहे. मी कशासाठी त्यांच्या उद्धाराचा निमित्त बनलो ते ईश्वर जाणे. असेल कांही जन्मोजन्मींचे ऋणानुबंध!''

नागाजींनी सर्पमहात्म्यांविषयी केलेल्या उल्लेखामुळे मी, सिद्ध महात्मांच्या भव्यता, भविष्याच्या अनंतापार पहाण्याची क्षमता, अद्भूत मनोबलाविषयी विचार करू लागलो. माझे लहान क्षमताहीन डोकें भेदपूर्ण रहस्याच्या स्फोटामुळे निष्क्रीय झाले होते. त्यांनीं सांगितले, ''मी, उज्जैनहून जाऊन आल्यावर तुम्हाला कळवीन तेव्हा तुम्ही या.''

मी त्यावर बरे म्हणून उत्तर दिले व आता सर्पमहात्म्यांचे दर्शन होणार नाही; म्हणून त्यांना संबोधून म्हणालो, ''महात्मा! आपले चरित्र ऐकताना रोमांच उभे राहिले. माझ्या हातून काही चूक झाली असल्यास आपण क्षमा करावी. देवाच्या नामस्मरणांत माझे प्रेम वृढ व्हावे यासाठी मला आशीर्वाद द्या. मी आपणाला प्रणाम करतो.'' माझ्या प्रणामानंतर त्यांनीं फणा उघडून श्वेत चमकते त्रिपुंडाचे दर्शन दिले. मुक आशीर्वाद मिळाल्याचा आनंद झाला. मी नागाजींना म्हणालो, ''माझ्या योग्य कांही कार्य असल्यास सांगावे.'' त्यावर सर्पमहात्मा म्हणाले, ''काय! तुम्हाला तुमच्या कार्यक्षमतेच्या योग्यतेची पूर्ण खात्री आहे?''

मी दिड-दोन महिन्याची वेळ जाण्यासाठीं आतुरतेंने वाट पहात होतो. एक दिवस नागाजींकडून बातमी आली. बीजेच्या दिवशी नागाजींना भेटायला गेलो. ते थोडे कृश झालेले दिसत होते. माझे कुशल, इतर औपचारीक गोष्टी झाल्यावर, चिलीम ओढून, एक दम भरून, त्यांनीं सर्पमहात्म्यांविषयी सांगायला सुरूवात केली.

''सर्पमहात्म्यांच्या संपर्कात आल्यानंतर त्यांनी ४०० वर्षांच्या व्यथेची गोष्ट सांगितली. तसेंच माझ्याकडूनच मुक्ती होईल हे सिद्ध केले.

त्यामुळें मी माझें सिद्ध देव कपालीभैरवाचें आवाहन करून सर्पमहात्म्यांच्या मुक्तीचा मार्ग विचारला, त्यावर कपालीभैरवांनी सांगितले, ''ज्या मंत्रांनीं मंजुघोष महात्म्यांनी या सर्पमहात्म्यांना शापीत केले त्याच मंत्रानें त्यांचा उद्धार होईल.'' या मंत्राची दीक्षा तुम्हाला उज्जैनला जाऊन घ्यावी लागेल. ते महात्मा उज्जैनला उजव्या दिशेला एका जीर्ण वेधशाळेंत गुप्तरूपांने रहात आहेत. ही वेधशाळा क्षिप्रा नदीच्या काठी मोडकळीस आलेली आहे. ती 'मंत्रमहाल' नांवाने ओळखली जाते.

कपालीभैरवाच्या मार्गदर्शनावरून मी खूप अगोदर सर्पमहात्म्यांना घेऊन गेलो. ते सिद्ध महात्मा 'हरसिद्ध' मातेचे परम उपासक होते. ते वेधशाळेच्या मोडलेल्या भूगर्भांत गुप्तरूपांत राहून भजन करायचे. मी तिथें गुहेच्या द्वारापाशी जाऊन त्यांची प्रतिक्षा करू लागलो. मला माहित होते की, महाराज सकाळीं ब्राह्ममुहूर्तावर क्षिप्रा नदीत आंघोळ करण्यास जातात. ती वेधशाळा मायावी आहे. रात्री वेगवेगळें मायावी प्रकार अनुभवित होतो. सकाळी ४ वाजतां जेव्हा महात्मा भूगर्भद्वारांतून बाहेर आले; तेव्हा मला पाहून म्हणाले, ''या! प्रयागभारतीजी, देवश्रीवनला बरोबर घेऊन आलात! थोडी विश्रांती घ्या! मी स्नान-पूजा करून येतो.'' एका तासाने ते आले. आल्यावर त्यांनी मला भूगर्भांत त्यांच्या निवासस्थानी नेले. गेल्या, गेल्या कामाची गोष्ट सुरू केली. ''तुम्ही इथे चतुर्दशीच्या रात्रीपर्यंत रहा. दर चतुर्दशीला शिवरात्र असते. त्या रात्री तुम्हाला मंजुघोष भगवानाच्या मंत्राची दीक्षा देईन. त्याला सिद्ध करून परत इथे या. तुमचे कार्य पूर्ण होईल.'' मी चतुर्दशीपर्यंत राहिलो. त्यावेळांत खूप जुन्या महात्म्यांचा परिचय झाला. तसेंच जुन्या विद्येविषयी माहिती मिळाली. चतुर्दशीच्या रात्री, सिद्धमहात्म्यांनी विधीपूर्वक भगवान मंजुघोषांचा मंत्र दिला. तसेंच त्याला सिद्ध करण्याची पद्धतीपण व्यवस्थित सांगितली. मंत्रदिक्षा घेऊन मी मांडव इथें परत आलो. एक वर्षभर मी मंजुघोष मंत्राची उपासना केली. मी नागाजींना विनंती केली की, मी मंजुघोष भगवानांविषयी कधीही ऐकले नाही. त्याविषयी जर उचित असेल तर मला सांगाल कां? त्यामुळे नागाजींनी मूळ गोष्ट बाजुला ठेवून मला मंजुघोष मंत्राविषयी माहिती दिली; ते म्हणाले, ''मंजुघोष भगवान हे शिवाचे रूप आहे, शिवाय भैरवाचे रूप मानले जाते. या मंत्राचा ६ करोड जप करावा लागतो. तो सिद्ध झाल्यावर अद्भुत अनुभव येतात. साधकाची बुद्धी तीक्ष्ण व असाधारण बनून सर्व कार्य सहजरितीने करण्याची क्षमता मिळते. अनेक जन्मांच्या कर्मबंधनांतून मुक्ती मिळते. कुठल्याही दोषाचे, पापाचे निवारण केले जाते.''

नागाजी परत मुळ गोष्टीवर आले. ''मी गोमुंड आणून त्यावर ह्या मंत्राची विधीपूर्वक स्थापना करून त्यावर वेदीची रचना केली. एका वर्षात ६ करोड मंत्रजप करून मंत्र सिद्ध केला.''

या मंजुघोष मंत्राची उपासना अशुद्ध राहून करण्यात येते. मळलेले कपडे घालायचे, दांत साफ करायचे नाही, एकाच भांड्यांत जेवायचे, त्याच भांड्याचा उपयोग शौचकर्मासाठी करायचा. गोमूत्र तसेंच चिताभस्माचे लेपन शरीरावर करायचे.

मंजुघोष देवाचे स्वरूप असे असते; ''ज्याचे शरीर शुभ्र आहे. एका हातांत खड्ग आणि दुसऱ्या हातांत ग्रंथ आहे. शांत गंभीर मुद्रेसहीत प्रसन्न चेहरा आहे. सर्व प्रकारच्या दोषांचे तात्कालीक निवारण करण्याची क्षमता त्यांच्या कृपेत समाविष्ट आहे.''

नागाजी प्रत्येक प्रसंगातून, सारतत्त्व, मंत्रमर्यादांच्या कारणांमुळें उघडपणें सांगत नव्हते. ते जेव्हां बोलता बोलता विचारमग्न व्हायचे; तेव्हां मी समजत होतो की ते काही रहस्य पडद्यामागें ठेवीत आहेत.

नागाजी पुढे म्हणाले, ''जेव्हा मंजुघोषाची साधना पूर्ण झाली तेव्हां मी कर्णपिशाचीनीद्वारां त्या सिद्धमहात्म्यांना

निरोप पाठवलां की, माझे कार्य पूर्ण झाले आहे; आतां आगामी कार्यक्रम कधी करायचा? त्यांनी निरोप पाठवलां, सर्पमहात्म्यांना घेवून या. गेल्या दिड महिन्यांपूर्वी तुम्ही भेटल्यावर त्यानंतर मी उज्जैनला गेलो. तेथे गेल्यावर, त्या सिद्ध महात्मा कुंदनपर्वतजींना त्यांच्या भूगर्भवासांत भेटलो (त्या महात्म्यांचे नांव कुंदनपर्वत होते; ते दसनामी सांप्रदायाचें पर्वतनामा साधू होते.) पौर्णिमेच्या रात्री. सिद्धवडाखाली सर्पमहात्म्यांच्या मुक्तीचे आयोजन तयार केले. दिवस जवळ येत होता. कुंदनपर्वतजी मंजुघोषाचे सिद्ध उपासक होते; तसेच हरसिद्धमातेची त्यांच्यावर असीम कृपा होती; त्यामुळे मी निश्चिंत होतो. पौर्णिमेच्या आधी चतुर्दशीच्या रात्री, कुंदनपर्वतजींनी, काळभैरवाच्या देवळांत जाऊन, त्याची नैवेद्याने, स्तुतीनें पूजा करून उद्यांसाठी कार्य सफल होण्यासाठी रक्षा करण्याची विनंती करा, व सिद्धवडाची पूजा करून या. असे सांगितले.

(कालभैरवाचे देऊळ उज्जैनपासून २-३ मैलांवर क्षिप्रा नदीकांठी भैरवगड नांवाचे गांव आहे तेथे टेकडीवर आहे. तेथें नागबली तसेंच नारायणबली करण्यांत येतो.)

मी रात्री पुजेचे साहित्य घेऊन काळभैरवाच्या देवळांत गेलो. माझे सिद्धदेव चंडभैरव तसेंच कपालीभैरवांना आवाहन केले. ते प्रकट झाल्यावर त्यांची नैवेद्य, बलीनें पूजा करून त्यांना दुसऱ्या दिवशीं कार्य निर्विघ्नपणे पार पाडण्याची विनंती केली; त्यांनी अभयवरदान दिले. त्यानंतर काळभैरवाची पूजा करून मद्य देऊन प्रसन्न केले. खोपडीतून दिलेले मद्य ते प्याले. (काळभैरवाच्या मूर्तीला सिद्धलोक खोपडींतून मद्य देतात. काळभैरव मूर्तीरूपांत मद्यपान करून संतुष्ट होतात.) तेथून सिद्धवडाची पूजा करून मी यंत्रमहालात आलो. कुंदनपर्वतजींना सर्व हकीकत सांगून पौर्णिमेच्या पूजेची तयारी करू लागलो. सकाळी नित्यकर्म आटोपून संबंध दिवस मंजुघोष मंत्राचे नामस्मरण केले.

मध्यारात्री मी , कुंदनपर्वतजी व सर्पमहात्मा सिद्धवडाकडे रवाना झालो. तिथे गोमुंडाला मंत्रून वेदी (कुंड) बनवून त्यावर (गोमुंडावर) स्थापन केली गेली. सर्पमहात्म्यांना गो-मुंडावर बसण्यास सांगितले.

सर्पमहात्मा आतां मला कायमचे सोडून जाणार होते. माझ्या शरीरावरची पकड मजबूत करून स्नेह दाखवित म्हणाले, ''प्रयागभारती! आज मी कायमचा शिवलोकांत जाणार आहे. तुम्ही केलेल्या कार्याच्या उपकाराबद्दल मी कधीहीं आपल्याला विसरणार नाही.'' सर्पमहात्म्यांचा कंठ भरून आला. ४०० वर्षांची यातनामुक्ती आणि माझ्यापासून दूर जाण्याची वेदना, त्यांच्यासारख्या ज्ञानी आणि निर्लेप प्रकृतिचे संत पण गद्‌गदीत होतात. ते पुढे म्हणाले, ''जातां जातां रूप बदलण्याची क्रिया तुम्हांला मी सांगून जातो. जीवनांत कधीतरी त्याचा उपयोग होईल. माझ्यासारखा दुरूपयोग करू नका.''

नागाजी म्हणाले, ''तुमच्या मुक्तीचा आनंद अलौकीक आहे. मी भजनानंदी आहे. मला या विद्येचा काय उपयोग?''

शेवटी त्यांनी त्यांची आठवण म्हणून मला ती विद्या सांगितली आणि मी त्यांच्या समाधानाकरिता ती ग्रहण केली.

सर्प महात्मा गो-मुंडावर जावून बसले. मी चंडभैरव व कपालीभैरवांना आवाहन करून दिशाबंधन केले. फक्त आकाशदिशा मुक्त ठेवून क्रिया सुरु केली. मी मंत्रोच्चाराची गती एका लयीत ठेवली. आकाशमार्गे एक तेजस्वी किरण बनला. त्यामुळे चौफेर प्रकाश पसरला. मंत्र फुंकून, गोमुत्राचे अर्ध्य दिल्यावर, वीजेसारखा, प्रकाशाचा किरण गो-मुंडावर उतरला. एक जबरदस्त वायुमंडल भोंवऱ्यासारखे निर्माण झाले. सर्पमहात्म्यांनी उंच होऊन फणा उभारला. त्यांचे त्रिपुंड चमकते दिसू लागले व दुसऱ्याचक्षणीं एक मानवाकृती तेज:पुंज बनून त्या भोंवऱ्याबरोबर आकाशमार्गे निघून गेली.

गोमुंडावर मंत्रून लिहिलेला मंत्र अदृश्य झाला. वातावरणांत स्तब्धता पसरली. सर्पमहात्म्यांच्या जाण्यानें मी थोडा उदास झालो. कुंदनपर्वतजींनी उत्थापन क्रिया केली. आम्ही दोघे प्रभातसमयी, मंत्रमहालीं आलो. २-३ दिवस तेथें राहून, कुंदनपर्वतजींचे खूप आभार मानून, त्यांचा आशीर्वाद घेऊन मांडव येथे परत आलो.

नागाजींनी सांगितलेली रोमांचकारक हकीकत ऐकून मी शून्यममनस्क झालो होतो. माझ्या डोळ्यासमोर ते दृश्य घडते आहे असे वाटू लागले. नागाजींबद्दल प्रेम आणि आदरभाव, त्यांच्या उदारता, स्पष्टवक्तेपणा, करूणा तसेंच सामर्थ्यामुळें अधिकाधिक वाढला.

भारताच्या तपोभूमींत किती विरळ सिद्ध-संत आहेत. किती अफाट सामर्थ्यशक्ती त्यांच्यात असूनसुद्धां किती सरळ, नि:स्वार्थी जीवन; कितीतरी अमोघ शक्तींचा संचय तरीपण किती निराभिमानी व्यक्तीत्व आहेत!

## अघोर कल्प

**त्या**नंतरच्या २-३ मुलाखतीं साधारण होत्या. एकदां एका मुलाखतीत मी त्यांना अघोरदिक्षेसंबंधी माहिती मिळवण्यासाठी प्रश्न विचारला;

''नागाजी! अघोर क्रियेची दीक्षा कशी घेण्यात येते, ते सांगाल का?'' आज ते थट्टेच्या मुडमध्यें होते. ते म्हणाले, ''या उदासजींना विचारा, ते पण अघोरदीक्षा देण्याचा आग्रह करीत आहेत. काय! तुमची पण इच्छा अघोरी बनण्याची आहे?'' असे म्हणून त्यांनी मूळ गोष्टीकडे दुर्लक्ष केले. मी परत दुसऱ्या तऱ्हेने त्यांना प्रश्न विचारला, ''महाराज! अघोरी लोक स्मशानांत रहाणे का पसंत करतात? त्यावर ते माझ्याकडे गंभीरतेने पहात म्हणाले, ''तुम्हांला खूप आतुरता आहे म्हणून अघोरक्रियेच्या मुख्य गोष्टी ऐकून घ्या.'' या अघोरपंथाचे गुढ रहस्य त्याचे अनुयायी समजु शकतील.'' ते पुढे म्हणाले.

''खप्परमें खावे, और मसानमें लेटे, उसके बचन को ब्रह्मा न मेटे'' अघोरी विद्येचे प्रणेता शंकर भगवान आहेत. पार्वती मातेला संबोधून या विद्येचा उल्लेख केला गेला आहे. या अघोरींमध्ये पण मुख्य दोन प्रकार आहेत. ज्यांत एक शिवाला इष्ट मानतात, तर दुसरे पार्वतीला इष्टदेवी मानतात. त्या दोन्ही प्रकारांत पोटप्रकार आहेत. अघोरी दीक्षेच्या भिन्न भिन्न रिती आहेत. ज्यावेळेस साधक गुरूजवळ दीक्षा

ग्रहण करतो तेव्हा गुरू स्वत:जवळ असलेली, विशिष्ट पद्धतीनें सिद्ध केलेली मानवी कवटी, त्यांत मद्य, चिताभस्म, स्वत: ज्या प्रणालिकेचा आहे किंवा ज्या देवीदेवतांचा उपासक आहे त्यांचा उच्छीष्ट प्रसाद, गुरूचे रक्तबिन्दू– या सर्व वस्तू, ज्यांत स्वत:चे आगळे महत्त्व असते. (मद्य तात्त्वीक क्रियेपासून बनवलेले असते. चिताभस्मसुद्धां ठराविक दिवशी, ठराविक जाती, ठराविक वेळेला घेण्यांत येते.) एकत्र करून मानवाच्या कवटींत ठेवले जाते. त्याला 'अघोर प्याला' म्हटले जाते. असे प्याले व त्यांतील पदार्थ अघोरी, औघड, कापालीक, बीजमार्ग, वाममार्ग तसेंच शाक्त पंथ ह्यांचे वेगवेगळे प्याले असतात.

हा प्याला साधकाने ठरविलेल्या दिवशी, बरोबर मध्यान्ही, दिगंबर अवस्थेंत राहून प्यायचा असतो. तो प्याल्यावर गुरू त्याच्या डोक्याच्या मागच्या बाजुला पंजाने जोराने एक बुक्का मारतो. हा पंजा मारण्याचे एक महत्त्व असते. ह्या पंजा मारतांक्षणीच साधकांमध्ये २ परिवर्तनें होतात.

१. मलमुत्र, सडलेले, गळून गेलेले, घाण वास असलेले मांस, शव इत्यादी किळस येतील अशा पदार्थांची किळस येत नाही; आणि एकदम सहज भावानें त्या पदार्थाच्या सहवासांत साधक राहू शकतो.

२. गुरूच्या रक्तबिंदू तसेंच देवी-देवांच्या उष्ट्या प्रसादामुळें त्याचे मानसिक व शारिरिक परिवर्तन होते. शरिराचा कुठलाही भाग कापायचा असेल, स्वत:ला किंवा दुसऱ्याला कुठलीही इजा करावयाची असेल तर मानसिक आणि शारिरिक कठोरपणा स्थिर होतो. दीक्षा ग्रहण करतांक्षणी हे परिवर्तन होते; नंतर गुरू त्याला नियम, क्रियाकांडाची शिकवण देतात. सुरूवातीच्या नियमाप्रमाणें अघोरक्रियेच्या साधकाला एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंत फक्त ५ शेर पाणी वापरता येते. दुपारी १२ ते २ पर्यंत कवटींत मलमुत्र एकत्र करून त्याचा शरिरावर मंत्रोच्चारांने लेप करण्यांत येतो. जेव्हा तो सुकतो तेव्हा मळ काढावा, त्याप्रमाणें शरिरांवरून काढून तंबाखुबरोबर मिसळवून त्याची चिलीम ओढायची असते. यामुळें बाह्य-आंतरीक परिवर्तन करण्यांत येते. अघोरीच्या गंतव्यानुसार साधक प्रत्येक नकोशा घृणास्पद वस्तूंतून सारतत्त्व मिळविण्याची आगळी पद्धत स्थापन करतात. त्यांचे म्हणणें असें की, 'ईश्वर सर्वव्यापी आहे मग या सर्व वस्तूंत कां नाहीं; आणि या पदार्थांचा सहवास साधकाला खूपच त्वरेंने बहिर्मुखीतून अंतर्मुखी बनवितो. क्षोभ, मनोमंथनापासून होणाऱ्या अडचणीं तसेंच इंद्रियज्ञानाला जागृत अवस्थेंतून अलिप्त अवस्थेंत बदलवूं शकते. साधकाच्या प्रकृतींतून 'भय' नांवाचा शब्द लुप्त होतो. मृत्यूपण त्यांच्या साठी एक महत्त्वपूर्ण अवसर गणला जातो. मृत्यू शब्दाचा अर्थ अघोरी भाषेंत खूप सहज व सरळ आहे. मृत्यूला ते स्वत:च्या क्रियेंचे महत्त्वपूर्ण अंग बनवून, त्याचा उपयोग करतात. साधक दुपारी 'अजरी बजरी' क्रिया करून स्थिर मुद्रा बांधतात. स्थिर मुद्रा म्हणजे त्राटकक्रिया. रात्री १२ ते सकाळी ४ पर्यंत अघोरामंत्राचे स्मरण केले जाते. याप्रमाणें अभ्यास केल्यावर जवळजवळ ६ ते १२ महिन्यानंतर मानसिक दृढता आणि शारीरिक कष्ट सहन करण्याची कठोरतां सिद्ध केली जाते. त्यानंतर स्वत:चा स्वभाव, संकल्प, मर्यादा, रूचकर साधनक्रियेवर विचार करून, कुठल्या दिशेला जावे याचा निर्णय घेतला जातो. ज्यांत वीरसाधन, वामदेवकल्प, अघोरकल्प, मुंडसाधन, संजीवनीविद्या, संद्योजातकल्प, राक्षसपूजा, शवसाधन, स्मशानसाधन, घोरेश्वरीसाधन, कुशंडिकाविधान, चरूकर्म, पार्ण व प्रेतसाधन या सर्व अघोरक्रियेच्या साधना आहेत.

त्यांतून साधक स्वत:च्या आवडीप्रमाणें किंवा गुरूच्या आज्ञेप्रमाणे साधना सुरू करतो. त्यात प्रत्येकाच्या वेगवेगळ्या क्रिया साधनभोग, नैवेद्य, मंत्र वगैरे असतात. याचे साधक जंगलांत, पहाडात, गुहेत किंवा स्मशानात राहून साधना करतात. मोठ्या प्रमाणांत ते अशिक्षित-अक्षरज्ञानापासून वंचित असतात. अर्थात् कांही अघोरी महात्मा राजनीतीज्ञ, रससिद्ध आणि दुनियेतल्या अनेक भाषा जाणणारे असतात. वैरभाव, अज्ञानपणा, दांभिकपणाचें पोषण करण्याच्या हेतूनें कधी नि:सहायपणे अघोर सांप्रदायाचे रहस्य जाणण्याच्या हेतूनें, महानसिद्ध बनण्याच्या महत्त्वाकांक्षेने अघोरी बनतात. सुरूवातीला ते संपूर्ण अज्ञांकीत अवस्थेंत राहून गुरू-आज्ञेचे पालन करून साधना करतात. जेव्हा थोडी सिद्धी पहायला – समजायला मिळाली कीं ते सिद्ध झाल्याचें समजून गुरूमर्यादेला सोडून स्वच्छंदी बनून स्वैच्छीक विहार करायला सुरूवात करतात. कुणी साधक खूप धीरानें वागतात. तेव्हा ते दुसऱ्या वा तिसऱ्या साधनक्षेत्राला सिद्ध करून स्वच्छंदी बनतात. अपरिपक्व साधु, साधक=सांप्रदाय, साधनास्थळ सर्वच दोषयुक्त बनून कुख्यात होतात. साधक संपूर्णरितीने अघोरक्रियेच्या नियमांचे तसेच गुरूच्या आज्ञेचे पालन केल्यावर महान सिद्धीला घेऊन हंसगतीनें विहार करायला लागतो. जेव्हा साधक गुरूसेवा आणि गुरूआज्ञेचे दृढपालन करतो तेव्हा त्याला स्वत:ला आपोआप सत्य मार्गदर्शन मिळते; व तो साधक स्वत:चे ध्येय नक्की करतो. जसजसा साधक प्रगति मिळवतो तेव्हा त्याच्या ध्येयाचा लक्ष्यांक बदलत जातो आणि एक दिवस आपोआप ध्यानीमनीं नसतां लक्ष समोर येऊन उभे राहते. ज्याचीं कांही कल्पना नसतें पण अनुभूती मिळते. ती अवर्णनीय अकथ्य असते.

नागाजींकडून अघोरीक्रियेविषयी गुप्त तसेच उघड चर्चा झाल्या. या सर्व मुलाखतीमुळें आमच्यात आत्मीयता वाढत गेली. त्यांच्याकडून साधूंविषयी – साधूसमाजाविषयी खूप माहिती मिळाली. कारण ते साधू होते तसेंच बुद्धिमान होते. आद्यगुरू शंकराचार्यांनी दशनामी सांप्रदायाचे शासन स्थापित केले त्यावेळी त्याची रचना-व्यवस्था खूपच सुंदर आणि सुदृढ रितीने रचली. ती आजही कुठेकुठे सक्रिय तर कुठे शिथील अवस्थेत अनुभवास येते.

जेव्हा आद्यगुरू शंकराचार्यांनी सनातन धर्माची चारहीं दिशेला ध्वजा फडकावून दिग्विजय प्राप्त केला, तेव्हा सनातन धर्माची संस्कृती नष्ट होऊन गेली होती. त्यामुळे त्यांनी धर्मध्वज, आश्रयाने सुदृढ शासनाची नवरचना केली. या रचनेचे संचालन कुंभमेळ्यात व्हायचे, चार शंकराचार्यजी, त्यांच्या सात आखाड्यांपैकी श्रीमहाराजांच्या संपर्कात असायचे. एका

आखाड्याची प्रत्येकी चार श्रीमहाराजांची नेमणूक निवडणूक पद्धतीनें करण्यांत यायची. आजही ही परंपरा चालत आहे. निवडून आलेल्या श्रीमहाराजांची कामगिरी एका कुंभमेळ्यांहून दुसऱ्या कुंभमेळ्यांत जाण्यासाठीं दत्तदरबार, तसेंच त्यांचा रथ, हत्ती, घोडा, पालखी, स्वरखंडा, खजिना, लष्कर, तसेंच वहिवाटीची साधनें पोहोचविण्याची असते. ते तीन वर्षेपर्यंत श्रीमहाराजांची पदवी भोगतात. ही कामगिरी बजावण्यासाठी ते स्वत:च्याबरोबर जरूरीपुरतें नागाजी ठेवतात.

नागासाधू म्हणजे फौज. ही रचना अशासाठी करण्यात आली की, त्याकाळी कांही राजे सनातन धर्माचा स्वीकार करीत नव्हते, आणि नागाच्या जमातीच्या आश्रयाची जबाबदारीपण घेत नसत. त्यामुळे त्यांच्याबरोबर युद्ध करून त्यांचा पराजय करून सनातन धर्माचे शासन स्विकारण्याचीं जबाबदारी त्यांना देण्यांत यायची. ही प्रथा या रितीनें रहायची की नागाची जमात कुठल्याही राज्य-आश्रयाच्या हेतूमुळें स्वत:चे लष्कर, तंबू, हत्ती, घोडा, नागाफौज घेऊन राज्याच्या हद्दीबाहेर राहून ध्वजा, निशाण, स्थापन करून डेरा-तंबू घालून राहायचे. त्यानंतर जमातीतील कांही साधू भिक्षा मागण्यासाठी (माधुकरी मागण्यासाठी) वस्तीत जायचे आणि राज्य-व्यवस्था तसेंच राजाची धार्मिक वृत्ती जाणून घ्यायचे. जर राजा सनातन धर्माचे पालन करीत असला तर जमातीचा महंत स्वत:च्या तंबूत बोलावण्यासाठीं विधीपूर्वक आमंत्रण पाठवायचे. ठरवून ठेवलेल्या काळापर्यंत रहाण्यासाठी जागा, भोजन, सामुग्रीची व्यवस्था, पूजेसाठीं खर्च-व्यवस्था तसेंच इतर जरूरीच्या वस्तूंची मागणी करून राजाच्या आश्रयाला रहायचे. ज्यांत जमातीचे ठराविक सिद्धांत असायचे. पैकी रोजची अन्न-सामुग्री रोज राज्य-भंडारांतून आणणे. एकदम संग्रह करायचा नाही. राज्य-व्यवस्थेंत दखल द्यायची नाही. प्रजेला सद्‌विचार देऊन शारीरिक तसेच आर्थिकरीतीनें समृद्ध होण्याचें मार्गदर्शन करायचे. प्रजेला कुठल्याही प्रकारें चुकीच्या मार्गानें नेऊ नये. कुणीही साधूनें सूर्यास्तानंतर वस्तीत जावूं नये. तसेंच कुठल्याहीं संसारी पुरुष, स्त्रीला आखाड्याच्या विस्तारांत रात्री आश्रय देऊं नये. आर्थिक देवाणघेवाण प्रजेबरोबर करण्यांत येत नाही. अशा अनेक नियमानुसार जमात राजाच्या आश्रयाला रहात.

त्यावेळी बौद्ध धर्माचा प्रसार झाला होता. कांही राजे दुसऱ्याला दाखविण्यासाठी, कांही राजे खंडणी भरीत असत. त्यामुळे, दबाव, व जबरदस्तीमुळें तर कांही राजांनी आधुनिक परिवर्तनाचा देखावा करण्यासाठीं बौद्ध धर्म स्विकारला होता. कांही शक्ती-उपासक होते; त्यामुळें युद्ध करून सनातन धर्माचे पालन करण्यास भाग पाडीत. हा क्रम हळूहळू मोंगल युगांत पण चालला. इंग्रजांच्या काळांतसुद्धा हा क्रम होता. या धर्मयुद्धाचे खूप प्रसंग, उत्तरभारत, मध्यप्रदेश, राजस्थान, क्रच्छ, गुजरात, सौराष्ट्र, बंगाल, महाराष्ट्रात घडलेलें इतिहासात दिसून येतात. दक्षिण भारतात दसनामी सांप्रदाय अल्प प्रमाणांत आहे.

नागा जमातीचें गुप्त साधूंकडून जेव्हा समजायचे की, राजा सनातन धर्माचा पूजक नाही त्यावेळेस एका मोठ्या थाळींत किनखापाचें कपडे झांकून २ गोळ्या पाठविण्यांत यायच्या. जमातीचा कोतवाल बरोबर ४ नागा व ही थाळी घेऊन राजाच्या कचेरींत हजर व्हायचे. ती सुवर्णथाळीं देऊन स्वत:च्या मागण्या, आश्रय या बाबींविषयी मागणी करायचे. सुवर्णथाळी राजासमोर नेऊन त्यावरील कापड बाजूला सारून कोतवाल राजाला संदेश द्यायचा. जर आपल्याला सनातन धर्माचा स्वीकार असेल तर एक गोळीपैकी भस्माची गोळी घ्या; नाहीतर दुसरी गोळी दारूगोळ्याची आहे– त्याचा स्वीकार करा; व युद्धाला तयार व्हा.

त्यानंतर राजा स्वत:च्या इच्छेनुसार किंवा मंत्राद्वारा त्याचवेळेस किंवा तीन दिवसानंतर स्वत:चा निर्णय सांगायचा.

कुणी राजा सनातन धर्माचा अस्वीकार करून युद्ध करायचा. युद्धांत जर नागा फौजेचा पराभव झाला तर युद्धाची जबाबदारी दुसरी जमात घ्यायची. ठराविक रक्कम आखाड्याला दिली जाते; नंतर अनुक्रमें आखाड्याचें चार श्रीमहाराज, श्रीमहंत, चार आखाडे यांना ठराविक रक्कम देण्यांत येते. आजही ही प्रथा अंमलांत आहे. मोहरछाप धारण केलेल्या महंत आखाड्याला रु. ७५०/- चार श्रीमहाराजांना रु. २५/- प्रत्येकीं तसेंच इतर श्रीमहंतांना रु. ५/- प्रत्येकीं देण्यांत येते. ही रक्कम दर तीन वर्षानंतर कुंभमेळ्यांतील आखाड्यांना भेट-पूजा म्हणून महंतांना द्यावी लागते.

साधूंची धर्मशासन-व्यवस्था याप्रमाणें चढत्या श्रेणीत अनुक्रमे असते. (१) महापुरूष, (२) नागा, (३) महंत, (४) श्रीमहंत, (५) श्रीमहाराज, (६) आचार्य, (७) मंडलेश्वर, (८) महामंडलेश्वर, (९) जगद्‌गुरू शंकराचार्य अशाप्रमाणें रचना असते. ज्यांत उतरत्या क्रमानें प्रत्येक साधू ठराविक वेगवेगळ्या प्रकारची सत्ता भोगत असतात.

सध्या आपल्या देशात दसनामी सांप्रदाय म्हणजे शंभूदली, तसेंच त्यागीं, महात्मानी निर्वाण, निर्मोही म्हणजे रामदली असें मिळून सुमारे ७ करोड साधू आहेत, ज्यांत गुप्त साधूंचा समावेश नाही.

कुंभमेळ्यात एका आखाड्याचा एकवेळच्या जेवणाच्या पंगतीचा खर्च अंदाजे दिड लाख रूपये इतका असतो. त्याची व्यवस्था आखाड्यामार्फत केली जाते.

जमातीची रचना, व स्थापना कुंभमेळ्यांत करण्यात येते. कमीत कमी १२ साधूंच्या समुहाला जमातीच्या नावाने ओळखले जाते. ज्यात एक मुख्य महंत, त्याचे ३ उपमहंत, पुजारी, कोठारी, भंडारी, छोटीया, छडीदार, कोतवाल आणि २ नागा अशा प्रकारच्या रचनेला जमात म्हटलें जाते. जेव्हां ही जमात कुंभमेळ्याहून परत रवाना होते. त्यावेळेस त्यांना एका साधुशाही प्रथेनुसार सही शिक्का करून प्रमाणपत्र देण्यांत येते. जे प्रमाणपत्र साधू 'मोहरछाप' या नावाने ओळखतात. या जमामीत नंतर कितीही साधू बरोबर फिरत असले तरी त्यांची संख्यामर्यादा नाही. परंतु जमात शब्द १२ साधुंच्या समुहाचें सूचन करतो.

या जमातीची कामगिरी अशाप्रकारची असते की, सबंध भारतात परिभ्रमण करणे, ठिकठिकाणी सनालन धर्माचा प्रचार करणे,

मंदिर, विहीर, तलाव, मोठ्या विहिरी (पायऱ्यांच्या) वगैरे बांधणे. सनातन अनुयायी स्थापन करणे. जुन्या मंदिराचा जीर्णोद्धार करणे. राजा तसेंच प्रजेला योग्य मार्गदर्शन करणे; त्यांच्यासाठी खूप कांही करायचे. अधर्माचा नाश करायचा. जेव्हा कधी ३ वर्षांनी कुंभमेळां भरतो तेव्हाही भ्रमणदरम्यान मिळालेली भेंटसामुग्री आखाड्याकडें सुपुर्द करण्यांत येते. तसेंच या जमातीत 'गालीचा अंथरण्याची' पद्धती असते. त्यावेळी दोन्ही पक्षांच्या हजेरीत न्याय देण्यांत येतो. दंड देण्याची पण व्यवस्था असते. तो दंड पैशापासून शिक्षेपर्यंत असतो.

जुन्या काळात साधुसमाजापैकी दोन्ही, शंभूदली, रामदली स्वत:चे चलन स्वत:च्या समाजात वापरीत. जे कांशाचे, चांदीचे, सोन्याचें असायचे. ते चलन फक्त साधुसमाजापुरतेच मर्यादीत असायचे. मुख्य टांकसाळ २ ठिकाणीं असायची. शंभूदली – काशीत आणि रामदली अयोध्येंत. याप्रमाणें मुख्य बाबींचे वर्णन केलेले आहे.

नागाजींबरोबर जसजसा परिचय वाढला तसतशी त्यांना माझ्याविषयी सहानुभूती वाढू लागली. उदासी महाराजांचे मौन खूप दिवस चालले होते; त्याबद्दल नागाजींकडे चौकशी केली तेव्हा ते सहज भावनेंने म्हणालें की, ते हल्ली कर्णपिशाचीनी नावाच्या यक्षिणीचे साधन करीत आहेत. त्यामुळें त्या साधनेचेवेळी साधकाचे मौन आवश्यक असते. त्यावर मी नागाजींना विचारले, ''ही कर्णपिशाचीनी कुठल्या कोटीची शक्ती आहे आणि त्यांची कार्यक्षेत्र मर्यादा कुठली?'' मी या कर्णपिशाचीनीविषयीं खूप ऐकले होते; आणि वाचले होते, कधी मला पण वाटे, कर्णपिशाचीनीला सिद्ध करावे. नागाजींनी माझ्यावर स्थिर दृष्टी ठेवून विचारले, ''कर्णपिशाचीनी सिद्ध करण्याची इच्छा आहे.'' माझ्या चेहऱ्यावरचे भाव पाहू लागले मी बुचकाळ्यांत पडलो. ते पाहून परत त्यांनी सांगितले, ''जर खरोखरच तुम्हांला कर्णपिशाचीनी सिद्ध करायची असेल तर संकल्प करा. मी माझ्या उजव्या हातांत पाणी घेऊन तुमच्या उजव्या हातांत पाण्यानें संकल्प ठेवेन. तुम्ही तो संकल्प ग्रहण करा; म्हणजे त्याचक्षणीं कर्णपिशाचीनी तुमच्याबरोबर राहिल. हे साधन माझ्याकडे खूप वर्षांपासून पडून आहे. माझ्या उपयोगांत त्यांचे प्रमाण कमी आहे. जर तुम्ही ते तुमच्यासाठी उपयोगी समजत असाल, तर कर्णपिशाचीनी तुमच्याबरोबर राहून, तुमचे कार्य करील.'' मी विचार केला कीं पुढें काय व्हायचे ते होईल, आपण ते शिकू या. मी माझा विचार बोलून दाखविणार इतक्यांत् नागाजींनी शान्त व प्रेमळ भाषेंत सांगितले कीं, पहा! तुमचा निर्णय मी जाणतो. पण जो जाहीर करण्याआधीं तुम्हांला थोडें स्पष्ट सांगतो त्यावरून नाण्याच्या दोन्ही बाजू तुम्हांला समजतील. पहा, माझ्याकडें कर्णपिशाचीनी सिद्ध आहे त्याचे उदाहरण तुम्हांला दाखवितो असे म्हणून त्यांनी माझ्या खिशांत काय आहे ते सांगितले, दोन दिवसाआधी व आठ दिवस आधी घडलेल्या प्रसंगाचें नांवासहीत वर्णन केले. वर्षापूर्वी माझ्या व्यक्तीगत प्रसंगाचे अनुभव सांगितले. माझ्या मित्रांची नांवे, माझ्या पसंतीच्या वस्तू इत्यादी. मी म्हणालो, ''बस्स्, इतक्यावर माझा विश्वास बसला.'' पुढें ते शांतपणें म्हणाले, ''कर्णपिशाचीनी २-३ प्रकारें सिद्ध केली जाते. स्मशानांत ती सिद्ध होते. जंगलांत पण साध्य होते. तसेंच घरांतही तिला प्रसन्न करतां येते. त्याचप्रमाणें या संकल्प ग्रहण करण्याच्या पद्धतीमुळें पण कर्णपिशाचीनीचा हवाला मिळू शकतो.''

''त्या साधनेद्वारा साधक फक्त वर्तमानकाळ व भूतकाळ बरोबर जाणूं शकतो; तेच सांगू शकतो. थोडीसुद्धां भविष्यवाणी या विद्येद्वारा जाणूं शकत नाही. याशिवाय दुसरे कुठलेही प्रयोजन या विद्येचा हेतू नसतो.'' ही विद्या कुणासाठी? कुणी करावी? कुठल्या हेतूसाठी करावी? याविषयी ते म्हणाले, ''जो पुरुष विरक्त असतो, संसाराची बंधनें ज्यानें सोडली आहेत, स्वत:च्या उदरनिर्वाहाशिवाय दुसऱ्या कुठल्याही भानगडींत पडत नसेल. स्पष्टवक्ता असेल, लोभी, लालची, कामी नसेल, तसेंच परोपकारी असेल, त्यानें या विद्येचे साधन करावे. ज्यामुळे कुणाचा हरविलेला स्नेही असेल त्याविषयी माहिती मिळूं शकते. कुणाची किंमती वस्तू हरविली असेल तर त्याविषयी माहिती मिळते. ज्यामुळें ज्या प्रजेचे साधकानें अन्न खाल्ले असेल त्या प्रजेच्या ऋणांतून ऋणमुक्ती मिळते. कुठल्याहीं सज्जन गृहस्थाला षड्यंत्रापासून सावध करतां येते. अशाप्रकारच्या कारणांसाठी ही साधने आहेत.''

(पुढील अंकी)

